## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपीले

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५५९, १५६०, १५६१, १५६२ व १५६३

निर्णय दिनांक   २०-०८-२००८

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, : अपिलार्थी
मु. पो. पिंपळगाव रेणुकाई
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, जालना
(अपील क्रमांक १५५९/०७)

२ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा,
जिल्हा जालना
(अपील क्रमांक १५६०/०७)

३ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी,
जिल्हा जालना (अपील क्रमांक १५६१/०७)

४ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड,
जिल्हा जालना

(अपील क्रमांक १५६२/०७)

५ जन माहिती अधिकारी :

तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर

जिल्हा जालना

(अपील क्रमांक १५६३/०७)

६ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपविभागीय कृषि अधिकारी,

जालना

७ जन अपिलीय अधिकारी :

तथा उपविभागीय कृषि अधिकारी,

परतूर, जिल्हा जालना

## <u>निर्णय</u>

वरील पाच प्रकरणाची एकत्रित सुनावणी आज दिनांक २०-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गजानन संतुकराव देशमुख (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. बहुरे चंद्रसेन कचरुसिंग, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक १ असे संबोधण्यात येईल), श्री. नामदेव मारोती माघोड, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक २ असे संबोधण्यात येईल), श्री. कैलास किसन ढेपे, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ३ असे संबोधण्यात येईल), श्री. कैलास किसन ढेपे, तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन

माहिती अधिकारी क्रमांक ४ असे संबोधण्यात येईल), श्री. विजय भगवानराव वाघ, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ५ असे संबोधण्यात येईल), श्री. उमेश रमाकांतराव घाटगे, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक १ असे संबोधण्यात येईल) व श्री. अशोकराव रामराव काळे, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक २ असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी क्रमांक १ यांच्याकडून दिनांक १३-०९-२००७ रोजीच्या व जन माहिती अधिकारी अ. क्र. २, ३, ४ व ५ यांच्याकडून दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या स्वतंत्र अर्जाव्दारे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एप्रिल २००७ ते जून २००७ या कालावधीतील माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

(१) जन माहिती अधिकारी क्रमांक १, प्रथम अर्ज दिनांक १३-०९-२००७

" आपणास रोहयो जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिळालेली LOC – 29.04 लक्ष रुपये खर्च केलेल्या कामाची यादी. कृषि सहायक व सुपरव्हाईझर यांचे नाव, मजुरांचे हजेरीपत्रक व बाबनिहाय यादी."

जन माहिती अधिकारी क्र. २, ३, ४ व ५ यांच्याकडून दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या स्वतंत्र अर्जाव्दारे अनुक्रमांक (१) प्रमाणे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती मागितली होती. फक्त यामध्ये त्यांनी रोहयो जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिळालेल्या LOC च्या रकमेमध्ये अनुक्रमे रुपये ४०.७१ लक्ष, रुपये ५०.९६ लक्ष, रुपये ९.६८ लक्ष व रुपये २१.७६ लक्ष च्या रकमेचा उल्लेख केलेला आहे.

अपिलार्थीने उपरोक्त पाचही अर्जाव्दारे मागितलेली माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी क्रमांक १ यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०९-२००७ च्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने कार्यालयात येऊन माहिती पाहण्याबद्दल कळविल्याचे, जन माहिती अधिकारी क्रमांक २, ३, ४ व ५ यांनी त्यांच्याकडील अनुक्रमे दिनांक १८-०९-२००७, २८-०९-२००७ व ०८-०९-२००७ व दिनांक १५-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. तथापि यानंतर अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी क्रमांक १ यांच्याकडे दिनांक १५-१०-२००७ रोजी तर जन अपिलीय अधिकारी क्रमांक २ यांच्याकडे दिनांक ०३-१०-२००७ रोजी चार स्वतंत्र अर्जाव्दारे प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी क्रमांक १ व २ यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर कोणतीही सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही मात्र जन अपिलीय अधिकारी क्रमांक १ यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये तर जन अपिलीय अधिकारी क्रमांक २ यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-१०-२००७ रोजीच्या चार स्वतंत्र पत्रान्वये संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित केल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-१२-२००७ रोजी दोन तर दिनांक ०६-१२-२००७ रोजी तीन अशी एकूण पाच स्वतंत्र व्दितीय

अपीले दाखल केली आहेत.  या अपील अर्जांमध्ये व्दितीय अपील करण्याचे कारण अपिलार्थीने त्यांना 'माहिती न मिळाल्याने', असे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी क्रमांक ३ यांचे दिनांक २८-०९-२००७ रोजीचे माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे पत्र त्यांना प्राप्त झाले तथापि इतर कोणत्याही जन माहिती अधिका-यांकडून त्यांना कोणतेही पत्र प्राप्त झाले नाही.  त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

अपील क्रमांक १५५९/०७ संदर्भात जन माहिती अधिकारी क्रमांक १ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर तारीख टाकलेली नाही.  सदर अर्ज त्यांना दिनांक १८-०९-२००७ रोजी प्राप्त झाला.  त्यानंतर त्यांनी त्याच्यांकडील दिनांक २७-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती कार्यालयात येऊन पाहण्यास कळविले होते.  तथापि अपिलार्थीने सदर पत्र त्यांना प्राप्त न झाल्याचे आयोगास सांगितले.  अपिलार्थीने व्यक्तिश: माहिती मागितली असून ते त्यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आले होते का, अशी विचारणा जन माहिती अधिकारी यांना केली असता, अपिलार्थी माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात तीन वेळा उपस्थित झाले होते, असे त्यांनी आयोगासमोर सांगितले.  तसेच अपिलार्थीने दिनांक ०१-०१-२००८ रोजी त्यांना, त्यांनी त्यांच्या कार्यालयात येऊन माहिती बघून त्यांचे समाधान झाल्याने त्यांचा प्रस्तुत अर्ज व इतर अर्ज निकाली काढावेत व त्यावर केलेली अपीले सुध्दा रद्द करावीत असे लेखी दिल्याचे त्यांनी आयोगास सांगितले व त्याप्रीत्यर्थ दिनांक ०१-०१-२००८ रोजीच्या अपिलार्थीने त्यांना लिहिलेल्या पत्राची प्रत आयोगास दाखविली.  तथापि सदर पत्रावरील सही त्यांची नसल्याचे अपिलार्थीने आयोगास सांगितले.

अपील क्रमांक १५६०/०७ संदर्भात जन माहिती अधिकारी क्रमांक २ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर तारीख टाकलेली नाही. सदर अर्ज त्यांना दिनांक ०१-०९-२००७ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रुपये ४३१२ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्यास कळविले. अपिलार्थीने सदर पत्र त्यांना प्राप्त न झाल्याचे आयोगास सांगितले. तथापि सदर पत्र युपीसी व्दारे पाठविल्याचे व पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी मूळ जावक नोंदवही आयोगास दाखविली. यावरुन त्यांनी सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याचे सिध्द होत आहे. सदर पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस द्यावयाच्या एकूण पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर त्यांना कळविला असल्याचे दिसून येते.

अपील क्रमांक १५६१ संदर्भात जन माहिती अधिकारी क्रमांक ३ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर तारीख टाकलेली नाही. सदर अर्ज त्यांना दिनांक ३१-०८-२००७ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रुपये १९२० भरण्याचे कळविले. अपिलार्थीने शुल्क भरले नसल्याने त्यांनी त्यांना माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २८-०९-२००७ रोजीचे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आज आयोगासमोर कबूल केले व शुल्क भरुन माहिती घेण्याची तयारी दर्शविली.

अपील क्रमांक १५६२ व १५६३ संदर्भात अनुक्रमे जन माहिती अधिकारी क्रमांक ४ व ५ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी यांच्या दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जाच्या अनुषगाने त्यांनी अनुक्रमे दिनांक ०८-०९-२००७ व १५-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क भरण्यास कळविले.

तथापि अपिलार्थीने सदर पत्रे त्यांना प्राप्त न झाल्याचे आयोगासमोर सांगितले. आयोगाने जन माहिती अधिकारी क्रमांक ४ व ५ यांना याबाबत त्यांच्याकडील जावक नोंदवहीची विचारणा केली असता, ते ती आयोगास सादर करु शकले नाहीत. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क कळविण्याबाबत पत्रे पाठविली हा त्यांचा मुद्दा, आयोग ग्राह्य धरत नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी क्रमांक १ यांनी अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी विहित मुदतीत तीन वेळा उपस्थित राहिल्याचे मान्य केले आहे तर जन माहिती अधिकारी क्रमांक ४ व ५ हे अपिलार्थीस माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क भरण्याबाबत पाठविलेल्या पत्रासंदर्भात कोणताही पुरावा आयोगास सादर करु शकले नाहीत व अपिलार्थीनेही त्यांना पत्रे प्राप्त न झाल्याचे सुनावणीत सांगितले आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याबाबतचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी क्रमांक १, ४व ५ यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य द्यावी लागेल तर जन माहिती अधिकारी क्रमांक २ व ३ यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळवूनही त्यांनी ते भरले नसल्याने, अपिलार्थीस आता ही माहिती त्यांना अद्यापही आवश्यक असेल तर ती सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागेल.

सबब जन माहिती अधिकारी क्रमांक १, ४ व ५ यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश

निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य तर जन माहिती अधिकारी क्रमांक २ व ३ यांनी सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

प्रसंगावशात् येथे असेही दिसून येते की, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी क्रमांक १ यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी तीन वेळा उपस्थित राहिल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आजपावेतो माहिती प्राप्त झालेली नाही. तसेच जन माहिती अधिकारी क्र. ४ व ५ हे देखील अपिलार्थीस शुल्क भरण्याबाबत पाठविल्याच्या पत्राचा कोणताही पुरावा आयोगास सादर करु शकले नाहीत. जन माहिती अधिकारी क्रमांक १, ४ व ५ यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस स्वत:ला पात्र ठरविले आहे. सबब आयुक्त (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस आयोग करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक १५५९/२००७, १५६२/२००७ व १५६३/२००७, मान्य करण्यात येत आहेत.

२. अपील क्रमांक १५६०/०७ व १५६१/०७ निकाली काढण्यात येत आहेत.

३. तालुका कृषि अधिकारी, जालना, तालुका कृषि अधिकारी, अंबड व तालुका कृषि अधिकारी, परतूर यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

४. तालुका कृषि अधिकारी, मंठा व तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, त्यांनी माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत सदर माहिती त्यांना आवश्यक असल्यास, जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क उपलब्ध करुन घ्यावी.

५. आयुक्त (कृषि), पुणे यांना तालुका कृषि अधिकारी, जालना, अंबड व परतूर यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद                                        ( वि. बा. बोरगे )
दिनांक    २०-०८-२००८                          राज्य माहिती आयुक्त,
                                                खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, मु. पो. पिंपळगाव रेणुकाई तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड, जिल्हा जालना

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे – ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपीले

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५६४, १५६५, १५६६, १५६७ व १५६८

निर्णय दिनांक   २०-०८-२००८

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, : अपिलार्थी
मु. पो. पिंपळगाव रेणुकाई
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा,
जिल्हा जालना
(अपील क्रमांक १५६४/०७)

२ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड,
जिल्हा जालना
(अपील क्रमांक १५६५/०७)

३ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर,
जिल्हा जालना
(अपील क्रमांक १५६६/०७)

४ जन माहिती अधिकारी :

तथा तालुका कृषि अधिकारी, जालना,

जिल्हा जालना

(अपील क्रमांक १५६७/०७)

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी,<br>जिल्हा जालना<br>(अपील क्रमांक १५६८/०७) | : | |
| ६ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषि अधिकारी,<br>जालना | : | प्रतिवादी |
| ७ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषि अधिकारी,<br>परतूर, जिल्हा जालना | : | |

## निर्णय

वरील पाच प्रकरणाची एकत्रित सुनावणी आज दिनांक २०-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गजानन संतुकराव देशमुख (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. नामदेव मारोती माघोड, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक १ असे संबोधण्यात येईल), श्री. कैलास किसन ढेपे, प्रभारी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक २ असे संबोधण्यात येईल), श्री. विजय भगवानराव वाघ, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ३ असे

संबोधण्यात येईल), श्री. बहुरे चंद्रसेन कचरुसिंग, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ४ असे संबोधण्यात येईल), श्री. कैलास किसन ढेपे, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ५ असे संबोधण्यात येईल), श्री. उमेश रमाकांतराव घाटगे, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक १ असे संबोधण्यात येईल) व श्री. अशोकराव रामराव काळे, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक २ असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी क्रमांक १ यांच्याकडून दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या, जन माहिती अधिकारी क्र. २, ३ व ४ यांच्याकडून दिनांक ०८-०९-२००७ रोजीच्या स्वतंत्र अर्जाव्दारे व जन माहिती अधिकारी क्रमांक ५ यांच्याकडून दिनांक १०-१०-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एप्रिल २००७ ते जून २००७ या कालावधीतील (जन माहिती अधिकारी क्रमांक ४ यांच्याकडून ०१ एप्रिल २००७ ते ०३ मे, २००७ पर्यंतची) माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

(१) जन माहिती अधिकारी क्रमांक १, प्रथम अर्ज दिनांक १०-०९-२००७

> “जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आपल्या विभागास प्राप्त पतमर्यादा रुपये ४०.२२ लक्ष त्यातून झालेला खर्चाचा तपशील, बाबनिहाय यादी, अंदाजपत्रक, मजूरांचे हजेरीपत्रक व पगारपत्रक धान्यकुपन झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात”

जन माहिती अधिकारी क्र. २, ३ व ४ यांच्याकडून दिनांक ०८-०९-२००७ रोजीच्या स्वतंत्र अर्जाव्दारे व जन माहिती अधिकारी क्रमांक ५ यांच्याकडून दिनांक १०-१०-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे अनुक्रमांक (१) प्रमाणे (जन माहिती अधिकारी क्रमांक २ यांच्याकडून

अंदाजपत्रक व धान्य कुपन्सच्या प्रती वगळून व जन माहिती अधिकारी क्रमांक ३, ४ व ५ यांच्याकडून अंदाजपत्रकाची प्रत वगळून) त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती मागितली होती. यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त पतमर्यादेच्या रकमेमध्ये फरक होता त्या अनुक्रमे (पुढील प्रमाणे आहेत) रुपये १९.१८ लक्ष, रुपये २२.८५ लक्ष, रुपये ७५.५० लक्ष व रुपये ६३.५९ लक्ष. अपिलार्थीने उपरोक्त पाचही अर्जाव्दारे मागितलेली माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी क्रमांक १ यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-११-२००७ च्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपुरा कर्मचारीवर्ग असल्याने माहिती पाठविण्यास विलंब होईल तरी माहिती कार्यालयात येऊन पाहण्याबद्दल कळविल्याचे, जन माहिती अधिकारी क्रमांक २ यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १९२०/- भरण्याचे सूचित केल्याचे, जन माहिती अधिकारी क्रमांक ४ यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने कार्यालयात येऊन माहिती पाहण्याबद्दल कळविल्याचे, व जन माहिती अधिकारी क्रमांक ५ यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांचे कार्यालयास अपिलार्थीने नमूद केलेली पतमर्यादा उपलब्ध झाली नसल्याने माहिती निरंक असल्याचे कळविल्याचे, तर जन माहिती अधिकारी क्रमांक ३ यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी क्रमांक १ (उपविभागीय कृषि अधिकारी, जालना)

यांच्याकडे दिनांक ०८-१०-२००७ रोजी एक, व जन अपिलीय अधिकारी क्रमांक २ (उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, जिल्हा जालना) यांचेकडे दिनांक १०-१०-२००७ रोजी एक, ०८-१०-२००७ रोजी दोन दिनांक व १०-११-२००७ रोजी एक अशी एकूण पाच प्रथम अपीले सादर केली असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी क्रमांक २ यांनी अपिलार्थीच्या अपिलावर कोणतीही सुनावणी घेतल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही तथापि त्यांच्याकडील दिनांक १९-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी क्रमांक १, २, ३ व ५ यांना अपिलार्थीस माहिती देण्याबद्दल कळविले. जन अपिलीय अधिकारी क्रमांक १ यांचेकडे अपिलार्थीचे दिनांक ०८-१०-२००७ चे प्रथम अपील प्राप्त झाले नसल्यामुळे त्यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-१२-२००७ रोजी चार व दिनांक ०६-१२-२००७ रोजी एक अशी एकूण पाच स्वतंत्र व्दितीय अपीले दाखल केली आहेत. या अपील अर्जामध्ये व्दितीय अपील करण्याचे कारण अपिलार्थीने त्यांना 'माहिती न मिळाल्याने', असे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी क्रमांक २ यांचे शुल्क भरण्यासंबंधी दिलेले पत्र त्यांना प्राप्त झाले नाही. तसेच इतर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तसेच जन माहिती अधिकारी क्रमांक ४ यांच्याकडील दिनांक ०१-०१-२००८ रोजी माहिती प्राप्त झाली असल्यामुळे अपील रद्द करण्याची विनंती केल्यासंबंधीच्या पत्रावरील

सही अपिलार्थी यांची नसल्याचे अपिलार्थी यांनी सांगितले. त्यांना त्यांच्या सर्व मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आजही आवश्यकता आहे.

अपील क्रमांक १५६४ संदर्भात जन माहिती अधिकारी क्रमांक १ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा प्रथम अर्ज त्यांना दिनांक ११-१०-२००७ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर त्यांनी त्याच्यांकडील दिनांक २०-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती कार्यालयात येऊन पाहण्यास कळविले होते.

अपील क्रमांक १५६५ संदर्भात जन माहिती अधिकारी क्रमांक २ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर तारीख टाकलेली नाही. सदर अर्ज त्यांना दिनांक १५-१०-२००७ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रुपये १९२० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्यास कळविले. अपिलार्थीने सदर पत्र त्यांना प्राप्त न झाल्याचे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांना पत्र पाठविल्यासंबंधीचा पुरावा सादर करण्यास सांगितले असता ते सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्यासंबंधी कोणताही पुरावा आयोगास सादर करु शकले नाहीत. त्यामुळे ते पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविल्याचे मानता येणार नाही.

अपील क्रमांक १५६६ संदर्भात जन माहिती अधिकारी क्रमांक ३ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर तारीख टाकलेली नाही. सदर अर्ज त्यांना दिनांक ०९-१०-२००७ रोजी प्राप्त झाला. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगासमोर मान्य केले.

अपील क्रमांक १५६७ संदर्भात जन माहिती अधिकारी क्रमांक ४ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा प्रथम अर्ज त्यांना दिनांक १०-१०-२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थी यांच्या दिनांक १०-१०-२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने

त्यांनी दिनांक ३१-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून, कार्यालयात येवून पाहण्यासाठी कळविले. तसेच अपिलार्थीने दिनांक ०१-०१-२००८ रोजी त्यांना, त्यांनी त्यांच्या कार्यालयात येऊन माहिती बघून त्यांचे समाधान झाल्याने त्यांचा प्रस्तुत माहितीसाठीचा अर्ज व इतर अर्ज निकाली काढावेत व त्यावर केलेली अपीले सुध्दा रद्द करावीत असे लेखी दिल्याचे त्यांनी आयोगास सांगितले व त्याप्रीत्यर्थ दिनांक ०१-०१-२००८ रोजीच्या अपिलार्थीने त्यांना लिहिलेल्या पत्राची प्रत आयोगास दाखविली. तथापि सदर पत्रावरील सही त्यांची नसल्याचे अपिलार्थीने आयोगास सांगितले.

अपील क्रमांक १५६८ संदर्भात जन माहिती अधिकारी क्रमांक ५ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जावर तारीख नाही. सदर अर्ज त्यांना दिनांक १०-१०-२००७ रोजी प्राप्त झाला त्यावर त्यांनी दिनांक २९-१०-२००७ च्या पत्राव्दारे मूळ अर्जातील विषय त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसून त्यांचे कार्यालयास अपिलार्थीने नमूद केलेल्या रकमेचे अनुदान प्राप्त झाले नाही व त्यामुळे माहिती निरंक आहे असे कळविले.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी क्रमांक १ व ४ यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या कार्यालयात माहिती पाहण्यासाठी अपिलार्थीस त्यांच्या पत्रान्वये कळविले. तथापि अपिलार्थीने माहितीची मागणी केल्यानंतर, त्यांना माहिती पाहण्यासाठी बोलाविण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती त्यांना विनामूल्य द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी क्रमांक २ यांनी आवश्यक ते शुल्क भरण्याबाबत पाठविलेल्या पत्रासंदर्भात कोणताही पुरावा ते आयोगास सादर करु शकले नाहीत व अपिलार्थीनेही त्यांना पत्र प्राप्त न झाल्याचे

सुनावणीत सांगितले आहे. जन माहिती अधिकारी क्रमांक ३ यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिला नाही. आता अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याबाबतचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी क्रमांक १, २, ३ व ४ यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी क्रमांक ५ यांनी माहिती निरंक असल्याचे कळविल्यासंबंधीचे पत्र अपिलार्थीस पाठविल्यासंबंधी ते कोणताही पुरावा आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. अपिलार्थीने नमूद केलेली रकमेची पतमर्यादा त्यांच्या कार्यालयास जरी प्राप्त झाली नसली तरी, त्यांना मूळ अर्जातील माहितीच्या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयाने केलेल्या रोहयोच्या कामांच्या व हजेरीपटांच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

सबब जन माहिती अधिकारी क्रमांक १, २, ३ व ४ यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत, व जन माहिती अधिकारी क्रमांक ५ यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली माहिती १५ दिवसाचे आत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

जन माहिती अधिकारी क्र. २ हे आज अपिलार्थीस शुल्क भरण्याबाबत पाठविलेल्या पत्राचा कोणताही पुरावा आयोगास सादर करु शकले नाहीत. जन माहिती अधिकारी क्रमांक ३ यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहितीच्या अर्जासंदर्भात कोणताही प्रतिसादच दिला नाही तसेच जन माहिती अधिकारी क्रमांक १ व ४ यांनी अपिलार्थीस पत्र पाठवितांना पृष्ठ संख्या व शुल्काची रक्कम कळविली नाही. व अपिलार्थीने माहिती मागितली असता त्यांना पाहण्यासाठी आमंत्रित केले. जन माहिती अधिकारी क्रमांक ५ हे अपिलार्थीस ‘‘निरंक’’ माहिती पाठविल्याचा पुरावा आयोगासमोर आयोगाने सुनावणीच्या नोटीशीमध्ये

स्पष्ट सूचना देऊनही, सादर करु शकले नाहीत.  अशा प्रकारे जन माहिती अधिकारी क्रमांक १, २, ३, ४ व ५ यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस स्वत:ला पात्र ठरविले आहे.  सबब आयुक्त (कृषि), पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस आयोग करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक १५६४/०७, १५६५/०७, १५६६/०७, १५६७/०७ व १५६८/०७ मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा, अंबड, परतूर व जालना यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत व तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी यांनी १५ दिवसाचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. आयुक्त (कृषि), पुणे यांना तालुका कृषि अधिकारी, मंठा, अंबड, परतूर, जालना व तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक    २०-०८-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, मु. पो. पिंपळगाव रेणुकाई तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे – ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४८९

निर्णय दिनांक : २१-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. जयरामपंत नामदेवराव लगड,<br>रा.नाशिक. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी, नाशिक | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. जयरामपंत नामदेवराव लगड (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. विठ्ठलराव नारायणराव शिंदे, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१३.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती खालीलप्रमाणे मागितली होती

" जा.क्र.१०/०५ दि. २८.११.०५ व पत्र क्र. ४८ , दि. ९.९.०६ या २ पत्रांची उत्तरेच दिली नाही.

१- रेती व त्याबद्दलची कारवाई/दंड लेखी द्यावे.

२-दि. २८.११.०५ व दि. ९.९.०६

३-अर्जात उल्लेख केल्याप्रमाणे

३ टेम्पोबद्दल कारवाई/दंड व परिवहन कार्या. नाशिक यांना पत्र पाठविले किंवा कसे."

अपिलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करताना, अपिलार्थीने त्या अर्जास कोणतीही कागदपत्रे जोडली नाहीत.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ५.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, त्यामध्ये अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या अर्जावरुन त्यांना निश्चित कोणती माहिती हवी आहे, याचा बोध होत नसल्याचे नमूद करुन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे कळवून अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ११.१.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासंदर्भात दिशाभूल केली व माहिती देण्याचे टाळले, तसेच त्यांच्या पत्रांना उत्तरे का दिली नाहीत, याची कारणे विचारली आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. २९.१.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ९.२.२००७ रोजी

पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहितीच्या मागणीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांना स्वयंस्पष्ट तपशील दिल्यानंतर दहा दिवसांचे आत नियमानुसार अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि सदर आदेश निर्गमित होण्यापूर्वीच अपिलार्थीने त्यांच्याकडील दि. २५.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक तो तपशील सादर केल्याचे दिसून येते. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ३१.१.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे संबंधित लिपीकाने अपिलार्थीस दिलेल्या त्यांच्या दि. २५.१.२००७ रोजीच्या पत्रावरील पोचसहीवरुन सिध्द होत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थी यांचे हे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊन देखील अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.४.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की,वास्तविकतः त्यांनी बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्या टेम्पोस पकडून देऊन शासनाचे एकप्रकारे सहकार्य केले असूनही, त्यांनी तक्रार केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती त्यांना देण्यात आली नाही, उलट, माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्यात आली, ही सर्व कार्यवाही करण्यासाठी त्यांना एकूण रु.७००/- इतका खर्च आला असून या खर्चाची भरपाई जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळावी, आज सुनावणीस जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत तर

प्रथम अपिलाच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी हे गैरहजर होते, त्यांनी माहितीसाठीचा अर्ज केल्यापासून आजपर्यंत एकूण ६४७ दिवस इतका कालावधी व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करुन त्यांना जास्तीत जास्त शास्ती लावावी, तसेच जन अपिलीय अधिकारी हे आज गैरहजर असल्याने, याचाही गंभीर विचार व्हावा, असे त्यांनी या युक्तिवादाच्या शेवटी स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, याचा उल्लेख नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर निर्णय देताना अपिलार्थी यांनी स्वयंस्पष्ट तपशील जन माहिती अधिकारी यांना लेखी अथवा तोंडी दिल्यानंतर दहा दिवसांच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. तथापि हा तपशील त्यांना अपिलार्थीकडून प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस आजतागायत त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात केलेल्या दि. २५.१.२००७ रोजीच्या अर्जाबद्दल व त्यावरील पोचसहीबद्दल जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता, त्यांनी दोन्ही सदर अर्ज त्यांच्या कार्यालयात शोधूनही त्यांना आढळून आले नाहीत, असे त्यांनी आयोगासमोर सांगितले. सदर तपशील जन माहिती अधिकरी यांना प्राप्त झाल्यास ते अपिलार्थीस ही माहिती सात दिवसांच्या आत देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १३.११.२००६ रोजी केलेल्या अर्जावरुन अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी देखील याच मुद्यावर अपिलार्थीस त्यांच्या या मूळ अर्जास दि. ५.१२.२००६ रोजी प्रथम प्रतिसाद दिला

आहे. अपिलार्थीने जर जन माहिती अधिकारी यांना, हे पत्र त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी आवश्यक तो तपशील देऊन जन माहिती अधिकारी यांना अर्जाची मूळ प्रत दिली असती तर जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात काही कार्यवाही करता आली असती. तथापि तसे न करता त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.१.२००७ रोजी प्रथम अपील केले. त्यानंतर मात्र त्यांनी दि. २५.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जानुसार त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा संपूर्ण तपशील दिल्याचे आढळून येत आहे. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ३१.१.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांचे कार्यालयाने अपिलार्थीस दिलेल्या पोचसहीवरुन दिसून येत आहे. सदर पत्र खुद्द जन माहिती अधिकारी यांच्यापर्यंत पोहचले नाही, यामध्ये अपिलार्थीचा दोष आहे, असे आयोग मानत नाही. त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे त्यांना भाग आहे. सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असून, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने आज रोजी सुनावणीच्या वेळी त्यांच्या दि. २८.११.२००५ व ९.९.२००६ रोजीच्या अर्जाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना तात्काळ देण्याचे मान्य केले आहे. उपरोक्त घटनाक्रमामध्ये आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंबंधाने माहिती देण्यासाठी कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. वास्तविकतः अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जावर ते स्वतः ज्येष्ठ नागरिक ग्राहक पंचायत समितीचे जिल्हा सदस्य असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जासंबंधात जन माहिती

अधिकारी यांनी स्वतःहून कार्यवाही करुन कागदपत्रे शोधून घेणे अथवा यासंबंधात अपिलार्थीशी संपर्क करणे अशी कार्यवाही करण्यात त्यांना कोणतीही अडचण नव्हती. तसेच त्यांनी अपिलार्थीचा प्रथम माहितीसाठीचा अर्ज देखील आजतागायत म्हणजेच साधारणतः दोन वर्षे त्यांच्या कार्यालयामध्ये विनाकार्यवाही ठेवून न घेता, अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, याचाही शोध घेणे जरुरीचे होते. तथापि अशाप्रकारची कार्यवाही त्यांच्याकडून झाली नाही. तसेच अपिलार्थीने या अर्जासंदर्भात त्यांच्या व उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाशी या माहितीसंदर्भात वेळोवेळी पत्रव्यवहार केल्याचे दिसून येते. अपिलार्थीस या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहायक व इतर कर्मचारी/अधिकारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) अन्वये तरतुद आहे. हे पाहता,उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेवण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक जबाबदार ठरत आहेत. सबब जिल्हाधिकारी, नाशिक यांना संबंधितांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांना आलेल्या एकूण रु.७००/- इतक्या खर्चाच्या नुकसान भरपाईची मागणी आयोगाकडे केली आहे. त्यांना आलेल्या या खर्चाच्या पुराव्यापृष्ठयर्थ त्यांनी आयोगाकडे नाशिकरोड ते औरंगाबाद या प्रवासाचे रेल्वेचे तिकीट झेरॉक्सप्रतीमध्ये सादर केले आहे. अपिलार्थीस हा खर्च नाहक करावा लागला हे आयोग मान्य करीत असून अधिनियमातील कलम १९(८)(ख) मधील तरतुदीनुसार जन माहिती

अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस नाशिकरोड ते औरंगाबाद या प्रवासाचे जाण्या-येण्याचे भाडे रु. १२४/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत प्रदान करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नाशिकरोड ते औरंगाबाद या प्रवासाचे जाण्या-येण्याचे भाडे रु. १२४/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत प्रदान करावे.

४ जिल्हाधिकारी,नाशिक यांना, उपरोक्त प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक/कर्मचारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जयरामपंत नामदेवराव लगड, पाटील प्राईड, अे-१, दिपालीनगर, नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४९१

निर्णय दिनांक : २१-०८-२००८

१ श्री. हेमंत शंकरराव कवडे, : अपिलार्थी
रा. मनमाड ता.नांदगाव
जि. नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग मनमाड,
ता.नांदगाव जि. नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम, रो.ह.यो.
(पूर्व विभाग) नाशिक.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. हेमंत शंकरराव कवडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. योगेश बळवंत बनसोडे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम, उपविभाग मनमाड ता.नांदगाव जि. नाशिक. (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. शरद ना.राजभोज, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम, रो.ह.यो.(पूर्व विभाग) नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

आज रोजी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.१.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील विचाराधीन आहे. सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना २४ दिवस इतक्या विलंबाने माहिती प्राप्त झाल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे शास्ती लावण्याची आयोगाकडे विनंती केली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी वेळेवर माहिती न दिल्याने अधिनियमातील कलम ७(६) नुसार मोफत माहिती अर्जदारांना प्राप्त झाल्याने, शासनास नुकसान सहन करावे लागते, या नुकसानीची भरपाई संबंधित जन माहिती अधिकारी यांनी करावी, असेही आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्याचे नमूद केले आहे व सदर अपिलाची सुनावणी घेण्यासाठी जन अपिलीय अधिकारी हे टाळाटाळ करीत होते, परंतु अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात बसून राहिल्यानंतर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यास भाग पाडल्याचे नमूद केले. थोडक्यात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून २४ दिवस इतक्या विलंबाने माहिती प्राप्त झाल्याने त्यांच्यावर कार्यवाही करण्याची त्यांची विनंती या अपील अर्जामध्ये आहे, असे दिसून येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्याकडील दि.१२.०७.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम (४) च्या तरतुदीप्रमाणे त्यांच्या कार्यालयाने करावयाच्या कार्यवाहीबाबत माहिती मागितली आहे. या अर्जामध्ये त्यांनी अधिनियमातील कलम ४(ख) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने ठेवावयाच्या सतरा मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे. तसेच सदर माहिती वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात

आली, त्या वेबसाईटचे नाव देखील त्यांनी या अर्जामध्ये मागणी केल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ५.८.२००६ रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने ती तयार करण्यासाठी वेळ लागणार असल्याचे अपिलार्थीस अवगत करुन अपिलार्थीकडून एक महिन्याची मुदतवाढ मागून घेतली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.८.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ४.९.२००६ रोजी सुनावणी घेतली व या संदर्भातील आपले आदेश दि. ५.९.२००६ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस जन माहिती यांनी उशिरा माहिती दिल्याचे कबूल केले असून जन माहिती अधिकारी यांना क्षमापन करण्यात येत असल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नेमक्या याच मुद्याकडे अंगुलीनिर्देश करुन अशाप्रकारचे अधिकार जन अपिलीय अधिकारी यांना नसल्याचे म्हटले आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १.९.२००६ रोजी आवश्यक ती माहिती पुरवली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.०१.२००७ रोजी द्वितीय अपील केल्याचे दिसून येत आहे. आयोगाकडे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, मूळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडे त्यांना माहिती देण्यासाठी मुदत वाढवून देण्यासाठी केलेली विनंती पूर्णतः अवैध आहे, कारण जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने माहिती देण्यासाठी मुदतवाढ

देण्याची तरतुद माहिती अधिकार अधिनियमामध्ये नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वास्तविकतः जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात उशिरात उशिरा दिनांक १५.१०.२००५ पर्यंत तयार करुन ठेवावयाची होती. तथापि अपिलार्थीने अर्ज करेपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील स्वयंप्रेरणेने प्रसिध्द करावयाची माहिती देखील तयार करुन ठेवली नव्हती, असे येथे दिसून येत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीने त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीस पात्र ठरविले आहे. अपिलार्थीस जी माहिती सर्वसाधारण परिस्थितीमध्ये दि. ११.८.२००६ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे जेथे अनुज्ञेय होते, तेथे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १.९.२००६ रोजी ही माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी अशाप्रकारे २० दिवसांचा विलंब लावला आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणेच्या अभावाबद्दल प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून यापूर्वीच संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आता आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१ अपील मान्य करण्यात येत आहे.

२ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना, उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २१-०८-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हेमंत शंकरराव कवडे, 'जय योगेश्वर' वागदर्डिरोड शिवाजी नगर नं.२ मनमाड, ता.नांदगाव जि.नाशिक-४२३ १०४.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम, उपविभाग मनमाड ता.नांदगाव जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम, रो.ह.यो.(पूर्व विभाग) नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४९२

निर्णय दिनांक : २१-०८-२००८

१ श्री. नंदकुमार किसन दरवडे, : अपिलार्थी
रा. मनमाड ता.नांदगाव
जि. नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, चांदवड,
जि. नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी, मालेगाव,
जि. नाशिक.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : १) तहसीलदार, चांदवड
जि.नाशिक
२) तालुका निरीक्षक, भूमी
अभिलेख, चांदवड,
जि.नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. नंदकुमार किसन दरवडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सुरेश गोविंद बागुल, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, चांदवड, जि. नाशिक व श्री. जयसिंग धनसिंग राठोड, मुख्यालय सहायक, सहायक माहिती अधिकारी, भूमी अभिलेख, चांदवड, जि.नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) तसेच श्री. अजय सुभाष मोरे, जन अपिलीय

अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मालेगाव उपविभाग, जि. नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.८.२००६ रोजी केलेले द्वितीय अपील विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या अर्जामध्ये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत दिली नाही, जी माहिती दिली, ती २६ दिवस इतक्या विलंबाने दिली, त्यांच्याकडून रु. १४६/- इतकी फी वसूल करुन घेतली, सदर फी अवास्तव आहे तसेच त्यांना अनावश्यक माहिती दिली, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी रु. २५०/-प्रमाणे शास्तीची कारवाई करावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दि. १८.०३.२००६ रोजीच्या अर्जान्वये जमिनीच्या सत्ता प्रकार ‘ब’ च्या मिळकतींच्या शर्तभंगाचे कार्यवाहीबाबत व सत्ता प्रकार ‘ब’च्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती एकूण ८ मुद्यांवर मागितली होती. या ८ मुद्यांपैकी मुद्या क्र. ८ वगळता उर्वरित ७ ही मुद्यांमधील माहिती तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्या कार्यालयाशी संबंधित होती. अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, चांदवड यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाशी संबंधित आहे त्या प्राधिकरणाकडे म्हणजे तालुका निरीक्षक भूमि अभिलेख तथा नगर भूमापन अधिकारी, चांदवड यांच्याकडे त्यांच्याकडील दि. २४.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये

पाठविला. अपिलार्थीच्या या अर्जास तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी त्यांच्याकडील दि. २५.४.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस, "१५ दिवस इतक्या वाढीव मुदतीमध्ये माहिती कळविण्याची त्यांनी तजवीज केली आहे", असे या पत्राद्वारे कळविले. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्या दि. २५.४.२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, त्यांना निश्चितपणे काय म्हणावयाचे आहे, याचा कोणताही अर्थबोध होत नाही. मात्र पत्रातील एकूण सूरावरुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जुन्या कालावधीतील असल्याने ती माहिती देण्यासाठी त्यांना १५ दिवस इतका वाढीव कालावधी लागणार असल्याचे या पत्रावरुन अनुमान काढण्यास हरकत नाही. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले, असे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. त्यानंतर परत दि. १९.५.२००६ रोजी अपिलार्थीस अशाच अथाचे एक पत्र तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी लिहून,"अपिलार्थीस द्वितीय १५ दिवसांची मुदतवाढ कळविली." (तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्या पत्रातील हे वाक्य जसेच्या तसे आयोगाने वापरले आहे.) या पत्रावरुन देखील तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी अपिलार्थीकडून परत १५ दिवसांच्या मुदतवाढीची मागणी केल्याचे दिसून येते. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्या कार्यालयाकडून कोणतीही माहिती प्राप्त होत नसल्याचे पाहून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १९.०५.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दि. १९.५.२००५ अशी तारीख टंकलिखित केली आहे. सदर तारीख चुकीने टंकलिखित झाल्याचे अपिलार्थीने आयोगासमोर मान्य केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेश देण्याची व त्यांच्यावर शास्ती लावण्याची शिफारस करण्याची त्यांनी या अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे विनंती केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी

अपिलार्थीच्या या अपील अर्जाची सुनावणी दि. २३.६.२००६ रोजी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश त्याचदिवशी म्हणजे दि. २३.६.२००६ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन तहसीलदार, चांदवड व तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, चांदवड यांना अपिलार्थीस दि. २९.६.२००६ पर्यंत माहिती देण्याचे आदेशित केले. या आदेशामध्ये त्यांनी तहसीलदार यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेश पारित केले आहेत, तर तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी अपिलार्थीकडून त्यांनी घेतलेली अनावश्यक जादा फी परत करण्याचे त्यांना आदेशित केले आहे. तथापि या आदेशापूर्वीच अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १४६/- इतके तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्या कार्यालयात दि. ३०.५.२००६ रोजी भरले असल्याने त्यांना दोन्ही अधिकाऱ्यांनी दि. ३०.६.२००६ रोजी आवश्यक माहिती पुरविली. अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने माहिती देऊनही त्यासाठी शुल्क आकारल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये १९(३) राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.०८.२००६ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी सुरुवातीच्या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे लेखी युक्तिवाद आयोगास सादर करण्यात आला. या युक्तिवादामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, तहसीलदार, चांदवड यांनी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्या कार्यालयाकडे पाच दिवसांच्या आत त्यांचा मूळ अर्ज वर्ग न करता तो सतरा दिवस इतक्या उशिराने केला आहे, प्रथम अपिलाचे कामकाज चालू होण्यापूर्वीच तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी मोफत माहिती न देता फी वसूल करुन त्यांना माहिती दिली, फी आकारणीकरिता एकूण ३३ पृष्ठांवर ४६ पानांच्या छायाप्रती (काही पृष्ठांवर पाठपोट) देण्यात आल्या व त्यांच्याकडून

रु.१४६/- सक्तीने वसूल केले, त्यावेळी त्यांना माहितीची तातडीने गरज असल्याने त्यांनी सदर रक्कम त्याचे आक्षेप कायम ठेवून (under protest) त्यांच्या कार्यालयात भरली आहे व त्यांना माहितीची फी रु. ३३/-इतकी योग्य वाटते. त्यांनी मागणी केलेली माहिती तहसीलदार, चांदवड यांनी एकूण ७४ दिवस इतक्या विलंबाने दिली आहे, तर तालुका निरीक्षक यांनी त्यांना २६ दिवस इतक्या विलंबाने माहिती दिलेली आहे. त्यामुळे त्यांना करण्यात आलेली चुकीची फी आकारणी पाहता त्यांना रु. ११३/- इतकी रक्कम जन माहिती अधिकारी यांच्याकडून परत करण्याचे आदेशित व्हावे, तसेच या कामी झालेला खर्च रु. ५००/- त्यांना प्रत्येक जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून देण्यासाठी आदेश व्हावेत आणि या दोन्ही अधिकाऱ्यांनी त्यांना उशिराने माहिती दिल्याबद्दल विलंबाच्या प्रतिदिवशी रु.२५०/- प्रमाणे शास्ती लावावी.

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने माहितीची मागणी केली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते, त्यावेळी श्रीमती सरदेसाई नावाच्या (सध्या तहसीलदार,सं.गां.योजना, या पदावर जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे कार्यरत) तहसीलदार कार्यरत होत्या. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती का पुरविली नाही, याची कारणे ते आयोगास अवगत करुन देऊ शकत नाहीत.

जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्या प्रतिनिधीने देखील अशाचप्रकारचा युक्तीवाद करुन अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली त्यावेळी श्री. एन.आर.पाटील (सध्या नाशिक येथे विशेष तालुका निरीक्षक या पदावर कार्यरत आहेत) नावाचे अधिकारी कार्यरत होते, त्यामुळे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्याची कारणे ते आयोगास अवगत करु शकत नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १९.५.२००६ रोजीच्या प्रथम अपिलावर त्यांनी दि. २३.६.२००६ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले व अपिलार्थीस दि. २९.६.२००६ पर्यंत माहिती देण्याचे संबंधित अधिकाऱ्यांना सूचित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूलतः त्यांचा अर्ज तहसीलदार, चांदवड यांना उद्देशून केला आहे. मात्र मागणी केलेल्या माहितीतील एकूण आठ मुद्यांपैकी सात मुद्दे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नाहीत. त्यांच्या कार्यालयाशी फक्त मुद्दा क्र. ८ संबंधित असून त्यामध्ये अपिलार्थीने तहसीलदार यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या नावाचे बोर्ड कोणत्या ठिकाणी लावले, याचे वर्णन देण्यात यावे व या मजकूराचा फोटो जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला होता. यापोटी लागणारा खर्च पूर्णतः ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरण्यास तयार होते. येथे असे दिसून येते की, माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी अपिलार्थीने या मुद्याद्वारे मागणी केलेली माहिती पूर्णतः विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात फारतर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचे नाव व हुद्दा हे कळवता आले असते. त्यांच्या नावाचा बोर्ड निश्चित कोणत्या ठिकाणी लावला आहे, त्याचे वर्णन करुन ते अपिलार्थीस पुरविणे हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमधील माहिती देणे या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत नाही. कारण अशाप्रकारचे जागेचे वर्णन कोणत्याही कार्यालयात "तयार माहिती" या स्वरुपात उपलब्ध असू शकणार नाही, त्यामुळे

मूळात अपिलार्थीने मुद्दा क्रमांक ८ द्वारे मागितलेली माहिती त्यांना दोन्ही जन माहिती अधिकाऱ्यांकडून देय होत नाही. तथापि अपिलार्थीच्या प्रथम अर्जासंदर्भात माहिती देण्यासंबंधीचा निर्णय त्यांनी अपिलार्थीस कळविणे, हे माहिती अधिकार अधिनियमामधील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार त्यांना अनिवार्य होते, तथापि अशी कोणतीही कृती त्यांनी विहित मुदतीत केल्याचे आढळून येत नाही. उर्वरित सातही मुद्यांची माहिती तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालयाशी संबंधित आहे. त्यांनी अपिलार्थीस 'A4' आकारमानाच्या (साईज) कागदावर माहिती पुरविली आहे. या आकारमानावर जरी छायाप्रत दोन पृष्ठांची असली तरीही ही माहिती एका पृष्ठावर (पुस्तकाची सलग दोन पानांचे आकारमान कमी करुन) अपिलार्थीस देण्यात आली असल्याने या कामी अपिलार्थीकडून त्यांना रु.२/- प्रमाणे प्रतिपृष्ठ आकारावयास हवे होते. तथापि त्यांनी तसे केले नाही. अपिलार्थीस देण्यात आलेल्या माहितीपैकी बरीचशी माहिती अशाप्रकारची आहे. तर काही पृष्ठांच्या माहितीमध्ये मागील पृष्ठ कोरे असूनही त्याबद्दल तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी अपिलार्थीकडून रु.२/- अशी फी वसूल केली आहे. तसेच ही माहिती तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी अपिलार्थीस दि. २४.४.२००६ पूर्वी सशुल्क देणे देय असताना त्यांनी ती अपिलार्थीस दि. ३०.६.२००६ रोजी सशुल्क पुरविली. सदर माहितीपोटीचे शुल्क रु. १४६/- इतके त्यांनी अपिलार्थीकडून दि. ३०.५.२००६ प्राप्त करुन घेतले. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये तालुका निरीक्षक यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांना जेवढा त्रास देता येईल तेवढा दिला आहे, अशी आयोगाची उपलब्ध कागदपत्रांवरुन खात्री झाली आहे. मूळात अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस अवैध पत्रे पाठवून त्यांनी कालापव्यय केला, कारण माहिती अधिकार अधिनियमानुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून

मुदतवाढ घेण्याची कोणतीही तरतुद नाही. त्यानंतर अपिलार्थीस चुकीचे शुल्क कळवून त्यांच्याकडून शुल्क प्राप्त करुन घेतल्यानंतरच परत ३० दिवस इतका कालावधी घेऊन अपिलार्थीस दि. ३०.६.२००६ रोजी माहिती दिली. अपिलार्थीस त्यांनी दिलेल्या माहितीतील बरीचशी माहिती त्यांना आवश्यक नव्हती, तरीही ती तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी पुरविली आहे. अपिलार्थीने तसे आज आयोगासमोर सप्रमाण सिध्द करुनही दिले आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विहित मुदत संपून गेल्यानंतर, अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देणे क्रमप्राप्त होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती देऊ करुन त्यांनी शुल्क भरल्यानंतर एक महिन्यानंतर अपिलार्थीस माहिती देणे याचा, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास पुरेपूर टाळाटाळ केली, या शिवाय दुसरा अर्थ होऊ शकत नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर सशुल्क माहिती देण्याच्या त्यांच्या या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे. आज रोजी तत्कालीन तालुका निरीक्षक हे आयोगासमोर उपस्थित नाहीत, त्यामुळे असे आदेशित करण्यात येते की,संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्याप्रीत्यर्थ त्यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण ६६ दिवसांच्या विलंबाकरिता रु. १६,५००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील.

उपरोक्त प्रकरणी तहसीलदार, चांदवड यांनी देखील अपिलार्थी यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जावर निर्णय घेण्यासाठी ७० दिवस इतका विलंब लावल्याचे सप्रमाण सिध्द होत आहे, त्यामुळे महसूल आयुक्त, नाशिक यांना संबंधित तहसीलदार श्री. सरदेसाई

यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त झाली आहे व त्यांनी सुनावणीमध्ये तसे कबूलही केले आहे. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांना अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी घेतलेले शुल्क, माहिती देण्यासाठी विहित कालावधी नंतर घेतले असल्याने हे शुल्क अपिलार्थीस परत करणे त्यांना भाग आहे. सबब तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटी विहित मुदतीनंतर घेतलेले शुल्क रु.१४६/-हे आदेश निर्गमित होताच २४ तासांच्या आत त्यांना परत करावे. अपिलार्थीने आयोगाकडे त्यांनी मनमाड ते औरंगाबाद व परत या प्रवासाच्या खर्चाची मागणी केली आहे. वर वर्णन केलेल्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची ही मागणी मान्य करणे योग्य होईल, असे आयोगास निश्चितपणे वाटते, सबब अपिलार्थीस एकूण रु. २५५/- इतकी भरपाई तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अदा करावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. (अपिलार्थी आयोगाकडील सुनावणीस मोटारसायकलने आले असून त्यांना या प्रवासासाठी एकूण पाच लिटर पेट्रोल लागले, असे त्यांनी आयोगासमोर सांगितले. प्रतिलिटर साधारणतः रु. ५१/- असे गृहीत धरुन अपिलार्थीस तालुका निरीक्षक,भूमि अभिलेख यांच्याकडून एकूण रु.२५५/- देय ठरतात.) सदर आदेश तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांना अधिनियमातील कलम १९(८)(ख) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील मान्य करण्यात येत आहे.

२ तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी अपिलार्थीस त्यांच्या कडून घेतलेले माहितीपोटीचे शुल्क रु. १४६/-त्यांना हे आदेश निर्गमित होताच २४ तासांच्या आत परत करावे.

३ तालुका निरीक्षक,भूमी अभिलेख यांनी अपिलार्थीस या प्रकरणाची नुकसान भरपाई म्हणून रु.२५५/-इतकी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अदा करावी.

४ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रु. २५०/- याप्रमाणे एकूण ६६ दिवसांसाठी रुपये १६,५००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

५ महसूल आयुक्त, नाशिक यांना, उपरोक्त प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, चांदवड यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नंदकुमार किसन दरवडे, रा.नेहरु रोड, देनाबँकेजवळ मु.पो.मनमाड ता. नांदगाव

जि.नाशिक-४२३ १०४.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, चांदवड, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, चांदवड, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४९४

निर्णय दिनांक : २१-०८-२००८

१ श्री. महंमद शफी अकमलोद्दीन काझी, मु.पो.ता.अमळनेर, जि.जळगाव. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, अमळनेर, जि.जळगाव : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, जळगाव

त्रयस्थ पक्षः साफियोद्दीन फयाजोद्दीन, रा. अमळनेर, जि.जळगाव

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. महंमद शफी अकमलोद्दीन काझी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),श्री. पद्माकर देवचंद सोनवणे, जन माहिती अधिकारी तथा प्र.तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, अमळनेर, जि.जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्री. साफियोद्दीन फयाजोद्दीन (सदर व्यक्ती आज हयात नसल्याचे समजते) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२९.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री.साफियोद्दिन फयाजोद्दीन यांच्या अमळनेर येथील सि.स.नं.९६०/३ या मिळकतीबद्दल खालीलप्रमाणे माहिती मागितली होती

" अमळनेर येथील सि.स.नं.९६०/३ या मिळकतीवर दि. १७.३.२७ रोजी साफियोद्दिन फयाजोद्दीन यांचे नांव ज्या आदेशाने दाखल करण्यात आले त्या आदेशाची तसेच संबंधीताने दिलेल्या अर्जाची व जबाबाची नक्कल मिळावी. माहितीसाठी मिळकतपत्रीकेची मिळकतीचे रजिष्टरमधील नक्कल दिली आहे. "

अपिलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली कागदपत्रे आढळ होत नसल्याचे त्यांनी कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १३.०१.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलाची दि. १३.२.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २२.२.२००७ रोजी पारित केले. या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन व जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय चुकीचा वाटल्यावरुन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.०३.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, " तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, अमळनेर कार्यालयाकडील मिळकत नोंदवहीची छायाप्रत पहता नगर भूमापन क्रमांक ९६०/३ या मिळकतीवर श्री. शाफियोद्दीन फयाजोद्दीन यांचे नाव मूळ हक्क चौकशी वेळच्या निर्णयानुसार दि. १६.१०.१९२४ चे वाटणी पत्राने दाखल झाले असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत असल्याचे म.अधिक्षक,भूमि अभिलेख जळगाव यांचे लिहिणे लबाडीचे आहे. मूळ हक्क चौकशी दि. २६.१.१९२१ मध्येच झालेली

होती. मुळ हक्क चौकशीचे वेळी फयाजोद्दीन सकरोद्दीन यांचे नाव दाखल होते", असे म्हटले आहे. थोडक्यात त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय चुकीचा वाटत असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले असल्याचे म्हटले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगासमोर सादर केला असून, त्यामध्ये अमळनेर येथील मूळ चौकशी दि. १६.१०.१९२४ रोजी झालेली आहे, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून दि. १७.०३.१९२७ ची नोंद मिळकत रजिस्टरमध्ये किमान दहा वेळा तरी करण्यात आली व ही नोंद कशाच्या आधारे घेण्यात आली, याचा बोध होत नसल्याचे म्हटले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्यावर जिल्हा अधीक्षक,भूमि अभिलेख यांचे अनुक्रमे प्रथम पत्रावर व अपील निर्णयावर अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध कागदपत्रांवरुन माहिती पुरविण्यात आली आहे.

आज रोजी आयोगासमोर जन अपिलीय अधिकारी हे त्यांनी दिलेल्या निर्णयाचे स्पष्टीकरण करण्यासाठी हजर नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या शंकांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे उत्तरे नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या दि. १३.१.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी परत सुनावणी घेऊन या संदर्भात आपला निर्णय घेणे उचित ठरेल, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे आज आयोगाकडे दाखल केलेले लेखी म्हणणे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना देण्यात यावे व जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. १३.१.२००७ रोजीच्या अपील अर्जाची त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे म्हणणे लक्षात घेऊन, हे

आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत, परत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी राज्य माहिती आयोगाकडे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील करु शकतात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील निकाली काढण्यात येत आहे.

२ जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थींच्या प्रथम अपिलावर,त्यांनी आयोगाकडे उपस्थित केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जामधील मुद्यांची दखल घेऊन, हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत परत सुनावणी घेऊन, त्यासंबंधीचे आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. महंमद शफी अकमलोद्दीन काझी, काझीवाडा, वाडीचौक, अमळनेर, जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, अमळनेर जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४९५

निर्णय दिनांक २२-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. सुमन अशोक भुसारी,<br>मु. पो. सोनई, तालुका नेवासा,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप नोंदणी महानिरीक्षक व<br>उपमुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र शासन,<br>नाशिक विभाग, नाशिक | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक<br>नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,<br>पुणे – ०१ | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | सह जिल्हा निबंधक वर्ग-२ व प्रशासकीय अधिकारी, नोंदणी उप महानिरीक्षक कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक |
| | जन अपिलीय अधिकारी | : | नोंदणी उप महानिरीक्षक नाशिक विभाग, नाशिक |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. अशोक श्रीहरी भुसारी, अपिलार्थी सौ. सुमन अशोक भुसारी यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), सौ. चंद्रकला प्रमोद पुट्टा, जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२ व प्रशासकीय अधिकारी, नोंदणी उप महानिरीक्षक कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. बाबुराव गमाबा मनगटे, जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उप महानिरीक्षक नाशिक विभाग, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. भिमाजी नारायण गोसावी, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उप महानिरीक्षक नाशिक विभाग, नाशिक हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २३-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९८ सालामधील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित खालील माहितीची मागणी केली होती.

"१. माझे दि. ८/०७/९८ रोजीचे अर्जाची झेरॉक्स प्रत.

२. आपले कार्यालयीन पत्र क्र. - कक्ष-४/मु.वि./सोनई/९८/२१६८-६९ नाशिक दि. २४/११/९८ चे पत्राची झेरॉक्स प्रत.

३. मा. अवर सचिव, महसुल व वन विभाग यांनी आपणांस दिलेले पत्र क्र. - मुद्रांक - १०९८/४४०४/प्र.क्र. ७५६/म.१ दि. २८/९/९८ चे पत्राची झेरॉक्स प्रत.

४. मा. सह जिल्हा निबंधक वर्ग १ अहमदनगर यांनी आपणास दिलेले पत्र क्र. - सजिनि/नविन मु.वि.प/१०४१७ अहमदनगर दि. २७/१०/९८ चे पत्राची झेराक्स प्रत."

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या नस्त्यांमध्ये असणे अपेक्षित आहे त्या नस्त्या त्यांच्या कार्यालयात आढळ होत नसल्याने अपिलार्थीस ही माहिती देता येत नसल्याचे कळविले. अपिलार्थीस सदर पत्र त्यांनी साध्या पोस्टाने पाठविले. अपिलार्थीस हे पत्र त्यांनी पोस्टाने पाठविल्याप्रीत्यर्थ आवश्यक तो पुरावा म्हणून त्यांच्या कार्यालयाच्या नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील अर्ज नोंदणी महानिरीक्षक, पुणे यांच्याकडे केला, तथापि या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा सदर अपील अर्ज नोंदणी उप महानिरीक्षक, नाशिक, जे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत, त्यांच्याकडे दिनांक ११-१०-२००६ रोजीच्या पत्राव्दारे पाठविला. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-१०-२००६ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा त्यांच्याशी यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. तथापि या अपील अर्जाबरोबर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाची व प्रथम अपील अर्जाची झेरॉक्स प्रत जोडली नसल्याने राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद येथील कार्यालयाने त्यांना दिनांक १४-०५-२००८ रोजी या त्रुटीसंदर्भात कळविले असता

त्यांनी या त्रुटींची पुर्तता दिनांक २०-०५-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे केली. या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, महसूल व वन विभागाने दिनांक २०-११-२००६ रोजी आदेशित करुन देखिल माहिती प्राप्त न झाल्याने, सदर अपील आयोगाकडे करणे त्यांना भाग पडले, असे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास तसेच त्यांनी यासंदर्भात केलेल्या अपील अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिला गेला नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २८-०८-२००६ रोजीचे कथित पत्र त्यांना प्राप्त झालेले नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कोणत्याही कारणाशिवाय वंचित ठेवल्यामुळे त्यांचे व त्यांच्या परिवाराचे नुकसान झाले. त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना शासकीय कामाकरिता आवश्यक होती, तथापि सदर माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने त्याची परिणिती त्यांचे स्टॅम्प लायसन्स रद्द होण्यामध्ये झाली, व त्यामुळे त्यांच्या उपजीविकेचा मार्ग बंद झाला. जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती न दिल्याने व अपिलीय अधिका-याने अपिलाची सुनावणी न घेतल्यामुळे व त्यांचे नुकसान झाल्यामुळे संबंधित अधिका-यांवर जास्तीत जास्त शास्तीची कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्या या पदावर दिनांक २०-०५-२००८ पासून कार्यरत असून, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी श्री. दिलीप सुका चौधरी नावाचे अधिकारी कार्यरत होते. सध्या हे अधिकारी दुय्यम निबंधक नाशिक-४ या पदावर कार्यरत आहेत. अपिलार्थीने अर्ज करतेवेळी त्या या पदावर कार्यरत नसल्यामुळे, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस माहिती न देण्याची कारणे त्यांना आज ठाऊक नाहीत. अपिलार्थीने

मागणी केलेल्या ४ पत्रांच्या प्रतिंपैकी ३ पत्रांच्या प्रती त्यांनी अहमदनगर येथील कार्यालयाकडून मागवून घेतल्या असून, अपिलार्थीस त्या विनामूल्य देण्यासाठी त्या आज तयार आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या त्यांच्या अर्जातील अवर सचिव, महसूल व वन विभाग यांच्या दिनांक २८-०९-१९९८ च्या पत्राची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य देण्याची त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या अखेरीस तयारी दर्शविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे माहिती मागविली आहे ही माहितीच मूळात त्यांना आयोगाकडील सुनावणीपूर्वी ८ दिवस अगोदर कळली. त्यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची कल्पना आल्यानंतर त्यांनी त्यांच्या कार्यालयात शोध मोहीम सुरु केली, तथापि अपिलार्थीने मागणी केलेली पत्रे त्यांच्या कार्यालयात न सापडल्यामुळे त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अहमदनगर येथील कार्यालयाकडून अपिलार्थीने मागणी केलेल्या ४ पत्रांच्या प्रतिंपैकी ३ पत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेतल्या आहेत व त्या आज रोजी त्यांच्याकडे अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी उपलब्ध आहेत. अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज करतेवेळी ते या पदावर कार्यरत नसल्याने अपिलार्थीच्या अपील अर्जावर कारवाई न होण्याची कारणे त्यांना आज रोजी अवगत नाहीत.

तत्कालीन जन अपिलीय अधिकारी श्री. भिमाजी नारायण गोसावी (सध्या सेवानिवृत्त) यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीचा अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नाही, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही किंवा त्यांच्या अपील अर्जासंदर्भात कोठलाही प्रकारचा पत्रव्यवहार केला नाही जन माहिती अधिकारी यांचा हा मुद्दा आयोग अमान्य करीत आहे कारण सदर अपिल अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना त्यांच्या विभागाच्या पुणे कार्यालयाने दिनांक ११-१०-२००६ रोजी पाठविल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन सिध्द होत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीची व्याप्ती अतिशय मर्यादित व स्वरुप सोपे असे होते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांच्या कार्यक्षेत्रातील अहमदनगर येथील कार्यालयाशी संबंधित होती, त्यामुळे उपरोक्त प्रकरणी जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नव्हती तर त्याचवेळी ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अहमदनगर कार्यालयाशी संपर्क साधून, त्याप्रमाणे प्रयत्न केला असता तर, त्यांना ही माहिती अपिलार्थीस वेळीच पुरविता आली असती. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज दिनांक २३-०८-२००६ रोजी केला असून, आजतागायत म्हणजे सुमारे दोन वर्षांचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा ऑक्टोबर २००५ पासून अंमलात आणला गेल्यानंतरही ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही, हे पाहता ही माहिती अधिकार अधिनियमाची शोकांतिका आहे, असे या प्रकरणी म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यांना आवश्यक ती संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे यापर्यंतच्या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर जन माहिती अधिकारी अथवा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही प्रकारे सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २८-०८-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिल्याचे आयोगासमोर सांगितले व यासंदर्भात आवश्यक ती जावक नोंदवहीची संबंधित पृष्ठाची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे, यावरुन त्यांनी अपिलार्थीस हे पत्र पाठविल्याचे सिध्द होत आहे, तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीने माहितीची मागणी केल्यानंतर, अपिलार्थीस, संबंधित माहिती आढळ होत नाही, एवढे कळवून संबधित

जन माहिती अधिकारी मोकळे झाले, परंतु अपिलार्थीस त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागितलेली माहिती त्यांना एका विशिष्ट मुदतीत द्यावयाची आहे हे त्यांचे कर्तव्य मात्र त्यावेळी ते विसरल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले, तथापि त्यांनी देखिल वर युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, त्यांच्या कार्यालयामध्ये अपील अर्ज प्राप्त झाला नसल्याने अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही, अथवा त्यांच्याशी कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला नाही, त्यामुळे अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करावे लागले. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये असे स्पष्ट केले आहे की, त्यांच्या मूळ अर्जास व प्रथम अपील अर्जास अनुक्रमे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाने कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिला नाही, त्यांच्या पत्राची साधी पोचही दिली नाही, त्यांचे हे म्हणणे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन सिध्द झाले आहे. सुरुवातीला अपिलार्थीस माहिती आढळ होत नाही म्हणून जन माहिती अधिका-याने माहिती दिली नाही, मात्र राज्य माहिती आयोगाची नोटीस आल्यानंतर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी ७५ टक्के माहिती त्यांच्या अहमदनगर कार्यालयाकडून उपलब्ध करुन घेतली, हीच कारवाई अपिलार्थीचा प्रथम माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्याच्या वेळी केली असती तर कदाचित अपिलार्थीचा माहितीसाठीचा उद्देश सफल होऊन, त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या उपजीविकेचे साधन नष्ट होऊ शकले नसते. अशा प्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत, अथवा त्यानंतरही कोणतीही माहिती न पुरविण्याच्या, अथवा त्यांना कोणताही सकारात्मक प्रतिसाद न देण्याच्या त्यांच्या कृतीचे समर्थन कोणत्याही प्रकारे होऊ शकत नाही, असे आयोगाचे मत आहे.

माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागितल्यास त्यांना ३० दिवसाच्या आत माहिती देणे हा या अधिनियमाचा गाभा असून, या तत्त्वावरच माहिती अधिकार अधिनियमाची उभारणी झाली आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या मूळ तत्त्वासच, या दोन वर्षातील संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक प्रतिसाद न देऊन छेद दिला आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याशिवाय गत्यंतर नाही, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे, जेणेकरुन निदान आता तरी या विभागातील सर्व जन माहिती अधिकारी, माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जास किमान सकारात्मक प्रतिसाद देतील, अशी अपेक्षा आहे.

सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्याबद्दल विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण ४ पत्रांच्या प्रतिंपैकी, आज जन माहिती अधिकारी यांच्याकडे ३ पत्रांच्या प्रती उपलब्ध आहेत व उर्वरित एका पत्राची प्रत त्या हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत, हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे सध्या उपलब्ध असलेल्या ३ पत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात व अपिलार्थीच्या अर्जातील संदर्भिय

क्रमांक ३ व्दारे त्यांनी मागणी केलेल्या पत्राची प्रत हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहेत.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे सध्या उपलब्ध असलेल्या ३ पत्रांच्या प्रती ३ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात व अपिलार्थीच्या अर्जातील संदर्भिय क्रमांक ३ व्दारे मागणी केलेल्या पत्राची प्रत हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमा-व्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

औरंगाबाद
दिनांक २२-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. सुमन अशोक भुसारी, मु. पो. सोनई, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२ व प्रशासकीय अधिकारी, नोंदणी उप महानिरीक्षक कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. दिलीप सुका चौधरी, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२ व प्रशासकीय अधिकारी, नोंदणी उप महानिरीक्षक कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : नोंदणी उप महानिरीक्षक नाशिक विभाग, नाशिक) **By R. P. A. D.**

४ जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उप महानिरीक्षक नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४९७

निर्णय दिनांक २२-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जयराम दोधू धोबी, | : | अपिलार्थी |
| २ | श्री. संजय धोंडू चौधरी, | : | |
| ३ | श्री. अशोक वामन चौधरी, | : | |
| ४ | श्री. दिनेश सुरेश देवरे, | : | |
| | सर्व रा. सोनगीर, तालुका जिल्हा धुळे | | |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत,<br>सोनगीर, तालुका जिल्हा धुळे | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत<br>समिती, धुळे | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : (१) श्री. महेंद्र चंद्रवदन जैन (२) श्री. राजेंद्र कांडू माळी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. बाजीराव वामन सुर्यवंशी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, सोनगीर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. जयराम दोधू धोबी, श्री. संजय

धोंडू चौधरी, श्री. अशोक वामन चौधरी व श्री. दिनेश सुरेश देवरे, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धुळे व त्रयस्थ पक्ष श्री. महेंद्र चंद्रवदन जैन, श्री. राजेंद्र कोंडू माळी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ११-०४-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. आयोगाकडे दाखल केलेल्या या व्दितीय अपील अर्जामध्ये सर्व अपिलार्थींनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने हे अपील आयोगाकडे केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थींनी त्यांच्या दिनांक ०८-११-२००६ रोजीचे प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित एकूण ९ मुद्दयावर माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सोनगीर येथील १५-०८-२००५ पासून ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंतच्या मासिक मिटींगचे प्रोसिडींग बुक व ग्रामसभेचे प्रोसिडींग बुकची झेरॉक्स प्रत, मार्च २००६ मध्ये सोनगीर गावातील आठवडे व डेली बाजार व इतर झालेले लिलाव यांची नियमावली व ज्यांनी लिलाव घेतले त्यांची नांवे, पैसे भरल्याच्या पावतीची झेरॉक्स प्रत, सोनगीर ग्रामपंचायतीला मार्च २००६ ते मार्च २००७ पर्यंत प्राप्त झालेले गावातील उत्पन्न, सोनगीर ग्रामपंचायतीत कायमस्वरुपी कर्मचारी व रोजंदारी कर्मचारी यांना देण्यात येणारे मासिक वेतन व श्री. महेंद्र जैन व राजेंद्र माळी यांनी याच विषयासंदर्भात दिलेल्या अर्जाची प्रत - या माहितीचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थींना त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७०५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे या पत्राव्दारे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या सूचनेप्रमाणे अपिलार्थींनी दिनांक ०७-०५-२००७

रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रुपये ७०५ इतके शुल्क भरले व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना त्याच दिवशी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दिली. सदर माहिती वरील सर्व अपिलार्थींना दिनांक ०७-०५-२००७ रोजी मिळाल्याची पोच उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केली आहे.

परंतु मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली गेली असल्याचे अथवा अपिलार्थीस यासंदर्भात पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, मात्र तदनंतर म्हणजेच अपिलार्थीने त्यांचे दिनांक २८-०३-२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्यानंतर (या व्दितीय अपीलाची राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ११-०४-२००७ रोजी नोंदणी झाल्याचे दिसून येते.) अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०७-०५-२००७ रोजी आवश्यक ते शुल्क रुपये ७०५ इतक्या रकमेचा भरणा केला व सदर माहिती हस्तगत करुन घेतली. सदर माहिती त्यांना मिळाली असून याबाबत त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०७-०५-२००७ रोजीच्या पत्राच्या स्थळप्रतीवर लेखी पोच दिली आहे, हे पाहता अपिलार्थीस आता संपूर्ण माहिती आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्यानंतर मिळाल्याने व ही माहिती मिळण्यापूर्वीच त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याने, त्यांच्या व्दितीय अपील अर्जावर विचार करण्याचा कोणताही मुद्दा आता शिल्लक रहात नाही त्यामुळे त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील क्रमांक १४९७/०७ दिनांक ११-०४-२००७ हे फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २२-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जयराम दोधू धोबी, रा. सोनगीर, तालुका जिल्हा धुळे.

२ श्री. संजय धोंडू चौधरी, रा. सोनगीर, तालुका जिल्हा धुळे.

३ श्री. अशोक वामन चौधरी, रा. सोनगीर, तालुका जिल्हा धुळे.

४ श्री. दिनेश सुरेश देवरे, रा. सोनगीर, तालुका जिल्हा धुळे

५ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, सोनगीर, तालुका जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५३६, १५३७, १५३८, १५३९ व १५४०

निर्णय दिनांक २५-०८-२००८

१ श्री. चौधरी नरेंद्र बारकू, : अपिलार्थी
दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट,
तळमजला, राणाप्रताप चौक, मनपासमोर,
धुळे

विरुध्द

| | जन माहिती अधिकारी | | जन अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार (अपील क्रमांक १५३६/२००७) | १ | उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार |
| २ | उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १, सुरगाणा, जिल्हा नाशिक | २ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (रोहयो), नाशिक |
| ३ | वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, लघुसिंचन, शिरपूर, जिल्हा धुळे (अपील क्रमांक १५३८/२००७) | ३ | उपविभागीय अधिकारी, लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, शिरपूर, जिल्हा धुळे |
| ४ | उप अभियंता, जिल्हा परिषद, | ४ | कार्यकारी अभियंता, जिल्हा |

| | | | |
|---|---|---|---|
| | बांधकाम उपविभाग, साक्री, जिल्हा धुळे (अपील क्रमांक १५३९/०७) | | परिषद बांधकाम, धुळे |
| ५ | उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, सुरगाणा, जिल्हा नाशिक (अपील क्रमांक १५४०/२००७) | ५ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (रोहयो), नाशिक |

## निर्णय

वरील पाच प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २५-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. शांताराम राजाराम कापडी, जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक १ असे संबोधण्यात येईल), श्री. मनोहर बद्रीनाथ देवरे, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १ सुरगाणा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक २ असे संबोधण्यात येईल), श्री. मोहन वाल्मीक सोनवणे, जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, लघुसिंचन, शिरपूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ३ असे संबोधण्यात येईल), श्री. उदयसिंग दोधुसिंग राजपूत, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, साक्री (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ४ असे संबोधण्यात येईल), श्री. चंद्रसिंग गुलाबसिंग पाटील, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उपविभाग क्रमांक २ सुरगाणा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ५ असे संबोधण्यात येईल), श्री. जगन्नाथ देविदास पाटील, जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक १ असे संबोधण्यात येईल), श्री. कृपाशंकर विठ्ठल जिरे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर), नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक २ असे संबोधण्यात येईल), श्री. सुरेश एकनाथ शिंपी, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, शिरपूर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक ३ असे संबोधण्यात येईल), श्री. सुधाकर शांताराम सांगळे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम, धुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक ४ असे संबोधण्यात येईल) व श्री. कृपाशंकर विठ्ठल जिरे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर), नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक ५ असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. चौधरी नरेंद्र बारकू हे गैरहजर आहेत.

अपील क्रमांक १५३६/२००७ मधील जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा यांचेकडून अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्ते विकास कामांसंदर्भात ०१ एप्रिल २००५ ते ०१ सप्टेबर २००६ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

“आपल्या उपविभागामार्फत वरील कालावधीत करण्यात आलेल्या रस्ते विकास कामांची माहिती खालील नमुन्यात द्यावी. १) कामाचे नांव, २) योजनेचे नांव ३) अंदाजपत्रकीय रक्कम ४) मंजूर रक्कम ५) प्रत्यक्ष झालेला खर्च ६) कामांची सद्यस्थिती ७) संबंधीत कामावर देखरेख करणा-या अधिकारी यांचे नाव ८) संबंधीत काम करणा-या ठेकेदार / एजन्सीचे नांव ९) कामाच्या सर्वसाधारण वर्णनाची प्रत १०) कामाचे बिल अदा केले गेले असल्यास धनादेशचा नंबर व रकमेचा तपशील आदि माहिती.”

अपिलार्थी यांनी हीच माहिती इतर ४ जन माहिती अधिकारी यांचेकडून पुढीलप्रमाणे मागितली होती.

अपील क्रमांक १५३७ मधील जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १ सुरगणा यांच्याकडे दिनांक ११-०८-२००६ रोजी, अपील क्रमांक १५३८ मधील जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, लघुसिंचन, शिरपूर यांच्याकडे दिनांक ०७-०८-२००६ रोजी, अपील क्रमांक १५३९ मधील जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, साक्री यांच्याकडे दिनांक ०७-०८-२००६ रोजी व अपील क्रमांक १५४० मधील जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २ सुरगणा यांचेकडे ११-०८-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत किंवा शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या अर्जांना एकूण ५ जन माहिती अधिका-यांपैकी उप अभियंता लघुसिंचन उपविभाग पंचायत समिती, शिरपूर यांनी अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीत अपिलार्थीस माहिती पुरवून प्रतिसाद दिला आहे, उर्वरित चार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती, अक्कलकुवा, उप अभियंता, पंचायत समिती, साक्री व उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २ सुरगाणा यांनी अपिलार्थीस अनुक्रम्र ६०० रुपये ५८ रुपये व १० रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्यासंबंधाने त्यांच्याकडील पत्र दिनांक ३०-१२-२००६, १६-०९-२००६ व दिनांक १६-०९-२००६ रोजी कळविले तर उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग १ सुरगाणा यांनी त्यांचेकडील दिनांक १५-११-२००६ च्या पत्राव्दारे माहिती विस्तृत असल्याने ती तयार करण्यासाठी वेळ लागेल असे अपिलार्थीस कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९

(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता बांधकाम उपविभाग पंचायत समिती अक्कलकुवा, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम रोहयो, नाशिक, लघुसिंचन उपविभाग पंचायत समिती शिरपूर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग रोहयो, नाशिक यांच्याकडे अनुक्रमे दिनांक ०६-११-२००६, १३-१०-२००६, २८-०९-२००६, २२-०९-२००६ व दिनांक १३-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या पाच प्रथम अपिलापैकी चार अपिलांवर उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा, उप अभियंता लघुसिंचन पंचायत समिती, शिरपूर, उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, साक्री व कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम रोहयो, नाशिक या जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही परंतु जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याबद्दल सांगितले तर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग रोहयो नाशिक यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १ सुरगणाशी संबंधित अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती देण्यासंबंधी जन माहिती अधिकारी यांना दिनांक १५-११-२००६ रोजी आदेशित केले.

वरील सर्व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे अनुक्रमे अपील क्रमांक १५३६ शी संबंधीत दिनांक ०६-०२-२००७ रोजी, अपील क्रमांक १५३७ शी संबंधीत दिनांक १५-०१-२००७ रोजी, अपील क्रमांक १५३८ शी संबंधीत दिनांक २७-११-२००६ रोजी, अपील क्रमांक १५३९ शी संबंधीत दिनांक २७-११-२००६ रोजी व अपील क्रमांक १५४० शी संबंधीत दिनांक १२-०१-२००७ रोजी अशी एकूण पाच व्दितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

प्रत्येक जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे खालील प्रमाणे युक्तिवाद करण्यात आला.

कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा मूळ अर्ज दिनांक ११-०९-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थी यांना दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे माहितीसाठीचे शुल्क रुपये ६०० भरण्यास सांगितले. तथापि त्यांनी ते न भरल्यामुळे त्यांना माहिती दिली नाही.

उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग १ सुरगाणा (आता संकल्पचित्र विभाग, नाशिक) यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०८-२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात दिनांक १५-११-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे ती तयार करण्यास वेळ लागेल असे सांगितले, तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे केलेल्या अर्जसंदर्भात दिनांक १४-११-२००६ रोजी त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाली असल्याचे कारण दर्शविले होते. याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता, मूळ माहितीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ९ व १० ची माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याबद्दलचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी आयोगासमोर सादर करु शकले नाहीत यावरुन त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे सिध्द होत आहे.

वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, लघुसिंचन, शिरपूर यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७-०८-२००६ रोजीच्या अर्जास दिनांक १७-०८-

२००६ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक माहिती पुरविली. तसेच माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक २८-०९-२००६ रोजीच्या अपिलासंदर्भात पुन्हा दिनांक ०३-१०-२००६ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली. त्यासंबंधी त्यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीतील नोंदी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविल्या. यावरुन त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, साक्री यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक ०७-०८-२००६ रोजीच्या अर्जासंदर्भात दिनांक १६-०९-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन माहितीसाठीचे शुल्क रुपये ५८ भरण्यास कळविले, तथापि सदर प्रतिसाद विहित मुदतीनंतर दिल्याने त्यांनी अपिलार्थीस अंतिमतः दिनांक ०३-११-२००६ रोजी विनामूल्य माहिती दिली असल्याचे आयोगास अवगत केले.

उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २ सुरगाणा यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक ११-०८-२००६ रोजीच्या अर्जासंदर्भात, त्यांनी दिनांक १६-०९-२००७ रोजी माहितीसाठीचे शुल्क रुपये १० भरण्याचे कळविले व दिनांक १०-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती पाठविली. सदर माहिती दिनांक १५-११-२००६ रोजी अपिलार्थीस प्राप्त झाल्याची पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे या पाचही अपील प्रकरणात कोणताही युक्तिवाद करण्यात आला नाही.

वरील पाचही अपिलांसंदर्भातील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, वरील पाचही प्रकरणापैकी अपील क्रमांक १५३८

वगळता उर्वरित चारही अपिलामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील विहित केलेल्या मुदतीनंतर दिलेला आहे, अपील क्रमांक १५३७ मध्ये अपूर्ण माहिती पाठविली असल्याचे व उशीरा माहिती दिल्याचे आढळले असून माहिती पाठविल्याचे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर दाखवू शकले नाहीत. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती सरळ व सोप्या स्वरुपातील असतांनाही अपील क्रमांक १५३८ वगळता उर्वरित चारही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती पुरविली असल्याचे आढळून येत नाही. या चारही जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थीस अधिनियमातील विहित मुदतीत माहिती न पुरवून तर काही प्रकरणी अपूर्ण माहिती पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वत:ला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार व सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना अनुक्रमे कनिष्ठ अभियंता, बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, अक्कलकुवा व उर्वरित तीनही जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्याविरुध्द प्रचलीत सेवानियमानुसार आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करण्याची आयोगातर्फे शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे आदेशित करण्यात येते की, कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ८ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग १ सुरगाणा (सध्या संकल्पचित्र विभाग, नाशिक) यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ व १० मधील उर्वरित माहिती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपील क्रमांक १५३९ व १५४० मध्ये संबंधीत जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग,

साक्री व उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २ सुरगाणा यांनी अपिलार्थीस अनुक्रमे ५७ व ६४ दिवस उशीराने माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. याबद्दल वरील परिच्छेदात निर्देशित केल्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमातील कलम २० (२) नुसार कारवाईची शिफारस करण्यात आली आहे. संबंधीत दोन्ही प्रकरणी अपिलार्थीस माहिती मिळाली असल्यामुळे अपिलार्थीस पुन्हा माहिती देण्यासंबंधी कोणतेही आदेश नाहीत. वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, लघुसिंचन, शिरपूर यांनी अपिलार्थी यांना २ वेळा माहिती पुरविली असून सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत पुरविली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सप्रमाण सिध्द केले असल्याने व सदर युक्तिवादाचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर हजर नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेला पुरावा लक्षात घेऊन अपिलार्थी यांचे अपील क्रमांक १५३८ फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील क्रमांक १५३६, १५३७, १५३९ व १५४० ही मान्य करण्यात येत आहेत व अपील क्रमांक १५३८ हे फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक १५३६, १५३७, १५३९ व १५४० मान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १५३८ फेटाळण्यात येत आहे.

३. कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ८ दिवसाच्या आत त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती व उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १ सुरगाणा यांनी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दे क्रमांक ९ व १० संबंधीची उर्वरित माहिती ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना उपरोक्त प्रकरणी कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्याविरुध्द प्रचलीत सेवानियमानुसार आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करण्याची आयोगातर्फे शिफारस करण्यात येत आहे.

५. सचिव (सार्वजनिक बांधकाम) मंत्रालय, मुंबई यांना उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १ व २ सुरगाणा व उप अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती साक्री यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्याविरुध्द प्रचलीत सेवानियमानुसार आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करण्याची आयोगातर्फे शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २५-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चौधरी नरेंद्र बारकू, दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट, तळमजला, राणाप्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार (अपील क्रमांक १५३६/२००७) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १, सुरगाणा, जिल्हा नाशिक (अपील क्रमांक १५३७/२००७) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, लघुसिंचन,

शिरपूर, जिल्हा धुळे (अपील क्रमांक १५३८/२००७) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, साक्री, जिल्हा धुळे (अपील क्रमांक १५३९/०७) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, सुरगाणा, जिल्हा नाशिक (अपील क्रमांक १५४०/२००७) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (रोहयो), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, शिरपूर, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० जन अपिलीय अधिकारी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम, धुळे तथा यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

११ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (रोहयो), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१२ सचिव (ग्रामविकास विभाग) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१३ सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१४ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १, सुरगाणा, जिल्हा नाशिक (अपील क्रमांक १५३७/२००७) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक)

१५ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, सुरगाणा, जिल्हा नाशिक (अपील क्रमांक १५४०/२००७) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक)

१६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५३६, १५३७, १५३८, १५३९ व १५४०

निर्णय दिनांक २५-०८-२००८

१ श्री. चौधरी नरेंद्र बारकू, : अपिलार्थी
दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट,
तळमजला, राणाप्रताप चौक, मनपासमोर,
धुळे

विरुध्द

| | जन माहिती अधिकारी | | जन अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार (अपील क्रमांक १५३६/२००७) | १ | उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार |
| २ | उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १, सुरगाणा, जिल्हा नाशिक | २ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (रोहयो), नाशिक |
| ३ | वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, लघुसिंचन, शिरपूर, जिल्हा धुळे (अपील क्रमांक १५३८/२००७) | ३ | उपविभागीय अधिकारी, लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, शिरपूर, जिल्हा धुळे |
| ४ | उप अभियंता, जिल्हा परिषद, | ४ | कार्यकारी अभियंता, जिल्हा |

| | | | |
|---|---|---|---|
| | बांधकाम उपविभाग, साक्री, जिल्हा धुळे (अपील क्रमांक १५३९/०७) | | परिषद बांधकाम, धुळे |
| ५ | उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, सुरगाणा, जिल्हा नाशिक (अपील क्रमांक १५४०/२००७) | ५ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (रोहयो), नाशिक |

## निर्णय

वरील पाच प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २५-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. शांताराम राजाराम कापडी, जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक १ असे संबोधण्यात येईल), श्री. मनोहर बद्रीनाथ देवरे, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १ सुरगाणा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक २ असे संबोधण्यात येईल), श्री. मोहन वाल्मीक सोनवणे, जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, लघुसिंचन, शिरपूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ३ असे संबोधण्यात येईल), श्री. उदयसिंग दोधुसिंग राजपूत, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, साक्री (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ४ असे संबोधण्यात येईल), श्री. चंद्रसिंग गुलाबसिंग पाटील, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उपविभाग क्रमांक २ सुरगाणा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ५ असे संबोधण्यात येईल), श्री. जगन्नाथ देविदास पाटील, जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक १ असे संबोधण्यात येईल), श्री. कृपाशंकर विठ्ठल जिरे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर), नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक २ असे संबोधण्यात येईल), श्री. सुरेश एकनाथ शिंपी, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, शिरपूर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक ३ असे संबोधण्यात येईल), श्री. सुधाकर शांताराम सांगळे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम, धुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक ४ असे संबोधण्यात येईल) व श्री. कृपाशंकर विठ्ठल जिरे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर), नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी क्रमांक ५ असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. चौधरी नरेंद्र बारकू हे गैरहजर आहेत.

अपील क्रमांक १५३६/२००७ मधील जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा यांचेकडून अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्ते विकास कामांसंदर्भात ०१ एप्रिल २००५ ते ०१ सप्टेबर २००६ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

"आपल्या उपविभागामार्फत वरील कालावधीत करण्यात आलेल्या रस्ते विकास कामांची माहिती खालील नमुन्यात द्यावी. १) कामाचे नांव, २) योजनेचे नांव ३) अंदाजपत्रकीय रक्कम ४) मंजूर रक्कम ५) प्रत्यक्ष झालेला खर्च ६) कामांची सद्यस्थिती ७) संबंधीत कामावर देखरेख करणा-या अधिकारी यांचे नाव ८) संबंधीत काम करणा-या ठेकेदार / एजन्सीचे नांव ९) कामाच्या सर्वसाधारण वर्णनाची प्रत १०) कामाचे बिल अदा केले गेले असल्यास धनादेशचा नंबर व रकमेचा तपशील आदि माहिती."

अपिलार्थी यांनी हीच माहिती इतर ४ जन माहिती अधिकारी यांचेकडून पुढीलप्रमाणे मागितली होती.

अपील क्रमांक १५३७ मधील जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १ सुरगणा यांच्याकडे दिनांक ११-०८-२००६ रोजी, अपील क्रमांक १५३८ मधील जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, लघुसिंचन, शिरपूर यांच्याकडे दिनांक ०७-०८-२००६ रोजी, अपील क्रमांक १५३९ मधील जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, साक्री यांच्याकडे दिनांक ०७-०८-२००६ रोजी व अपील क्रमांक १५४० मधील जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २ सुरगणा यांचेकडे ११-०८-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत किंवा शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या अर्जांना एकूण ५ जन माहिती अधिका-यांपैकी उप अभियंता लघुसिंचन उपविभाग पंचायत समिती, शिरपूर यांनी अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीत अपिलार्थीस माहिती पुरवून प्रतिसाद दिला आहे, उर्वरित चार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती, अक्कलकुवा, उप अभियंता, पंचायत समिती, साक्री व उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २ सुरगाणा यांनी अपिलार्थीस अनुक्रम्र ६०० रुपये ५८ रुपये व १० रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्यासंबंधाने त्यांच्याकडील पत्र दिनांक ३०-१२-२००६, १६-०९-२००६ व दिनांक १६-०९-२००६ रोजी कळविले तर उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग १ सुरगाणा यांनी त्यांचेकडील दिनांक १५-११-२००६ च्या पत्राव्दारे माहिती विस्तृत असल्याने ती तयार करण्यासाठी वेळ लागेल असे अपिलार्थीस कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९

(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता बांधकाम उपविभाग पंचायत समिती अक्कलकुवा, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम रोहयो, नाशिक, लघुसिंचन उपविभाग पंचायत समिती शिरपूर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग रोहयो, नाशिक यांच्याकडे अनुक्रमे दिनांक ०६-११-२००६, १३-१०-२००६, २८-०९-२००६, २२-०९-२००६ व दिनांक १३-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या पाच प्रथम अपिलापैकी चार अपिलांवर उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा, उप अभियंता लघुसिंचन पंचायत समिती, शिरपूर, उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, साक्री व कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम रोहयो, नाशिक या जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही परंतु जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याबद्दल सांगितले तर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग रोहयो नाशिक यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १ सुरगणाशी संबंधित अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती देण्यासंबंधी जन माहिती अधिकारी यांना दिनांक १५-११-२००६ रोजी आदेशित केले.

वरील सर्व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे अनुक्रमे अपील क्रमांक १५३६ शी संबंधीत दिनांक ०६-०२-२००७ रोजी, अपील क्रमांक १५३७ शी संबंधीत दिनांक १५-०१-२००७ रोजी, अपील क्रमांक १५३८ शी संबंधीत दिनांक २७-११-२००६ रोजी, अपील क्रमांक १५३९ शी संबंधीत दिनांक २७-११-२००६ रोजी व अपील क्रमांक १५४० शी संबंधीत दिनांक १२-०१-२००७ रोजी अशी एकूण पाच व्दितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

प्रत्येक जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे खालील प्रमाणे युक्तिवाद करण्यात आला.

कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा मूळ अर्ज दिनांक ११-०९-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थी यांना दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे माहितीसाठीचे शुल्क रुपये ६०० भरण्यास सांगितले. तथापि त्यांनी ते न भरल्यामुळे त्यांना माहिती दिली नाही.

उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग १ सुरगाणा (आता संकल्पचित्र विभाग, नाशिक) यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०८-२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात दिनांक १५-११-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे ती तयार करण्यास वेळ लागेल असे सांगितले, तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे केलेल्या अर्जसंदर्भात दिनांक १४-११-२००६ रोजी त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाली असल्याचे कारण दर्शविले होते. याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता, मूळ माहितीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ९ व १० ची माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याबद्दलचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी आयोगासमोर सादर करु शकले नाहीत यावरुन त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे सिध्द होत आहे.

वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, लघुसिंचन, शिरपूर यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७-०८-२००६ रोजीच्या अर्जास दिनांक १७-०८-

२००६ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक माहिती पुरविली. तसेच माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक २८-०९-२००६ रोजीच्या अपिलासंदर्भात पुन्हा दिनांक ०३-१०-२००६ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली. त्यासंबंधी त्यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीतील नोंदी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविल्या. यावरुन त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, साक्री यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक ०७-०८-२००६ रोजीच्या अर्जासंदर्भात दिनांक १६-०९-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन माहितीसाठीचे शुल्क रुपये ५८ भरण्यास कळविले, तथापि सदर प्रतिसाद विहित मुदतीनंतर दिल्याने त्यांनी अपिलार्थीस अंतिमतः दिनांक ०३-११-२००६ रोजी विनामूल्य माहिती दिली असल्याचे आयोगास अवगत केले.

उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २ सुरगाणा यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक ११-०८-२००६ रोजीच्या अर्जासंदर्भात, त्यांनी दिनांक १६-०९-२००७ रोजी माहितीसाठीचे शुल्क रुपये १० भरण्याचे कळविले व दिनांक १०-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती पाठविली. सदर माहिती दिनांक १५-११-२००६ रोजी अपिलार्थीस प्राप्त झाल्याची पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे या पाचही अपील प्रकरणात कोणताही युक्तिवाद करण्यात आला नाही.

वरील पाचही अपिलांसंदर्भातील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, वरील पाचही प्रकरणापैकी अपील क्रमांक १५३८

वगळता उर्वरित चारही अपिलामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील विहित केलेल्या मुदतीनंतर दिलेला आहे, अपील क्रमांक १५३७ मध्ये अपूर्ण माहिती पाठविली असल्याचे व उशीरा माहिती दिल्याचे आढळले असून माहिती पाठविल्याचे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर दाखवू शकले नाहीत. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती सरळ व सोप्या स्वरुपातील असतांनाही अपील क्रमांक १५३८ वगळता उर्वरित चारही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती पुरविली असल्याचे आढळून येत नाही. या चारही जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थीस अधिनियमातील विहित मुदतीत माहिती न पुरवून तर काही प्रकरणी अपूर्ण माहिती पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वत:ला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार व सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना अनुक्रमे कनिष्ठ अभियंता, बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, अक्कलकुवा व उर्वरित तीनही जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्याविरुध्द प्रचलीत सेवानियमानुसार आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करण्याची आयोगातर्फे शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे आदेशित करण्यात येते की, कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ८ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग १ सुरगाणा (सध्या संकल्पचित्र विभाग, नाशिक) यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ व १० मधील उर्वरित माहिती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपील क्रमांक १५३९ व १५४० मध्ये संबंधीत जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग,

साक्री व उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २ सुरगाणा यांनी अपिलार्थीस अनुक्रमे ५७ व ६४ दिवस उशीराने माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. याबद्दल वरील परिच्छेदात निर्देशित केल्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमातील कलम २० (२) नुसार कारवाईची शिफारस करण्यात आली आहे. संबंधीत दोन्ही प्रकरणी अपिलार्थीस माहिती मिळाली असल्यामुळे अपिलार्थीस पुन्हा माहिती देण्यासंबंधी कोणतेही आदेश नाहीत. वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, लघुसिंचन, शिरपूर यांनी अपिलार्थी यांना २ वेळा माहिती पुरविली असून सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत पुरविली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सप्रमाण सिध्द केले असल्याने व सदर युक्तिवादाचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर हजर नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेला पुरावा लक्षात घेऊन अपिलार्थी यांचे अपील क्रमांक १५३८ फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील क्रमांक १५३६, १५३७, १५३९ व १५४० ही मान्य करण्यात येत आहेत व अपील क्रमांक १५३८ हे फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक १५३६, १५३७, १५३९ व १५४० मान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १५३८ फेटाळण्यात येत आहे.

३. कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ८ दिवसाच्या आत त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती व उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १ सुरगाणा यांनी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दे क्रमांक ९ व १० संबंधीची उर्वरित माहिती ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना उपरोक्त प्रकरणी कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्याविरुध्द प्रचलीत सेवानियमानुसार आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करण्याची आयोगातर्फे शिफारस करण्यात येत आहे.

५. सचिव (सार्वजनिक बांधकाम) मंत्रालय, मुंबई यांना उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १ व २ सुरगाणा व उप अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती साक्री यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्याविरुध्द प्रचलीत सेवानियमानुसार आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करण्याची आयोगातर्फे शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २५-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चौधरी नरेंद्र बारकू, दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट, तळमजला, राणाप्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार (अपील क्रमांक १५३६/२००७) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १, सुरगाणा, जिल्हा नाशिक (अपील क्रमांक १५३७/२००७) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, लघुसिंचन,

शिरपूर, जिल्हा धुळे (अपील क्रमांक १५३८/२००७) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, साक्री, जिल्हा धुळे (अपील क्रमांक १५३९/०७) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, सुरगाणा, जिल्हा नाशिक (अपील क्रमांक १५४०/२००७) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (रोहयो), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, शिरपूर, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० जन अपिलीय अधिकारी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम, धुळे तथा यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

११ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (रोहयो), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१२ सचिव (ग्रामविकास विभाग) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१३ सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१४ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १, सुरगाणा, जिल्हा नाशिक (अपील क्रमांक १५३७/२००७) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक)

१५ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, सुरगाणा, जिल्हा नाशिक (अपील क्रमांक १५४०/२००७) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक)

१६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपीले

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५४१, १५४२ व १५४३

निर्णय दिनांक २५-०८-२००८

१ श्री. प्रशांत व्यंकटराव हिरे, : अपिलार्थी

'मधुरमुरली' महावीरनगर, मालेगाव कॅम्प,

जिल्हा नाशिक

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :

तथा इमारत पर्यवेक्षक,

नगर रचना विभाग, मालेगाव

महानगरपालिका, मालेगाव,

जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा नगर रचनाकार,

मालेगाव महानगरपालिका, मालेगाव,

जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २५-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. जयपाल लक्ष्मण त्रिभुवन, जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, नगर रचना विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. राजेंद्र

काशीनाथ बावीस्कर, जन अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. प्रशांत व्यंकटराव हिरे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ११-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे स. नं. २९८, ३५२/१-२ प्लॉट क्रमांक ९४ यातील प्लॉट क्रमांक १, २, ३ व ४ यावरील शिवनेरी कॉम्प्लेक्स आणि बॅ. गोपालचंद्र संकुल या इमारतीच्या बांधकामासंदर्भात तीन वेगवेगळ्या अर्जांव्दारे सन १९९५ – २००५ या कालावधीतील खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

१. अपील क्रमांक १५४१/२००७

" मला सार्वजनिक हिताच्यादृष्टीने खालील माहिती पाहिजे आहे, ती मिळावी.

१. संगमेश्वर वार्डामधील स. नं. २९८, ३५२/१-२ फायनल प्लॉट क्रमांक १ अशी २, ३, ४ या क्षेत्रापैकी किती क्षेत्रावर बांधकाम करण्यास महापालिकेने परवानगी दिलेली आहे. तसेच येथे नियमानुसार किती क्षेत्रावर बांधकाम करता येते.

२. महापालिकेच्या परवानगीनुसार संबंधितांने किती क्षेत्रावर बांधकाम केलेले आहे.

३. प्लॉट क्रमांक २, ३, ४ या मिळकतीचे भोगवटाप्रमाण पत्राची प्रत.

४. या इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्याचे प्रमाण पत्र दिले आहे काय ? असल्याची या प्रमाण पत्राची नक्कल.

५. भोगवटा प्रमाण पत्र मिळण्यापुर्वीच इमारतीचा वाणिज्य वापर करण्यात आला हे खरे आहे काय ?

६. असल्यास, महापालिकेने काय कारवाई केली त्याचे स्पष्टीकरण व महापालिकेची भुमिका काय आहे ? ”

२. अपील क्रमांक १५४२/२००७

“ मला सार्वजनिक हिताच्यादृष्टीने खालील माहिती पाहिजे आहे, ती मिळावी.

“१. स. नं. २९८, ३५२/१-२ यावर बांधलेल्या बॅ. गोपालचंद्र संकुल आणि शिवनेरी कॉम्पलेक्स या इमारतीचे बांधकाम नियमाबाह्य पध्दतीने करण्यांत आले हे खरे आहे का ?

२. असल्यास शिवनेरी कॉम्पलेक्स या इमारतीच्या तळघराचे पॅलेस बंद करुन वाणिज्य वापर करीत असल्याने तसेच हे बांधकाम मंजुरी देण्यांत आलेल्या बांधकामाव्यतिरिक्त असल्याने हे त्वरीत काढून घ्यावे म्हणून मा. आयुक्त यांनी जा. क्र. २८२/०५-०६, दि. २९/६/२००५ अन्वये शिवा डेव्हलपर्स, संगमेश्वर, मालेगांव यांना नोटीस दिली हेही खरे आहे का ?

३. वरील बाब (२) मधील बेकायदेशिर बांधकाम काढून घेण्यांत आले नाही तर नियमानुसार कडक कारवाई करण्यांचा इशारा दि. २९/६/२००५ चे पत्राप्रमाणे मा. आयुक्त यांना दिला होता हेही खरे आहे का ?

४. असल्यास, हे अतिक्रमण/बेकायदेशिर बांधकाम काढून टाकण्यात आले आहे का ?

५. नियमबाह्य बांधकाम केले प्रकरणी काय कारवाई करण्यांत आली वा येते आहे.

६. अद्याप कारवाई केली नसल्यास ती का करण्यांत आलेली नाही विलंबाचे कारण काय ?

७. ही कारवाई केव्हापर्यंत करण्यांत येईल ? ”

३. अपील क्रमांक १५४३/२००७

" मला सार्वजनिक हिताच्यादृष्टीने खालील माहिती पाहिजे आहे, ती मिळावी.

१. मालेगांव महानगरपालिकेच्या हद्दीतीतल सर्व्हे नं. २९८, ३५२/१-२ वरील शिवनेरी कॉम्पलेक्स आणि बॅ. गोपालचंद्र संकुल या इमारतीचे बांधकाम मंजुर क्षेत्रापेक्षा अधिक जागेवर करण्यांत आले हे खरे आहे काय ?

२. सदरहु बाब निदर्शनास आल्यानंतर मालेगांव महानगरपालिकेने अतिक्रमण करणा-यांविरुध्द काय कारवाई केली.

३. अतिक्रमीत बांधकामाची चौकशी करुन कारवाई करण्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडून तसेच जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडून मालेगांव महापालिकेस आदेश देण्यांत आले, हे देखील खरे आहे काय ?

४. मालेगांव महानगरपालिकेने नगरविकास विभाग तसेच जिल्हाधिकारी, नाशिक यांना यासंदर्भात कारवाई करुन अहवाल पाठविला आहे का ?

५. असल्यास या अहवालाची प्रत.

६. अहवाल पाठविला नसल्यास तो का पाठविला नाही ? त्याचे कारण काय ? आणि हा अहवाल केव्हा पाठविण्यांत येईल. "

अपिलार्थीने वरील तीनही अर्जाव्दारे मागितलेली माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचे वरील तीनही दिनांक ११-१२-२००६ रोजीचे अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-१२-२००६ रोजी प्राप्त झाले. अपिलार्थीच्या या तीनही अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील अनुक्रमे दिनांक १२-०१-२००७ रोजीच्या एका व दिनांक १६-०१-२००७ रोजीच्या दोन स्वतंत्र पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील

कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार या तीनही अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे ३ वेगवेगळी प्रथम अपीले दिनांक ०६-०२-२००७ रोजी दाखल केली. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०२-२००७ रोजी प्राप्त झाले. अपिलार्थीने या अपील अर्जांमध्ये त्यांनी संदर्भित केलेल्या बांधकामावर मनपाकडून कारवाई अपेक्षित केली होती व सदर कारवाई का करण्यात आली नाही याची कारणे जन अपिलीय अधिकारी यांना विचारलेली होती.

अपिलार्थीच्या या तीनही अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले आदेश दिनांक ०८-०३-२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीची तीनही प्रथम अपीले, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली असल्याने नामंजूर केली.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०४-२००७ रोजी तीन स्वतंत्र व्दितीय अपीले केली आहेत. सदर अपिलांची नोंद राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २०-०४-२००७ रोजी झालेली आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना समाधानकारक माहिती दिली नाही, तसेच त्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करुन त्यांना अपूर्ण माहिती दिली असल्याचे नमूद केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी पुढे जिल्हाधिकारी यांचे आदेश होऊनही बेकायदेशीर काम करणा-या विरुध्द कारवाई का होत नाही, ही माहिती देण्याचे नाकारले, कारवाई करण्याची नस्ती आढळ होत नाही असे लेखी उत्तराव्दारे नमूद करुन त्यांना माहिती देण्याचे नाकारले असे म्हटले आहे. तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये अतिक्रमणधारकांवर केंव्हा कारवाई होईल व आजपर्यंत का झाली नाही याची वस्तुनिष्ठ उत्तरे त्यांना मिळाली नसल्याचे नमूद केले आहे, सामान्य नागरिकांवर अतिक्रमण / नियमबाह्य बांधकामांसाठी विनाविलंब व तात्काळ

कारवाई होत असतांना संबंधित अतिक्रमणधारकांवर का कारवाई होत नाही, अशी तक्रार नोंदवून व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांनी हे खुलासे जन माहिती अधिकारी यांच्याकडून या व्दितीय अपील अर्जांमध्ये अपेक्षिले आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जांमधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-१२-२००७ रोजीच्या तीन अर्जांन्वये मागितलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०१-२००७ रोजीच्या एका व दिनांक १६-०१-२००७ रोजीच्या दोन स्वतंत्र पत्रांव्दारे दिलेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती अर्जातील (अपील क्रमांक १५४१ संबंधित) मुद्दा क्रमांक ६ च्या संदर्भात त्यांनी बांधकामासंदर्भात त्यांच्या वरिष्ठांकडे सादर केलेला अहवाल सध्या न्यायालयाच्या ताब्यात आहे. तथापि न्यायालयाकडून सदर अहवालाची प्रत मागवून घेऊन ती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत देण्याची त्यांनी तयारी दर्शविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या तीनही मूळ अर्जास अनुसरुन दिलेली माहिती योग्य वाटल्याने त्यांनी अपिलार्थीची तीनही अपील नामंजूर केली आहेत.

वरील तीनही अपिलांचा संबंधित घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मालेगांव शहरातील स. नं. २९८, ३५२/१-२ प्लॉट क्रमांक ९४ यातील प्लॉट क्रमांक १, २, ३ व ४ वर बांधकाम केलेल्या शिवनेरी कॉम्प्लेक्स आणि बॅ. गोपालचंद्र संकुल या इमारतीच्या बांधकामाविषयी काही माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

माहिती देतांना संबंधित व्यावसायिकाने महानगरपालिकेच्या मंजूर केलेल्या बांधकामापेक्षा जास्त क्षेत्राचे बांधकाम केले असल्याचे कबूल केले आहे. अनुज्ञेय बांधकामापेक्षा जास्त बांधकाम केल्यास निश्चितपणे महानगरपालिकेने कोणती कारवाई करावयाची याचे विवेचन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ५२ व ५३ मध्ये केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, त्यांनी संबंधित मिळकतधारकास या अनधिकृत बांधकामाबाबत आवश्यक ती नोटीस दिली आहे, तसेच या बांधकामास अद्यापही पूर्णत्वाचा व भोगवटाचा दाखला देण्यात आलेला नाही. या प्रकरणी त्यांनी आपल्या वरिष्ठांना जो अहवाल सादर केला आहे त्याचीही प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली नसल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे. अपिलार्थीने या तीनही अपील अर्जामध्ये या अनधिकृत बांधकामाबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले असून, त्यांच्या या प्रश्नांचा संपूर्ण रोख या अनधिकृत बांधकामे करणा-या मालमत्ताधारकांवर मनपा कोणती कारवाई करणार आहे, अद्यापपर्यंत ती कारवाई का करण्यात आली नाही अशा प्रकारची माहिती प्राप्त होण्याकडे आहे. तथापि विचाराधीन तीनही अपील अर्जाशी संबंधित मूळ माहितीच्या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मांडणी योग्य प्रकारे केली नसल्याचे दिसून येत आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये ''माहिती'' या शब्दाची व्याख्या खालील प्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहे.

**<u>कलम २ (च)</u>**

'' ''माहिती'' याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य

कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. ''

या व्याख्येचे अवलोकन करता वरील तीनही व्दितीय अपील अर्जांमधील मूळ माहितीच्या अर्जांमध्ये अपिलार्थीने केलेली माहितीची मागणी या व्याख्येशी बरीचशी विसंगत असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिका-यास त्यांचे खुलासे अपेक्षित करणारे प्रश्न विचारणे, त्यांचे स्पष्टीकरण मागणे, त्यांची मते मागणे व ती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अशा प्रकारच्या प्रक्रिया अभिप्रेत नाहीत. यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे या बांधकामासंदर्भात जी जी माहिती उपलब्ध आहे ती ती सर्व माहिती त्यांना अपिलार्थीस या अधिनियमाव्दारे द्यावी लागेल, मात्र त्यांनी अमूक एक कारवाई का केली नाही, कोणत्या पध्दतीने केली या प्रश्नांची उत्तरे अपिलार्थीस देय असणार नाहीत. वरील तीनही अपिलांचा एकत्रितपणे विचार केल्यास असे दिसून येते की, अपिलार्थीच्या अपील क्रमांक १५४१ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरिष्ठांकडे या बांधकामासंदर्भात जो अहवाल पाठविला आहे त्या अहवालाची प्रत अपिलार्थीस दिली नसल्याचे दिसून येत आहे. अपील क्रमांक १५४२ संदर्भात या बांधकामासंदर्भात महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ व ५३ प्रमाणे दिलेल्या नोटीसची प्रत अपिलार्थीस दिली नसल्याचे दिसून येत आहे तर अपिलार्थीच्या अपील क्रमांक १५४३ च्या व्दितीय अपील अर्जासंदर्भात महानगरपालिकेने नगरविकास खात्यास / जिल्हाधिका-यास पाठविलेल्या अहवालाची प्रत अपिलार्थीस दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीच्या राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या वरील तीनही व्दितीय अपील अर्जांमध्ये त्यांचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झाले नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. थोडक्यात, अपिलार्थीस उर्वरित माहिती बरोबर या बांधकामासंदर्भात झालेल्या कथित अनियमिततेसंदर्भात मालेगांव महानगरपालिकेकडून त्वरेने कारवाई होणे अपेक्षित असल्याचे

दिसून येत आहे.  तेव्हा या प्रकरणी आयुक्त, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव यांनी वैयक्तीक लक्ष घालावे, असे त्यांना सुचविण्यात येत आहे.  तसेच वर नमूद केलेल्या ३ कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिल्यास अपिलार्थीस आवश्यक माहिती प्राप्त होईल, असे आयोगास वाटते.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या या तीनही अपिलासंदर्भात त्यांनी मागणी केलेल्या संपूर्ण कागदपत्रांच्या प्रती – जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरिष्ठांकडे पाठविलेल्या अहवालाची प्रत, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव यांनी या बांधकामासंदर्भात नगरविकास खाते, महाराष्ट्र राज्य व जिल्हाधिकारी, नाशिक  यांना पाठविलेल्या अहवालाची प्रत व कलम ५२, ५३ च्या नोटीसची प्रत ही माहिती त्यांनी अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद दिला असला तरी त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे सिध्द होत असल्याने, व या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याने अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस आयुक्त, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव यांना करण्यात येत आहे. सदर बांधकामाबाबत मनपाचे धोरण काय आहे, अतिक्रमण काढण्याची कारवाई मनपा करील काय अशा प्रकारच्या भविष्यकाळातील कृतीसंदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना माहिती विचारल्याचे दिसून येत आहे.  सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता उपलब्ध असणे शक्य नसल्याने ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही याची अपिलार्थी यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

# आदेश

१.     अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.     जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३.     आयुक्त, मालेगांव महानगरपालिका, मालेगाव यांना उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद                                                    ( वि. बा. बोरगे )
दिनांक     २५-०८-२००८                                  राज्य माहिती आयुक्त,
                                                                  खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१     श्री. प्रशांत व्यंकटराव हिरे, 'मधुरमुरली' महावीरनगर, मालेगाव कॅम्प, जिल्हा नाशिक.

२     जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, नगर रचना विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३     जन अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४     आयुक्त, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, जिल्हा नाशिक यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४९८

निर्णय दिनांक : २६-०८-२००८

१ श्री. देवमन नारायण आहेरराव, : अपिलार्थी
रा.खांडबारा ता.नवापूर जि.नंदूरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत, खांडबरा ता.नवापूर जि.नंदूरबार

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, नवापूर जि.नंदूरबार.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत, खांडबारा
ता.नवापूर जि.नंदूरबार

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. विजय ग्यानदेव मिस्तरी, जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत खांडबारा ता. नवापूर जि.नंदूरबार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. भरत फकिरा निकुंबे, विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नवापूर, जि.नंदूरबार यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. देवमन नारायण आहेरराव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१३.०७.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित एकूण ५ मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती

" ग्रामपंचायत स्थापनेपासून रस्ते तयार करण्याठी/दुरुस्तीसाठी प्रत्येक वर्षासाठी किती खर्च झाला. तपशीलवार माहीत मिळावी.

(२) गावात रोगराई निर्माण झालेली आहे त्यासाठी कोणते प्रतिबंधक उपाय योजले आहेत.

(३) सेफ्टी संडासाचे पाणी रस्त्यावर वहात आहे. त्यासाठी प्रतिबंधक उपाय कळवावे.

(४) सार्वजनीक ग्रामपंचायत हद्दीत रस्ते दुरुस्तीसाठी कोणती उपाययोजना आहे. सर्वसाधारण सर्व माहीती मिळावी
नकलेची झेरॉक्स प्रतिची फी देणेस तयार आहे. ग्रामसभा केव्हा घेतली.”

अपिलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २०.१०.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची व्याप्ती वाढवून खांडबारा ग्रामपंचायतीने पार पाडलेल्या घरकुल योजनेच्यासंदर्भात माहिती विचारल्याचे दिसून येते. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ५.३.२००७ व ९.४.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर असल्याने ही सुनावणी होऊ शकली नाही, असे जन अपिलीय अधिकारी यांनी सांगितले. सुनावणीसाठीचे प्रथम पत्र त्यांनी दि. २२.२.२००७ रोजी व नंतर दि. २.४.२००७ रोजी पाठविले होते, असे त्यांचे म्हणणे आहे, तथापि

अपिलार्थीस ही पत्रे पाठविल्यापृष्ठयर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयाकडील जावक नोंदवहीची प्रत, आयोगाने पूर्वसूचना देऊनही, आयोगासमोर सादर केलेली नाही. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १३.७.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २१.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये काही माहिती दिल्याचे दिसून येते. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व यासाठीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०२.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी व अर्धवट माहिती दिल्याचे नमूद करुन आपल्या घरकुलाच्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. तसेच आयोगाकडे केलेले द्वितीय अपील अर्जामध्ये ग्रामपंचायत सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, राजकीय पुढारी यांची किती घरकुले आहेत, याचीही अतिरिक्त माहिती मागितली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत त्यामुळे त्यांनी आयोगाकडे सादर केलेले द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १३.७.२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी दि. २१.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. ते या पदावर दि. १७.११.२००५ पासून कार्यरत आहेत. तथापि या पदाचा कार्यभार घेताना यापूर्वीचे ग्राम विस्तार अधिकारी श्री. जे. डी. शिंपी यांच्याकडून त्यांना अपिलार्थीने अर्ज केल्यानंतरही, ग्रामनिधी संदर्भात कुठलाही पदभार, हस्तांतरित न केला गेल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही. याबाबत त्यांनी त्यांच्या वरिष्ठांकडे वस्तुस्थिती सादर केली होती, असे त्यांनी आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रावर काय कार्यवाही केली, असे विचारले असता, उपस्थित जन अपिलीय

अधिकारी यांच्या प्रतिनिधीने संबंधित ग्रामसेवकाची विभागीय चौकशी करण्यासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जि.प.नंदूरबार यांच्याकडे प्रस्ताव सादर केल्याचे आयोगास सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस सुनावणीची नोटीस वेळोवेळी पाठवूनही ते सुनावणीसाठी हजर न राहिल्यामुळे त्यांच्या प्रथम अपील प्रकरणी सुनावणी होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मर्यादित असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितल्याचे येथे दिसून येते. यापैकी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पहिल्या मुद्यावर कोणतीही माहिती दिली नाही. त्यांनी अपिलार्थीस या मुद्यावर माहिती न देण्याचे कारण म्हणजे त्यांच्या पूर्वीच्या ग्रामसेवकाकडून त्यांना पदाचा पदभार व संबंधित अभिलेखे हस्तांतरित केला गेला नव्हता, हे प्रकरण अपिलार्थी यांनी माहितीसाठीचा अर्ज करण्यापूर्वीपासून प्रलंबित होते व त्यांनी त्यांच्या वरिष्ठांकडे या प्रकरणाचा वस्तुस्थितीवर आधारित अहवाल सादर केला होता. यासंदर्भात वरिष्ठांकडे सादर केलेले पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविले. अर्थात ही बाब जरी प्रशासकीय असली तरी, संबंधित कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरित न झाल्याने, अपिलार्थीस माहिती देता आली नाही, हा जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद आयोगास मान्य करता येणार नाही. तसेच या प्रकरणी असेही दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. १३.७.२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे दि. १२.८.२००६ रोजी अथवा तत्पूर्वी प्रतिसाद देणे भाग होते. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जावर त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीत कोणतीही कार्यवाही तर केली नाहीच परंतु जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

अपिलार्थीने दि. २०.१०.२००६ रोजी प्रथम अपील केल्यानंतर २ महिने इतक्या विलंबाने अपिलार्थीस काही माहिती देण्याचा प्रयत्न केला. अपिलार्थीने मागितलेल्या ५ मुद्यावरील माहितीपैकी मुद्दा क्र.१ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली नाही. मुद्दा क्र. ३ ची माहिती अपिलार्थीस अर्धवट दिली व ही सर्व माहिती चार महिने नऊ दिवस इतक्या विलंबाने दिली. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे याच विषयावर प्रथम अपील केले असताना, केवळ अपिलार्थी सुनावणीसाठी गैरहजर राहतात म्हणून अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही जन अपिलीय अधिकारी यांनी केली नाही. अपिलार्थीचे गैरहजेरीचे कारण दर्शवून त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर अंतिमतः निर्णय घेण्याचे टाळले असल्याचे येथे दिसून येते. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी अधिनियमातील कलम १९(६) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे दिसून येते. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्य नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदूरबार यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्यादृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, गट विकास अधिकारी, पंचायत समिती नवापूर यांच्या सहाय्याने अपिलार्थीने मुद्दा क्र. १ व ३ द्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केल्याने, त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीनुसार, प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, नंदूरबार यांना करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदूरबार यांच्या, या प्रकरणी असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्राम विस्तार अधिकारी/ग्रामसेवक यांच्या स्तरावर जिल्हा परिषदेचे कामकाज कशापध्दतीने चालू आहे, याचे हे प्रकरण म्हणजे उत्तम नमुना ठरावे. या प्रकरणी केवळ एका ग्रामसेवकाने आपली बदली झाल्यानंतर आपल्या पदाचा कार्यभार (अभिलेखे/नस्त्या व कागदपत्रे) त्यांच्यानंतर रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्याकडे व्यवस्थितरित्या हस्तांतरित न केल्यामुळे सामान्य नागरिकांना, सार्वजनिक प्राधिकरणाकडून माहिती प्राप्त करुन घेण्याच्या अधिकारापासून वंचित रहावे लागत आहे. माहिती अधिकार अधिनियमाचा मूळ उद्देश असा आहे की, सर्वसामान्य जनतेला सार्वजनिक प्राधिकरणाकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती विहित मुदतीत प्राप्त व्हावी, तथापि त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय सर्वसामान्य नागरिक अशाप्रकारे वंचित राहत आहेत. या प्रकरणाच्या घटनाक्रमाकडे बघितले असता अपिलार्थीने दि. १३.७.२००६ रोजी अर्ज करुन आज दोन वर्षांहून जास्त कालावधी उलटून गेल्यानंतरही ते ही माहिती प्राप्त होण्यापासून आजपावेतो वंचित राहिले आहेत. केवळ एका ग्रामसेवकाच्या बेपर्वाईमुळे जर सामान्य नागरिकांना वेठीस धरले जात असेल तर माहिती अधिकार अधिनियमाचा मूळ उद्देश सफल होऊ शकेल, असे आयोगास वाटत नाही व परिणामी जनमानसात शासनाची प्रतिमा मलीन होण्यास फारसा वेळ लागणार नाही. माहिती अधिकार अधिनियमाचा मूळ उद्देश सफल होण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावरुन संबंधित कर्मचाऱ्यावर कडक प्रशासकीय कार्यवाही होणे, आयोगास गरजेचे वाटते, म्हणून संबंधित ग्रामसेवक श्री. शिंपी यांचेवर, संबंधित उपमुख कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत), जि.प.नंदूरबार यांच्या स्तरावर जी विभागीय चौकशी करण्याची कार्यवाही प्रस्तावित केली आहे, त्या कार्यवाहीस त्यांनी गती देऊन एका योग्य अशा कालमर्यादेमध्ये त्यांनी ही कार्यवाही पूर्ण करावी, असे त्यांना सूचविण्यात येत आहे.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे अनुक्रमे प्रथम व द्वितीय अपील करीत असताना त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची व्याप्ती वाढविल्याचे दिसून येते. मूळात प्रथम व द्वितीय अपील हे मूळ अर्जातील माहितीशीच संबंधित असल्याने अपिलार्थीने प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकरणाकडे अपील करताना, आपल्या माहितीची व्याप्ती वाढविणे हे चुकीचे आहे, असे अपिलार्थीच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती वाढीव व्याप्तीमध्ये समाविष्ट आहे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही, हे अपिलार्थीच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदूरबार यांना, उपरोक्त प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देवमन नारायण आहेरराव, मु.पो.खांडबारा ता.नवापूर जि.नंदुरबार

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत,खांडबरा ता.नवापूर जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, नवापूर जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४९९

निर्णय दिनांक : २६-०८-२००८

१ श्री. अल्ताप अहमद वजिरखान पठाण : अपिलार्थी
मिल्लतनगर, धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपवनसंरक्षक, मेवासी वनविभाग,
तळोदा जि.नंदूरबार

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक मेवासी वन विभाग
तळोदा जि.नंदूरबार.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः सहायक वनसंरक्षक,
मेवासी वनविभाग, तळोदा,
जि.नंदूरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. नामदेव गुमानसिंग पटले, जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, मेवासी वनविभाग,तळोदा जि.नंदूरबार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, मेवासी वन विभाग, तळोदा जि.नंदूरबार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी श्री. अल्ताप अहमद वजिरखान पठाण (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये, संबंधित जन माहिती

अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत व पूर्ण स्वरुपात माहिती पुरविली नाही व त्यांनी माहिती अधिकाराचे उल्लंघन केल्याने त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. या अर्जामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १८.९.२००६ रोजी माहिती मागितली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २५.९.२००६ रोजी अपूर्ण माहिती प्राप्त झाली आणि त्यामुळे त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करावे लागले व प्रथम अपिलीय प्राधिकरणाने त्यांना दि. ११.१०.२००६ रोजी आवश्यक असलेली माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांनी वेळेत पूर्ण स्वरुपात माहिती न पुरविल्याचे सिध्द झाले असल्याने त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथम त्यांच्या दिनांक १८.९.२००६ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाचे दि. २८.७.२००५ रोजीच्या पत्राची व सदर पत्र त्यांना बजावल्याबाबतच्या पुराव्याच्या सत्यप्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.९.२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली दि. २८.७.२००५ रोजीच्या पत्राची सत्यप्रत पुरविली आहे. मात्र हे पत्र अपिलार्थीस दिल्याबाबतच्या पुराव्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिला नाही, सदर पुराव्याची प्रत त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११.१०.२००६ रोजीच्या पत्राद्वारे दिला आहे. थोडक्यात, अपिलार्थीने दि. १८.९.२००६ रोजी मागणी केलेली माहिती त्यांना दि. ११.१०.२००६ रोजी पूर्णपणे प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या दोन पत्रांच्या प्रतींपैकी पहिल्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून व दुसऱ्या पत्राची प्रत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस दिली गेल्याचे दिसून येते. अपिलार्थीने द्वितीय अपील अर्जामध्ये उपस्थित

केलेल्या, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पहिल्या वेळेस संपूर्ण माहिती दिली नाही, हा मुद्दा येथे सिध्द होत आहे, मात्र अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पूर्ण मिळाली असल्याचे देखील येथे सिध्द होत आहे. अपिलार्थीस सुरुवातीसच संपूर्ण माहिती का पुरविली नाही, असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये तसा स्पष्ट उल्लेख केला नव्हता, असे आयोगास सांगितले, तथापि त्यांचे हे म्हणणे आयोग अमान्य करीत असून, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी सर्वप्रथम संपूर्ण माहिती दिली नसल्याचे सिध्द होत आहे. मूळात अपिलार्थीने मागणी केलेले दि. २८.७.२००५ रोजीचे पत्र अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले नव्हते. त्यामुळे हे पत्र अपिलार्थीस दिले गेले नव्हते. सदर पत्र त्यांना वनक्षेत्रपाल, यांच्याकडून दि. १.८.२००५ रोजी प्राप्त झाले होते. मात्र हे पत्र प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांची सही असलेली स्थळप्रत त्यांना दि. ११.१०.२००६ रोजी देण्यात आली. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, संबंधित प्राधिकरणाकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना पूर्णतया प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करणे योग्य आहे, या निर्णयाप्रत आयोग आला आहे. मात्र या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः संपूर्ण माहिती देण्यासाठी कोणत्याही असद्हेतूने टाळाटाळ केली अथवा विलंब लावला असे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्याचे आदेश आयोग देत नाही, तथापि जन माहिती अधिकारी यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमाद्वारे त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या अर्जांसंदर्भात विशेष सतर्कता बाळगावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झाली असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आता कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमाद्वारे त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या अर्जासंदर्भात कार्यवाही करताना सतर्क राहावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अल्तापअहमद वजिरखान पठाण, प्लॉट नं. ४२,मिल्लतनगर, हजार खोली जवळ धुळे, जि.धुळे

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक,मेवासी वनविभाग, तळोदा, जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, मेवासी वन विभाग, तळोदा जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५००

निर्णय दिनांक : २६-०८-२००८

१ श्री. चांगदेव रंभाजी विखे, : अपिलार्थी
लोणी (बू.) ता.राहाता,
जि. अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद, कें.शा.लोणी (बू.)
ता.राहाता, जि. अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, राहाता,
जि. अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी सौ. कांता शिवाजी रोहोकले जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, जि.प.प्रा.शा.लोणी (मुले), ता.राहाता, जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. शिवाजी श्रीरंग शिदे जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, राहाता, जि. अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे, श्रीमती वत्सला जनार्दन काळे तत्कालीन, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, जि.प.प्रा.शा.लोणी (मुले), ता.राहाता, जि.अहमदनगर व श्रीमती सुलोचना पंढरीनाथ पटारे, त्यापूर्वीच्या जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, राहाता, जि. अहमदनगर यांच्यासह हजर आहेत,

तर अपिलार्थी श्री. चांगदेव रंभाजी विखे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २१.४.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २२.१.२००७ रोजी त्यांच्या शाळेसंदर्भात दि. १.१०.१८७८ ते १.०६.१९२५ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सन १९१२ ते १९२५ या कालावधीतील माहिती विनामूल्य दिली, तथापि ती माहिती त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी वाटल्याने त्यांनी  जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.१.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांना सदर अपील राज्य माहिती आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, अपिलार्थी हे अशाच स्वरुपाच्या माहितीची मागणी वेगवेगळया सार्वजनिक प्राधिकारणांकडे करीत असतात, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्याकडे अर्ज करतांना ते दारिद्रयरेषेखालील असल्याचे नमूद केले आहे. तथापि माहितीचा अधिकार अधिनियमाअंतर्गत त्यांनी कामगार तलाठी, लोणी यांच्याकडे दि. ७.८.२००८ रोजी माहिती मागविताना ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नसल्याचे नमूद केले आहे, अशा तऱ्हेने केवळ सार्वजनिक प्राधिकरणाकडील जन माहिती अधिकारी यांना केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने अपिलार्थी हे वेळोवेळी माहिती अधिकार अधिनियमाचा दुरुपयोग करुन माहितीची मागणी करीत असतात व त्यांना माहिती मिळविण्यामध्ये स्वारस्य नाही.असेही त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या अखेरीस आयोगास स्पष्ट केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २३.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शाळेच्या स्थापनेपासून ते १९२५ सालापर्यंतची माहिती इयत्ता पहिलीशी संबंधित माहिती मागितली होती. शाळेची स्थापना सन १८७८ मध्ये झाली आहे. या माहितीमध्ये - शाळेच्या स्थापनेपासून इयत्ता १ लीमध्ये प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थी/विद्यार्थीनीचे दाखल झालेल्या जन्मतारखा, जात, पोटजात व नावनोंदणी झालेली तारीख इत्यादी माहितीचा स्पष्ट उल्लेख असलेल्या रजिस्टरच्या प्रत्येक वर्षीच्या छायांकित प्रती- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील काही उपलब्ध माहिती पुरविली. यामध्ये असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे १८७८ ते १९२५ या सालाशी संबंधित माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना १९१२ ते १९२५ या सालाशी संबंधित माहिती दिल्याने ही माहिती त्यांना दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्याने त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. २१.१.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २.२.२००७ व २०.२.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली होती. त्यातील एक पत्र अपिलार्थीस त्यांनी पोस्टाने पाठविले व दि.२०.२.२००७ रोजीचे सुनावणीचे पत्र संबंधित शाळेच्या जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका या स्वतः दि.१७.२.२००७ रोजी अपिलार्थीस देण्यासाठी गेल्या असता, अपिलार्थीने सदर सुनावणीचे पत्र स्वीकारण्याचे नाकारले. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिका

श्रीमती काळे यांनी अपिलार्थीच्या, सुनावणीस हजर राहण्यासाठीचे पत्र न स्वीकारण्याच्या कृतीबद्दलचा अहवाल त्यांच्याकडील दि. २०.२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे सादर केला आहे.सदर अहवाल उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी

आयोगास सादर केला, यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस सुनावणीमध्ये स्वारस्य नसावे. अशाप्रकारे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय पारित होऊ न शकल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सर्वप्रथम, वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात ज्या कालावधीशी संबंधित माहिती मागितली आहे, तो कालावधी ८३ ते १३० वर्षांपूर्वीचा आहे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सन १९१२ ते १९२५ या कालावधीतील माहिती अपिलार्थीस दिली आहे. मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती अव्यवहार्य व अविवेकी असल्याचे दिसून येते, तसेच या विषयासंदर्भात त्यांनी केलेल्या प्रथम अपिलावरील सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठीचे सौजन्य देखील अपिलार्थीने या प्रकरणी दाखविले नाही एवढेच नव्हेतर सुनावणीसाठी हजर राहण्यासाठीचे पत्र स्वतः शाळेच्या मुख्याध्यापिका अपिलार्थीस देण्यासाठी गेल्या असता अपिलार्थीने ते स्वीकरले नाही, तसेच आज देखील आयोगासमोरील सुनावणीस अपिलार्थी हजर नाहीत, व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जास्तीत जास्त उपलब्ध माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली आहे हे पाहता, व अपिलार्थीच्या मागणी केलेल्या माहितीतील अव्यवहार्यता आणि अपिलार्थीची सुनावणीस अनुपस्थित राहण्याचे, त्यांचे विसंगत वर्तन व माहिती अधिकार अधिनियमाचा दुरुपयोग करण्याची वृत्ती, पाहता, अपिलार्थीस माहिती

मिळविण्यात स्वारस्य नाही, असे दिसून येत आहे. तसेच त्यांनी मागणी केलेल्या माहितीने कोणतेही व्यापक जनहित साध्य होण्याची शक्यता नसल्याने, अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

सबब विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१ अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चांगदेव रंभाजी विखे,लोणी (बू.) ता.राहाता,जि. अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,जिल्हा परिषद, प्रा.शा.(मुले) लोणी (बू) ता.राहाता, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, राहाता, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५०१

निर्णय दिनांक : २६-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विभोर दिलीप बार्ला,<br>रा. नाशिक | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,<br>उद्योगभवन, सातपुर, जि.नाशिक | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,<br>औद्योगिक वसाहत, अंधेरी,<br>मुंबई-९३ | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. रघुनाथ खंडु गावडे, जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,उद्योगभवन, सातपुर, जि.नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी श्री. विभोर दिलीप बार्ला (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१८.०९.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सातपुर औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक 'D-32' विषयी १९९४ ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यतच्या कालावधीशी संबंधित एकूण १४ विविध मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. या माहितीमध्ये -सध्याच्या भूखंडधारकाचे नाव, मालकी हक्क बदलताना नेमल्या गेलेल्या एजंटचे नाव, या भूखंडासंदर्भात प्रलंबित प्रकरणे, एखाद्या बँकेकडे अथवा वित्तीय संस्थेकडे सदर भूखंड गहाण असल्यास त्याचा तपशील, संबंधित भूखंडधारकाने MPCB (Maharashtra Pollution Control Board) ची परवानगी घेतली होती काय, असल्यास त्याची प्रत किंवा नसल्यास MPCB च्या परवानगीशिवाय भूखंडधारकाचा भूखंड लीजने द्यावयाचे कारण, एम.आय.डी.सी.ची थकबाकी संबंधित भूखंडधारकाने भरली होती काय, भरली असल्यास त्याच्या पावतीच्या प्रती, नसल्यास आतापर्यंत संबंधित भूखंडधारकावर एम.आय.डी.सी.ने केलेल्या कार्यवाहीचा तपशील, जर कोणतीही कार्यवाही केली नसेल तर यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांची नावे, सदर भूखंड हा भाडयाने दिला आहे काय, भाडयाने दिला असल्यास तशी परवानगी दिलेल्या पत्राची प्रत, परवानगी दिली नसल्यास यासाठी एम.आय.डी.सी.च्या जबाबदार अधिकाऱ्याची नावे, या भूखंडावर काही जंगम मालमत्ता (Assets) आहेत किंवा कसे, या मालमत्ता भूखंडधारकाच्या मालकीच्या आहेत काय, या भूखंडाची विक्री करण्याचे ठरले आहे काय, भूखंडधारकास विक्रीची परवानगी दिली आहे काय, दिली असल्यास संबंधित पत्राची प्रत, सदर भूखंडावर आपल्या परवानगीशिवाय कोणी बेकायदेशीर प्रवेश केला आहे काय, याचे उत्तर 'होय' असल्यास अशा अनधिकृतपणे प्रवेश करणाऱ्यावर केलेली कारवाई आणि जर कोणतीही कारवाई केली नसेल तर ती न करण्याची कारणे व एम.आय.डी.सी.च्या जबाबदार अधिकाऱ्यांची नावे, संबंधित भूखंडाच्या नियमितपणे झालेल्या तपासणीच्या प्रती व याबाबतचे प्राप्त झालेले अनुपालन अहवाल, संबंधित भूखंडावरील इमारत व यंत्र

सामुग्रीच्या विम्याचा तपशील, जर विम्याशिवाय सदर यंत्रसामुग्री भूखंडावर असली तर विमा न उतरविण्याची कारणे व विम्याशिवाय परवानगी दिलेल्या अधिकाऱ्यांची नावे, सदर इमारत एम.आय.डी.सी.च्या नियमाप्रमाणे सुरक्षित आहे काय, जर सदर इमारत सुरक्षित नसेल तर सदर इमारत कधीपासून धोकादायक स्थितीत आहे आणि यास जबाबदार संबंधित व्यक्ती, या संबंधाने त्यांच्यावर करण्यात आलेली कार्यवाही तसेच या भूखंडावर एम.आय.डी.सी.ने केलेली कायदेशीर अथवा इतर कार्यवाहीच्या प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ४.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.१०.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट माहिती पुरविल्याचा उल्लेख केला आहे. सदर भूखंड हा संबंधित भूखंडधारकास अवैधरित्या विकण्यास परवानगी दिल्याचे व अशाप्रकारच्या अवैध हस्तांतरणाकडे एम.आय.डी.सी. कानाडोळा करीत असल्याचे त्यांनी या अपील अर्जामध्ये म्हटले आहे. अर्जदारास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट माहिती देऊन माहिती अधिकार अधिनियमाचा भंग केल्याचे यामध्ये नमूद करुन अपिलार्थीने या अपिलामध्ये आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जास अनुसरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे वेगवेगळया दिवशी ऐकून त्यांच्याशी चर्चा केली व या संदर्भातील आपला निर्णय दि. १४.२.२००७ रोजी पारित केला. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिल्याचे नमूद करुन त्यांनी अपिलार्थीचे हे अपील फेटाळले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०३.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना बरोबर माहिती मिळाली नसल्याचे नमूद करुन त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील फेटाळण्याची कृती नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाशी प्रतारणा करणारी असल्याचे नमूद केले असून त्यांनी मूळ अर्जात नमूद केल्याप्रमाणे त्यांना संपूर्ण माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या म्हणण्यापृष्ठयर्थ संबंधित भूखंडाच्या हस्तांतरणाबाबत अनेक कायदेशीर बाबी उपस्थित केल्या आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत त्यामुळे त्यांनी आयोगाकडे सादर केलेले द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १८.९.२००६ रोजीच्या प्रथम अर्जास अनुसरुन त्यांनी अपिलार्थीस दि. ४.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये संपूर्ण माहिती पुरविली. सदर माहिती प्रथम लेखी दिली, नंतर दि. ६.१०.२००६ रोजी ‘D-32’ या भूखंडासंदर्भातील संपूर्ण नस्ती अपिलार्थीस दाखविली, त्यातील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांनी नस्तीमधून काढून दिल्या आहेत व सदर प्रती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची पोच घेतली आहे. याशिवाय त्यांना आणखी जास्त माहिती हवी असेल तर ते ती अपिलार्थीस देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सातपूर औद्योगिक क्षेत्रातील ‘D-32’ या

भूखंडासंदर्भात मोठी व्याप्ती असलेली माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या दि. १८.९.२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दि. ४.१०.२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता यातील बहुतांश माहिती प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित करणारी, अशाप्रकारची माहिती विचारली असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमामध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या अधिनियमातील कलम २(च) मध्ये पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे. सदर व्याख्येचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत अर्जदारास माहिती देणे याचा अर्थ अर्जदाराच्या प्रश्नांची, त्यांच्या शंकांची उत्तरे अथवा जन माहिती अधिकारी यांच्या कोणत्याही कृतीची कारणे अपिलार्थीस देणे, असा होत नाही.अपिलार्थीने मूळात या भूखंडधारकाच्या मालकीहक्काचे हस्तांतरणाबाबत अनेक प्रश्न आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलामध्ये उपस्थित केले आहेत. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, तीच माहिती त्यांनी अपिलार्थीस देणे मुख्यत्त्वेकरुन अभिप्रेत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, संबंधित भूखंडधारकाने MPCB कडून 'नाहरकत' दाखला घेतला होता काय, घेतला नसल्यास त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली, कारवाई केली नसल्यास संबंधित अधिकाऱ्याचे नाव काय, अशा अर्थाची वेगवेगळया मुद्यांशी संबंधित माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असलेल्या माहितीमध्ये अशाप्रकारची माहिती असणे अभिप्रेत नाही. मूळात मूळ भूखंडधारकाने काही नाहरकत दाखले, परवानग्या, घेतल्या असतील तर ही माहिती संबंधित भूखंडधारकाकडे उपलब्ध होऊ शकेल. एम.आय.डी.सी.च्या प्रचलित कामकाजाची पध्दत पाहिल्यास एम.आय.डी.सी.च्या कार्यालयाची कार्यकक्षा ही संबंधित

उद्योजकांना सर्व पायाभूत सोयींसह भूखंड उपलब्ध करुन देणे, त्यांना वित्तीय पुरवठा करणाऱ्या संस्थांना संमतीपत्र देणे, संबंधित प्रक्रिया नियमानुकूल करुन घेणे इतक्या मर्यादित स्वरुपाची असल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिलेली, प्रदुषण नियंत्रण विभाग, विक्रीकर विभाग इत्यादी प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेतलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे नसणार, हे उघड आहे व ती त्यांच्याकडे नसल्यामुळे त्यांनी ती अपिलार्थीस दिली नाही, हे ओघाने आलेच. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती अर्जातील मुद्दा क्र. 'F' द्वारे त्यांनी संबंधित भूखंडधारकाकडून एम.आय.डी.सी स किती येणे बाकी आहे, याची माहिती विचारली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती संबंधित उपअभियंता यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले, ही त्यांची कृती चुकीची आहे. कारण संबंधित उपअभियंता यांचे कार्यालय हे जन माहिती अधिकारी यांच्या मूळ प्राधिकरणाचा दुसरा भाग आहे. त्यामुळे या मुद्यावर माहिती देताना त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत (अर्जातील 'F' या मुद्यापुरता सिमित) संबंधित उपअभियंता यांच्याकडे पाठवून (जर ते जन माहिती अधिकार नेमले गेले असतील तर) त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे, अधिनियमातील कलम ६(३)(एक) मधील तरतुदीनुसार आवश्यक होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती येथे केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. 'G' च्या संदर्भात देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेले उत्तर सदोष आहे. या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सदर भूखंड हा भाडयाने दिला किंवा कसे, असल्यास तशा परवानगीचा तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला होता. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस "Not applicable. The allotty has been obtain the BCC" असे उत्तर दिले आहे. त्यांच्या उत्तरावरुन कोणाही त्रयस्थ व्यक्तिस जन माहिती अधिकारी यांचे नेमके काय म्हणणे आहे, याचा बोध होणार नाही तसेच सदर इंग्रजी चुकीचे आहे. असाच काहीसा प्रकार अपिलार्थीच्या मुद्दा क्र. 'H' शी

संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी देताना झालेला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती इंग्रजीत देण्याच्या जन माहिती अधिकारी यांच्या अट्टाहासामुळे सदर माहिती दिशाभूल करणारी असावी, असे अपिलार्थीस वाटले असावे, अपिलार्थीने या भूखंडाच्या मालकीहक्काच्या हस्तांतरणाबाबत आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जात अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. हे प्रश्न त्यांना एम.आय.डी.सी. कडून सोडवून घ्यावे लागतील. कारण सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. यामुळे अपिलार्थीने मूळात श्री. कुलकर्णी यांच्या 'D-32' या भूखंडाच्या मालकी हक्काबाबत काही प्रश्न उपस्थित केले आहेत, तर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, या भूखंडाचे सध्याचे मालक श्री. कुलकर्णी हेच आहेत, अशाप्रकारच्या मुद्यांसंदर्भात अपिलार्थीने आपल्या गाऱ्हाण्याची तड एम.आय.डी.सी. कडून लावून घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीची मूळ माहितीची मागणी व त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे वरील परिच्छेदात केलेले विश्लेषण पाहता, अपिलार्थीने मूळ अर्जात, मुद्दा क्र. 'F', 'G' व 'H' व द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल,असे दिसून येईल. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'F' मध्ये एम.आय.डी.सी. चे देणे संबंधित भूखंडधारकाने दिले असल्यास त्यांच्या पावत्याच्या प्रतींची मागणी केली आहे. तेव्हा या माहितीसंदर्भात अपिलार्थीस पावत्यांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना द्याव्या लागतील, तर मुद्दा क्र. 'G' व 'H' द्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस परत हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येते की, उपरोल्लिखित मुद्दा 'G' व 'H' द्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस परत हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी. ही माहिती इंग्रजी भाषेमध्ये घ्यावयाची झाल्यास ती निर्दोष असल्याची त्यांनी दक्षता घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण मुद्दा क्र.'F' 'G' व 'H' ची संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. ॲड. विभोर दिलीप बार्ला,१५, मुक्ती, ९, समर्थनगर,नाशिक-४२२ ००५

२. जन माहिती अधिकारी प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योगभवन, १ला मजला, त्र्यंबकरोड एम.आय.डी.सी.कंपाऊंड,आय.टी.आय.जवळ सातपुर, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,औद्योगिक वसाहत, अंधेरी,मुंबई-९३यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५०२

निर्णय दिनांक : २६-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेवरे राजू ओंकार,<br>मु.पो. वडाळा-वडाळी ता. चाळीसगाव<br>जि.जळगाव-४२४ १०२ | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, चाळीसगाव<br>जि.जळगाव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत),<br>जिल्हा परिषद, जळगाव | | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. राजू ओंकार शेवरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सुरेश काशिनाथ कुलकर्णी, जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाळीसगाव जि.जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल),सौ. वंदना अविनाश मोरे,अधीक्षक, जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद, जळगाव यांच्या प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. प्रेमनाथ गैनीनाथ वाघमारे, वरिष्ठ सहायक, प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जळगाव यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२१.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वडाळा-वडाळी या ग्रामपंचायतशी संबंधित माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

"११ व्या वित्त आयोगातून स्मशानभुमीला किती पैसे आले व काय झाले.

वडाळा ग्रा.प.मध्ये सन २००० ते २००१ मध्ये गावात विहीर खोदकाम व बाधकाम केलेतेकोणत्या योजनेतुन केले, २००५ मध्ये गटार बाधकामाच्या लाबीचा तपशिल,सरकारी दवाखाण्याचे परिपत्रक,अगणवाडीचे परिपत्रक (२०००ते२००५मध्ये बाधलेली अगणवाडी"

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.०२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.४.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २६.४.२००७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी १५ दिवसांच्या आत माहिती देण्याचे आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०४.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापपर्यंत त्यांच्या दि. २१.१२.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मिळाली नसल्याचे नमूद करुन

घरकुल योजनेसंदर्भातील अतिरिक्त माहितीची मागणी करुन आपल्या मूळ माहितीच्या मागणीची व्याप्ती वाढविली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी दि. २१.१२.२००६ रोजीच्या प्रथम अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २८.५.२००७ रोजी प्राप्त झालेली असून ही माहिती अपूर्ण व खोटी आहे. तसेच या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी खाडाखोड केलेली आहे. सदर माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी या पदाचा दि. २५.६.२००८ रोजी पदभार स्वीकारला आहे. त्यांनी पदभार स्वीकारल्यापासून अपिलार्थी त्यांच्याकडे सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही व्यक्तिशः उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीने ज्यावेळी माहिती मागितली होती, त्यावेळी श्री. रवंदळ नावाचे गट विकास अधिकारी या पदावर कार्यरत होते. ते आता पंचायत समिती,नंदूरबार येथे गट विकास अधिकारी या पदावर कार्यरत आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १७.२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दि. १७.०४.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २६.४.२००७ रोजी पारित केले असून या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप हे मर्यादित होते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २१.१२.२००६ रोजी अर्ज केला. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्याच दिवशी पोहोचल्याची त्यांच्या कार्यालयाची पोचसही

अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेतली आहे. तथापि सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोहोचला नसल्याचे त्यांनी या अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या प्रथम अपिलाच्या सुनावणीमध्ये म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांचे हे म्हणणे लक्षात घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. त्याचबरोबर या निर्णयामध्ये अपिलार्थीने माहितीच्या केलेल्या प्रथम अर्जावर वेळीच कार्यवाही न करण्यासाठी कोण जबाबदार आहेत, याची चौकशी करुन दोषीविरुध्द कार्यवाही करण्याचे निर्देशित केले होते. तथापि आज सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्या या सूचनेसंदर्भात पुढे काय झाले, अशी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी यांना विचारणा केली असता, जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशावर अद्यापही जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये काही माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहितीमध्ये खाडाखोड केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००५ मध्ये गटार बांधकामाच्या बाबीच्या तपशीलाची मागणी केली होती, तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्यासंदर्भात दिलेल्या माहितीमध्ये लांबीचा कोणताही उल्लेख नाही. लांबी या शब्दापुढे काही आकडे लिहिले असून ते पूर्णतया शाईने खोडल्याचे दिसून येते. यावरुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी हेतुतः टाळल्याचे दिसून येते. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामधील मुद्दा क्र. १ मध्ये घरकुल योजनेसंबंधी माहितीची मागणी केलेली आहे. तथापि सदर माहिती अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे दि. २१.१२.२००६ रोजी केलेल्या प्रथम अर्जामध्ये नसल्याने अपिलार्थीच्या घरकुल योजनेसंदर्भातील माहितीचा मुद्दा आयोग विचारात घेत नाही.

अपिलार्थीस या प्रकरणी जी माहिती सर्वसाधारणतः जेथे दि.२०.१.२००७ रोजी अथवा तत्पूर्वी मिळणे माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अभिप्रेत होते, तेथे जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस दि. २८.५.२००७ रोजी म्हणजेच १२६ दिवस इतक्या विलंबाने दिली आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा व नितांत सचोटीचा अभाव स्पष्ट केला असल्याने ते माहिती त्यांना अधिकार अधिनियमाच्या कलम २० च्या तरतुदीस खचितच पात्र ठरले आहेत. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी असद्‌हेतूने टाळल्याचे, या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द झाले असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करणे आवश्यक ठरते. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर या प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या व नितांत सचोटीच्या अभावाबद्दल, प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली मूळ अर्जातील माहिती अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य पुरवावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर या प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या व नितांत सचोटीच्या अभावाबद्दल, प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजू ओंकार शेवरे, मु.पो. वडाळा-वडाळी ता. चाळीसगाव जि.जळगाव-४२४ १०२.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाळीसगाव, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५०३

निर्णय दिनांक : २६-०८-२००८

१ श्री. के.जी.श्रीजीत, : अपिलार्थी
रा. श्रीकृपा, नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपकार्यकारी अभियंता,
स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था विभाग,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.मर्यादित,
धुळे, जि.धुळे

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था विभाग,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.मर्यादित,
धुळे, जि.धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. के.जी.श्रीजीत (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. शशिकांत पुरुषोत्तम कुलकर्णी, सहा.अभियंता,जन माहिती अधिकारी तथा (प्र) उपकार्यकारी अभियंता, स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था विभाग,महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.मर्यादित,धुळे, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. अरुण पंडू कटयारे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था विभाग,महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.मर्यादित, धुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सोमनाथ व्यंकटेश विभांडिक, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा

उपकार्यकारी अभियंता, स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था विभाग,महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.मर्यादित,धुळे हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२२.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मासिक वेतनातील माहे एप्रिल, २००० मधील वजावट करण्यात आलेल्या रकमेसंदर्भात व नोव्हेंबर, १९९९ मधील किरकोळ रजेसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"a) 1. My request letters in original and action taken on them.

2. Action taken by you to release the amount of Rs. 187/- due to mistake in calculation.

3. Advice regarding what I should I do to get the money back.

b) 1. I had applied for CL on 8,11 and 12 November 1999 for 3 working days with intervening public holidays on 10 and 13 November 1999.

2. Whether CL is granted. If not granted reason for it. Whether the same is communicated to the employee. As CL is neither granted nor refused, what is the ground for deducting pay.

3. CL register concerned of Dondaicha PF and Dhule Division Office.

4. Name and designation of Officer who ordered deduction of salary in writing.

5. Authority who is competent as per SR to deduct salary of Dy.EE (C)

6. While deducting salary whether salary for public holidays is also deducted.

7. As per HO Circular whether salary for public holidays is also to be deducted or only for working days. Copy of the circular may please be furnished.
8. As it is found while keeping CL application pending, without refusing the CL, salaries deducted and that too for public holidays also against HO circular, any action is taken against the responsible. Advice regarding what I should do now to remove the injustice done.
9. Please make available to me all the complete records for inspection by me on any day convenient to you. As I am coming from Nasik at my own expenses and time it is requested to make complete records such as attendance register, attendance certificate from Pole Factory, CL applications, complete correspondence in this respect, notes by the concerned staff, salary bill, correspondence from Pole Factory, outward register of PF, inward register of Division,paybill of November 1999 and April 2000 etc. along with connected documents.

Please avoid reply of 'not traceable' any part of the records. On examining 'complete original' records, I shall intimate the requirement of copies."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २२.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तपासणीसाठी, त्यांना त्यांच्या कार्यालयात दि. २९.१२.२००६ रोजी उपस्थित राहण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थी दि. २९.१२.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले व त्यांना आवश्यक

असलेली कागदपत्रे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क उपलब्ध करुन घेतली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०१.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये निर्णय देऊन अपिलार्थीस कुठलीही कागदपत्रे उपलब्ध नसल्याने ती देता येणे शक्य नसल्याचे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०४.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २९.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगासमोर स्पष्ट केली. त्यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थी हे महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.मर्यादित, स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था विभागाच्या दोंडाईचा येथे पोल फॅक्टरीमध्ये उपकार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर कार्यरत होते. सदर पोल फॅक्टरीस कार्यकारी अभियंता यांनी दि. १३.११.१९९९ रोजी भेट दिली असता, ते विनापरवानगी गैरहजर असल्याचे, कार्यकारी अभियंता यांना आढळून आल्याने, त्यांनी या कार्यालयाच्या हजेरीपत्रकावर अपिलार्थी दि. ८.११.१९९९ ते १३.११.१९९९ या कालावधीत गैरहजर असल्याची नोंद केली. कार्यकारी अभियंता यांच्या या नोंदीस अनुसरुन अपिलार्थी यांच्या

या अनुपस्थितीच्या कालावधीचे वेतन त्यांना त्यानंतर अदा करण्यात आले नाही. अपिलार्थी हे वेतन मिळविण्यासाठी प्रयत्नशील असल्याने ते त्यांच्या वैयक्तिक गाऱ्हाण्याची तड माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये लावण्याचा प्रयत्न करीत आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण नऊ वेगवेगळया मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. या अर्जातील मुद्दा क्र. ३, ३(B),६ व ८ या मुद्यांशी संबंधित माहिती अपिलार्थीस देय ठरत नाही, कारण अपिलार्थीने या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे वैयक्तिक मत अपेक्षिले होते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या स्पष्ट केली आहे. सदर व्याख्येचे अवलोकन करता अपिलार्थीने या मुद्यांद्वारे मागणी केलेली माहिती या व्याख्येशी सुसंगत नसल्याने त्यांना देय होत नसल्याचे स्पष्ट होत आहे, मात्र उर्वरित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडून देय ठरते. अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या पगारातून करण्यात आलेली वेतनकपात अवैध आहे, कारण या वेतन कपातीसंदर्भात तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी कोणतेही लेखी आदेश पारित केले नाहीत. अपिलार्थीच्या एकूण नऊ मुद्यांपैकी एका मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील या प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे तपासणीकरता त्यांना उपलब्ध करुन देण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यक्षेत्रातील आवश्यक ती कागदपत्रे दि. २९.१२.२००६ रोजी तपासणीसाठी उपलब्ध करुन दिली आहेत व त्यातून आवश्यक ती माहिती अपिलार्थीने प्राप्त करुन घेतली आहे, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. मात्र अपिलार्थीने एकूण नऊ मुद्यांवर माहिती मागितली असताना त्यातील एकाच मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केली असून उर्वरित आठ मुद्यांसंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून काहीही

कळविले गेले नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. या आठ मुद्यांपैकी वर नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्र. ३, ३(B),६ व ८या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. उर्वरित पाच मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता अधिनियमातील विहित मुदत संपून गेल्यामुळे, विनामूल्य द्यावी लागेल, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील देय माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात्, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहे नोव्हेंबर, १९९९ च्या वेतनातून तत्कालीन कार्यकारी अभियंता यांच्या सूचनेप्रमाणे करण्यात आलेल्या कपातीची वैधता सध्या कार्यरत असलेल्या कार्यकारी अभियंता अथवा त्यांच्या वरिष्ठ स्तरावर तपासली गेल्यास अथवा या संदर्भात त्यांनी लेखी स्वरुपात काही निर्णय दिल्यास अपिलार्थीचा प्रश्न सुटण्यास मदत होऊ शकेल, असे आयोगास वाटते. तेव्हा या प्रकरणी कार्यकारी अभियंता, स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.मर्यादित,धुळे, जि.धुळे यांनी आपल्या स्तरावर त्वरित निर्णय घेऊन या प्रकरणाचा अंतिमतः निपटारा करावा, असे त्यांना सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. के.जी.श्रीजीत, 'शिवकृपा', शिवशक्तीनगर, जेल रोड, नाशिकरोड नाशिक-४२२ १०१

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था विभाग,महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.मर्यादित,धुळे, जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था विभाग,महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.मर्यादित,धुळे, जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कार्यकारी अभियंता, (स्थापत्य विभाग) बांधकाम तथा संचलन व सुव्यवस्था परिमंडळ, मंडोरे मार्केट, डॉ. आंबेडकर मार्केटजवळ, जिल्हापेठ, जळगाव-४२५ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५०४

निर्णय दिनांक २७-०८-२००८

१ श्री. गौतम संतोष पारेराव, : अपिलार्थी

दै. युगपरिवर्तन एक्सप्रेस कार्यालय,

भिमनगर, गुरुकुल हायस्कूल जवळ, साक्री

रोड, धुळे

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :

तथा नगररचनाकार,

धुळे महानगरपालिका, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सहाय्यक आयुक्त,

धुळे महानगरपालिका, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. प्रदीप उमाकांत येवले, जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, धुळे महानगरपालिका, धुळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. हनुमंत पितांबर कवठळकर, जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, धुळे महानगरपालिका (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे

संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. गौतम संतोष पारेराव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे धुळे महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत मोबाईल टॉवर्सबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " महानगर पालिका हाद्दित किती अनाधिकृत मोबाईल टॉवरांना नोटीसा देण्यात आल्या आहेत. हे मोबाई टॉवर कोठे लावण्यात आले आहेत. त्यांना परवानगी अद्याप का देण्यात आली नाही. तसेच जे अनाधिकृत टॉवर लावण्यात आले आहेत. त्यावर आळा घालण्यात शेत्रीय अधिकारी कमी पडले म्हणुन त्यांच्यावर स्थायी समितीच्या सभेमध्ये कारवाई करण्याची घोषणा आयुक्तांनी केली होती. त्याचे काय झाले याची माहिती मिळण्यात यावी (वरील टॉवरांची माहिती ज्या इमारतीवर आहेत त्यांची नाव व पत्त्यांसह देण्यात यावी)"

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती अपिलार्थीस पुरविली.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या या माहितीमध्ये धुळे महानगरपालिका हद्दीतील मोबाईल टॉवर्सना अद्यापपावेतो परवानगी का देण्यात आली नाही या मुद्यावरील माहितीचा अपिलार्थीस दिलेल्या दिनांक १०-०१-२००७ रोजीच्या पत्रामध्ये समावेश नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. या

अपील अर्जामध्ये त्यांनी मोबाईल टॉवर्सना परवानगी का नाकारण्यात आली व यावर नियंत्रण आणण्यात क्षेत्रीय अधिकारी कमी पडले म्हणून त्यांना कोणता दंड आकारण्यात आला, या मुद्दयाची माहिती विचारली आहे. तसेच आपल्या मूळ अर्जातील माहितीच्या व्याप्तीमध्ये वाढ करुन त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपिलामध्ये अनधिकृत मोबाईल टॉवर्सच्या संख्येत बीएसएनएल या कंपनीची माहिती का लपविण्यात आली याची माहिती देखिल विचारल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०२-२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीचे अपील त्यांच्याकडील दिनांक १२-०३-२००७ रोजीच्या आदेशान्वये निकाली काढले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस मोबाईल कंपनीच्या टॉवर्सची परवानगी नाकारण्याची कारणे ३० दिवसाच्या आत देण्याचे आदेशित केले व त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेल्या बीएसएनएल कंपनीच्या संदर्भात प्रथम अपील अर्जाव्दारे मागितलेली अतिरिक्त माहिती त्यांना देण्याचे देखिल सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०३-२००७ रोजी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांना देऊन अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ पोच देखिल घेतली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुन्हा अपूर्ण माहिती दिल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने प्रथम अर्जाव्दारे माहिती मागितली त्यावेळेस ते या पदावर कार्यरत नव्हते. ते या पदावर जानेवारी २००८ पासून कार्यरत आहेत. यापूर्वी श्री. डी. एच. पाटील नावाचे नगर रचनाकार माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. सध्या श्री. पाटील हे जळगाव महानगरपालिके-मध्ये नगर रचनाकार या पदावर कार्यरत आहेत. अपिलार्थीस विहित मुदतीत अपूर्ण माहिती देण्याची कारणे ते आता सांगू शकत नाहीत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. पाटील यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहिती मागितली होती त्यावेळी संबंधित कंपन्यांना त्यांच्या प्रस्तावातील त्रुटी त्यांच्या कार्यालयामार्फत कळविण्यात आल्या होत्या. परंतु संबंधित कंपन्यांना पूर्णतः टॉवर उभारण्यास परवानगी नाकारली नव्हती त्यामुळे त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक २७-०२-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १२-०३-२००७ रोजी पारित केले आहेत. त्यांनी आयोगास पुढे असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०३-२००७ रोजी सुसंगत व पूर्ण माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-१२-२००६ रोजीच्या अर्जास त्यांच्याकडील दिनांक १०-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला असला तरी या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मोबाईल टॉवर्सची परवानगी नाकारण्याची कारणे व संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्याच्या आयुक्तांनी केलेल्या

घोषणेसंदर्भात माहिती विचारली होती. या मुद्दयांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली नाही. याबाबत परवानगी नाकारण्याची कारणे या मुद्दयांवरील माहिती पूर्ण स्वरुपात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिली नाही. अधिका-यांवर करण्यात आलेल्या कारवाईसंदर्भात त्यांनी अपिलार्थीस संबंधित अधिका-यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे अशी मोघम माहिती दिली. मात्र जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपील सुनावणी संदर्भात त्यांनी दिनांक १२-०३-२००७ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील तपशीलासह दिनांक २०-०३-२००७ रोजी पूर्ण माहिती दिली व अपिलार्थीकडून त्यांनी या माहितीची घेतलेली पोच आयोगास दाखविली. राज्य माहिती आयोगाकडे अपील करतांना अपिलार्थीने त्यांना परवानगी नाकारण्याची कारणे न मिळाल्याचा पुनर्उच्चार केला आहे. तसेच बीएसएनएल कंपनीची माहिती का लपविण्यात आली या अतिरिक्त माहितीची देखिल त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपिलात मागणी केली आहे. येथे अपिलार्थीच्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, राज्य माहिती आयोगाकडे दाखल होणा-या व्दितीय अपील अर्जावर सुनावणी होत असतांना सदर सुनावणी त्यांच्या प्रथम अर्जावर आधारित असते व ती अर्जातील माहितीच्या व्याप्तीपुरतीच मर्यादित असते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी करतांना सुरुवातीस त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे हे निश्चित करुन तदनंतर माहिती अधिका-याकडे माहिती मागणे, माहिती अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणीमध्ये अभिप्रेत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या मूळ व्याप्तीमध्ये वाढ करुन बीएसएनएल कंपनीची अतिरिक्त माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित केली आहे. मूळ माहितीची व्याप्ती वाढवूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०३-२००७ रोजी वाढीव व्याप्ती असलेली संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे. या माहितीचे अवलोकन करता यामध्ये जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस संबधित कंपन्यांना माहिती न देण्याची कारणे दिल्याची दिसून येते.  सदर कारणे संयुक्तीक व सुसंगत असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांचे मत आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचा संबंधित टॉवर्सना परवानगी नाकारणारा अंतिम निर्णय घेण्यात आला नसल्याने त्यांनी अपिलार्थीस ही कारणे कळविली नाहीत हा युक्तिवाद आयोग अमान्य करीत असून या टप्प्यावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित टॉवर्स कंपन्यांनी त्यांच्याकडे दिलेल्या प्रस्तावावर त्यांनी कंपन्यांना कळविलेल्या पत्रांच्या प्रती देणे आवश्यक होते असे आयोगाचे मत आहे.

वरील वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णतः माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस आता माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत, तथापि त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विहित मुदतीपेक्षा विलंब लावल्याचे व जी दिली ती अपूर्ण असल्याने त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे या कृतीव्दारे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे.  अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेल्या अशा प्रकारच्या विलंबामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१.	अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. आयुक्त, धुळे महानगरपालिका,धुळे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक २७-०८-२००८ राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गौतम संतोष पारेराव, दै. युगपरिवर्तन एक्सप्रेस कार्यालय, भिमनगर, गुरुकुल हायस्कूल जवळ, साक्री रोड, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, धुळे महानगरपालिका, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५०७

निर्णय दिनांक २७-०८-२००८

१ श्री. देवराम मुरलीधर मुसळे, : अपिलार्थी
मु. पो. अस्वली स्टेशन, तालुका इगतपुरी,
जिल्हा नाशिक

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, इगतपुरी,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. माधव निंबाजी पाटील, जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, इगतपुरी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. दिनकर तबाजी टेमकर, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी

असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. देवराम मुरलीधर मुसळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक ११-०४-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांना प्रथम अपिलीय अधिका-याकडून समर्पक उत्तर मिळाले नाही, त्यांनी दाखल केलेले प्रकरण निकाली काढण्यास विलंब होत आहे असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक ११-१०-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवाविषयक संदर्भात, "सेवापुस्तकात वरिष्ठ वेतनश्रेणीची नोंद, पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे फरक नोंद, पाचव्या वेतनाचा मंजुरीचा आदेशाची नोंद व आदेशाची झेरॉक्स प्रत जोडून संबंधित विषयाचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी यांच्याकडे पाठविण्यास विलंब का झाला" ही माहिती मागितली होती.
अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीचा प्रस्ताव दिनांक २०-१२-२००६ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांच्या कार्यालयास पाठविला असल्याचे त्यांना कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत

नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वर उल्लेख केल्याप्रमाणे दिनांक ११-०४-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-१०-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवासंदर्भातील वेतनवाढीच्या फरकाचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यासाठी विलंब का झाला याची माहिती विचारली होती तर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या आपल्या पत्राव्दारे अपिलार्थीचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडे दिनांक २०-१२-२००६ रोजी पाठविल्याचे कळविले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडे पाठविण्यास केलेल्या विलंबाची कारणे अपिलार्थीस दिली नाहीत, तसेच अपिलार्थीच्या दिनांक ११-१०-२००६ रोजीच्या अर्जावर त्यांनी दिनांक १०-११-२००६ रोजी अथवा तत्पूर्वी अधिनियमातील तरतुदीनुसार प्रतिसाद देणे अपेक्षित असतांना त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०१-२००७ रोजी म्हणजेच ७० दिवस इतक्या विलंबाने अपिलार्थीस चुकीचा प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या मागणीचे अवलोकन केले असता त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यास झालेल्या विलंबाची कारणे विचारली आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये दिलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता असे दिसून येईल की, माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहितीचे विश्वस्त या नात्याने अर्जदारास त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती विहित तरतुदीमध्ये देण्यासंबंधीचा निर्णय घ्यावयाचा असतो. माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना कारणे विचारणे, त्याचा खुलासेवजा अभिप्राय अपेक्षित करणे अशा प्रक्रियेचा समावेश नाही. जन माहिती अधिकारी

यांची माहिती अधिकार अधिनियमामध्ये भूमिका एका विश्वास्ताची असून त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास त्यांना देण्यासंदर्भात विहित मुदतीमध्ये निर्णय घेणे या अधिनियमानुसार त्यांना भाग असते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या प्रकरणी मागितलेली माहिती ही अशा प्रकारे अधिनियमातील ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत अशी नसल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय ठरत नाही, मात्र त्यांनी अपिलार्थीस त्यांना माहिती नाकारण्याचा निर्णय अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीमध्ये कळविला नसल्यामुळे त्यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झाल्याचे या प्रकरणी नि:संशयपणे दिसून येत आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद न देण्याच्या त्यांच्या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे सिध्द होत आहे. त्यांच्या या कृतीव्दारे त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात लागलेल्या विलंबाची कारणे उपस्थित जन माहिती अधिकारी आयोगास स्पष्टपणे सांगू शकले नाहीत.

सबब, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस आयोग करीत आहे.

अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णत: विसंगत असल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २७-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देवराम मुरलीधर मुसळे, मु. पो. अस्वली स्टेशन, तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, इगतपुरी, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५०८

निर्णय दिनांक २७-०८-२००८

१ श्री. मनोज निंबाजी हिवरकर, : अपिलार्थी
मु. काकोडा पो. कु-हा,
तालुका मुक्ताईनगर, जिल्हा जळगाव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप वनसंरक्षक, वनविभाग,
जळगाव, जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप वनसंरक्षक, वनविभाग,
जळगाव, जिल्हा जळगाव

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहाय्यक वन संरक्षक, उप वनसंरक्षक वनविभाग कार्यालय, जळगाव, जिल्हा जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. मोहमद फहीम महेमूद, सहाय्यक वन संरक्षक, उप वनसंरक्षक वनविभाग कार्यालय, जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. पद्माकर नारायण भामरे, जन अपिलीय अधिकारी तथा उप

वनसंरक्षक, वनविभाग, जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. मनोज निंबाजी हिवरकर हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १९-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित, सहाय्यक वनसंरक्षक रोहयो यांच्या दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या चौकशी अहवालाच्या संदर्भात केलेल्या कारवाईबाबत एकूण ८ मुद्दयांवर खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" १. सहाय्यक वनसंरक्षक (रो.ह.यो.) यांच्या वर उल्लेख केलेल्या चौकशी अहवालात वठोडा वनक्षेत्रपाल हे दोषी असल्याचे स्पष्ट करुन आपणाकडे कार्यवाही करण्याची शिफारस करुन सप्टेबर ०६ मध्ये आपणाकडे अहवाल सादर केला. सदर अहवालावरुन आपण दोषी कर्मचारी व अधीकारी यांच्या विरुदध काय कार्यवाही केली.

२. तसेच अहवाल सादर करुन ३ महीनेच्यावर कालावधी होऊन सुध्दा सदरचे प्रकरण हे अतीशय गंभीर स्वरुपाचे असतांना सूदधा टाळाटाळ व विलंब का होत आहे. या बाबत स्वता उपवनसंरक्षक यांचा खूलासा.

३. सदर प्रकरणाचे चौकशी अधीकारी कोण व मा. मूख्यवनसंरक्षक धूळे यांच्याकडून आपणास समंधीतावर कार्यवाहीबाबत किंवा चौकशी बाबत आदेश प्राप्त असल्यास त्यांच्या नकला.

४. सदर प्रकरणाबाबत स्वता उपवनसंरक्षक यांचा अहवाल साक्षांकीत प्रतीसह मिळावा.

५. वठोडा येथील अस्वलाच्या मृत्यूबाबत वैदयकीय अधीकारी यांचा अहवाल व मृत्यूचा दाखला.

६. वठोडा येथील अस्वलाच्या मृत्यूबाबत झालेल्या चौकशीचे अहवाल व पंचनामाच्या नकला.

७. अस्वलाच्या मृत्यू नेमका कोणत्या दिवशी झाला व त्यादिवशी वनपाल, वनरक्षक, वनक्षेत्रपाल हे हजर होते किंवा नाही याबाबत मा. उपवनसंरक्षक यांचा अहवाल.

८. तसेच दि. १९/१/०७ रोजी वनविभाग जळगाव येथील अधीका-यांनी भेट देऊन केलेल्या चौकशीचा अहवाल.”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०४-२००७ रोजी सुनावणी घेतली. या सुनावणी संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी निश्चितपणे कोणत्या दिवशी आदेश पारित केले त्याची माहिती आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन प्राप्त होऊ शकत नाही, मात्र जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी सहाय्यक वन संरक्षक रोहयो यांच्या दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या चौकशी अहवालाच्या संदर्भात केलेली कारवाई व अस्वलाच्या मृत्यूबाबत माहिती मागितली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली सहाय्यक वनसंरक्षक यांच्या दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या चौकशी अहवालावर केलेल्या कारवाईची व अस्वलाच्या मृत्यूबाबतची माहिती अपिलार्थीस मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक धुळे) यांच्या उप लोकआयुक्तांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक २७-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे. सदर माहिती अपिलार्थीस देतांना त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०४-२००७ रोजी झालेल्या चर्चेचा (कथित प्रथम अपिलावरील सुनावणी) उल्लेख केला आहे. मुख्य वनसंरक्षक यांनी उप लोकआयक्तांना सादर केलेल्या अहवालामध्ये अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०१-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचा समावेश आहे त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे असे ते समजत आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः जरी विहित मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती पाठविली होती असे काही प्रमाणात सिध्द होत आहे, मात्र अपिलार्थीने याच विषयासंदर्भात उप लोकआयुक्तांकडे केलेल्या तक्रारीवर मुख्य वनसंरक्षक, धुळे यांनी सादर केलेल्या अहवालाच्या प्रतीचे अवलोकन करता अपिलार्थीने मूळ माहितीच्या अर्जामध्ये संदर्भीत केलेल्या सहाय्यक वनसंरक्षक यांच्या दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या चौकशी अहवालामध्ये तथ्यांश आढळून आला नाही. त्यामुळे सहाय्यक वनसंरक्षकाच्या अहवालावर कोणतीही कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नव्हता. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी

केलेल्या अर्जाच्या संदर्भात न पुरविता अपिलार्थीने उप लोकआयुक्तांकडे केलेल्या दुस-या एका तक्रार अर्जासंदर्भात त्यांना दिल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती समर्थनीय नाही. कारण कोणाही अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत एकदा माहिती मागितली की, जरी ही माहिती अर्जदारास वेगळ्या संदर्भाव्दारे दिली असेल तरीही ती त्यांना याच अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे देणे त्यांना भाग आहे.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांवरील माहिती त्यांना हे आदेश निगमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

<u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांवरील माहिती त्यांना हे आदेश निगमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक २७-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनोज निंबाजी हिवरकर, मु. काकोडा पो. कु-हा, तालुका मुक्ताईनगर,

जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वन संरक्षक, उप वनसंरक्षक, वनविभाग कार्यालय, जळगाव, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, वनविभाग, जळगाव, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५०९

निर्णय दिनांक २७-०८-२००८

१ श्री. नामदेव तोताराम भोई, : अपिलार्थी
रा. पहूरपेठ, तालुका जामनेर,
जिल्हा जळगाव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा अधीक्षक भूमी अभिलेख,
जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक भूमी अभिलेख,
जळगाव

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जामनेर,
जिल्हा जळगांव

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नामदेव तोताराम भोई (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. पद्‌माकर देवचंद सोनवणे, जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जामनेर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) श्री. रमेश रामचंद्र देसाई, प्रमुख लिपीक, अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, जळगाव, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख, जळगाव यांचे

प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुकदेव तोताराम भोई त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-११-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१. पहूर ता. जामनेर येथील गट नं. ७२२/१ व ७२२/२ ची तारीख २१/७/९८ रोजी झालेल्या मोजणीच्या सीटची (नकाशाची) अस्सल नक्कल (कपत्रक) मिळणेबाबत.

२. श्री. सुकदेव तोताराम भोई यानी ता. ६/२/१९९६ रोजी दिलेल्या मोजणीच्या अर्जाची खरी नक्कल."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जामनेर तालुक्यातील कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जळगाव यांनी अपिलार्थीचा अर्ज दिनांक ०५-१२-२००५ रोजी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जामनेर यांच्याकडे पाठविला. तदनंतर तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जामनेर यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या अर्जास प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १३ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सुचनेप्रमाणे अपिलार्थीने दिनांक ०३-१०-२००६ रोजी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जामनेर यांच्या कार्यालयात आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीतील नकाशाची प्रत तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जामनेर यांनी दिली. यावेळी त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या श्री. सुकदेव तोताराम भोई यांच्या दिनांक ०६-०२-१९९६ रोजीच्या अर्जाची प्रत त्यांना दिली नाही. याप्रमाणे घटनाक्रम घडत असतांना जन माहिती

अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले होते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०७-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १७-०८-२००६ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक ०८-०९-२००६ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत माहिती पुरविण्याचे आदेश दिले.

तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचे नमूद करुन, सदर माहिती देण्यासाठी संबधित जन माहिती अधिकारी हे जाणुनबुजून वेळकाढूपणा करीत असून त्यांनी दडपशाही मार्गाचा अवलंब करुन खोटी मोजणी केली असल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेला मोजणीचा नकाशा उपसंचालक, भूमी अभिलेख यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत त्यांना प्राप्त झाला. त्यांनी मूळ अर्जात मागणी केलेली श्री. सुकदेव तोताराम भोई यांनी दिनांक ०६-०२-१९९६ रोजी दिलेल्या मोजणी अर्जाची खरी नक्कल त्यांना अद्यापही प्राप्त झाली नाही. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या वर्तनाबाबत गंभीर आक्षेप घेतले असून संबंधितांनी त्यांच्या जमिनीची मोजणी चुकीच्या पध्दतीने केली असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जातील २ मुद्दयांपैकी एका मुद्दयावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-१०-२००६ रोजी पुरविली असून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ ची माहिती त्यांनी अद्यापही अपिलार्थीस दिली नाही. उपसंचालक कार्यालयाकडून अपिलार्थीस माहिती देण्यापोटीची धारिका त्यांना विलंबाने प्राप्त झाल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब लागला.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या दिनांक ०६-०२-१९९६ रोजीच्या पत्राची प्रत अपिलार्थीस देण्यासाठी त्यांची काही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सोपे व व्याप्ती मर्यादित अशी होती. अपिलार्थीस ही माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांना विहित मुदतीत कारवाई करणे सहज शक्य होते, तथापि तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जळगाव यांच्याकडून दिनांक ०५-१२-२००५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला असता, त्यावर जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद दिला तोच मुळी दिनांक ०७-०९-२००६ रोजी, म्हणजे अधिनियमाव्दारे माहिती देण्यासाठी विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर आठ महिन्याने. अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, माहिती देण्यासाठी कालावधी व्यपगत झाल्याने विनामूल्य माहिती देणे भाग होते. मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०९-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आठ महिने इतका उशीरा प्रतिसाद देऊनही त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १३ त्यांच्या कार्यालयास भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्क दिनांक ०३-१०-२००६ रोजी भरल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-१०-२००६ रोजी त्यांनी मागणी केलेल्या २ मुद्दयांवरील माहितीपैकी एका मुद्यावरील

माहिती दिली व मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांनी आज रोजी आणली आहे व ती, ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस सर्वसाधारणत: जी माहिती दिनांक २७-१२-२००५ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे अपेक्षित होते ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०३-१०-२००६ रोजी अपिलार्थीस सशुल्क प्राप्त झाली. सदर माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना ९ महिने ६ दिवस इतका विलंब लागल्याचे दिसून येत आहे. सदर विलंबाचे समर्थन करतांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची धारिका त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडून उशिराने प्राप्त झाल्याचे सांगितले. त्यांचा हा युक्तिवाद आयोग मान्य करीत नाही, कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर अपिलार्थीने अर्ज करतेवेळी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नव्हती तर ज्या कार्यालयात ती उपलब्ध होती त्या कार्यालयाकडे अपिलार्थीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार त्यांनी पाठविणे भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विहित मुदतीपेक्षा जास्त विलंब झाला असूनही त्यांनी ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देऊ केली. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस खचितच पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीमध्ये संपूर्ण माहिती न देणे, माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असतांनाही माहिती देण्यासाठी शुल्क आकारणे, विलंबाने दिलेली माहिती अपूर्ण असणे, हे सर्व मुद्दे पाहता, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई आदेशित करणे आयोगास उचित वाटत आहे.

सबब असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले संबंधीत कर्मचारी / सहाय्यक या सर्वांवर त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात लावलेल्या

असमर्थनीय विलंबाबाबत विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार) इतकी एकत्रित शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली सप्टेंबर २००८ पासून जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा. या शास्तीची कर्मचारी / अधिकारी निहाय विभागणी अधीक्षक भूमी अभिलेख, जळगाव यांनी त्वरीत करावी.

अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ ची माहिती देण्याविषयी जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ ची माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीस विनामूल्य माहिती देणे भाग असतांनाही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीपोटी शुल्क रुपये १३ इतके आकारले आहे, त्यांची ही कृती चुकीची आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देता त्यांनी अपिलार्थीस माहिती देतांना शुल्क आकारण्याच्या त्यांच्या चुकीच्या कृतीबाबत असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटी प्राप्त करुन घेतलेले शुल्क रुपये १३ त्यांना हे आदेश निर्गमित होताच २४ तासाच्या आत परत करावे. अपिलार्थीने आज आयोगासमोर त्यांच्या शेताच्या मोजणीविषयी आपल्या युक्तिवादामध्ये काही शंका (खोटी व चुकीची मोजणी इ.) व्यक्त केल्या आहेत त्याचे निराकरण त्यांना जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्याकडून करुन घ्यावे लागेल, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

<u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ ची माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी निकालपत्रात वर विवेचन केल्याप्रमाणे करावा. शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी अधीक्षक भूमी अभिलेख, जळगाव यांनी त्वरित करावी.

४. वरील क्रमांक ३ च्या आदेशाचे अनुपालन होईल असे अधीक्षक, भूमी अभिलेख, जळगाव यांनी पहावे.

५. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटी प्राप्त करुन घेतलेले शुल्क रुपये १३ त्यांना हे आदेश निर्गमित होताच २४ तासाच्या आत परत करावे.

औरंगाबाद
दिनांक २७-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नामदेव तोताराम भोई, रा. पहूरपेठ, तालुका जामनेर, जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जामनेर, जिल्हा

जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे, विधान भवनासमोर, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५११

निर्णय दिनांक : २८-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नरेंद्र भास्करराव पाटील,<br>रा.जळगाव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज मर्यादित जळगाव यांचे **नुतन मराठा कॉलेज,जळगाव, जिल्हा पेठ, जळगाव**<br>(श्री.सा.स.पाटील कला, भाऊसाहेब टी.टी साळुंखे वाणिज्य व श्री. जी.आर.पंडीत विज्ञान महाविद्यालय) | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज मर्यादित जळगाव यांचे **नुतन मराठा कॉलेज,जळगाव जिल्हा पेठ, जळगाव**<br>(श्री.सा.स.पाटील कला, भाऊसाहेब टी.टी साळुंखे वाणिज्य व श्री. जी.आर.पंडीत विज्ञान महाविद्यालय) | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. नरेंद्र भास्करराव पाटील यांचे वकील ॲड. अभया शेलकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) या हजर आहेत, तर जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज मर्यादित जळगाव यांचे नुतन मराठा कॉलेज,जळगाव येथील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.०२.०६.२००६ रोजीच्या राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दाखल केलेले द्वितीय अपील विचाराधीन आहे. सदर अपिलाची मुंबई येथील कार्यालयात दि. ११.६.२००६ रोजी नोंद झालेली आहे. आयोगास सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, संबंधित महाविद्यालयाकडून त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ प्रमाणे मागणी केलेली माहिती त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही, जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी या महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे अपील केले. तथापि अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणतेही उत्तर दिले नाही अथवा त्यांना सुनावणीसाठी बोलावले नाही, असे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या संस्थेतील भ्रष्टाचाराचे प्रकरण दडवून ठेवण्यासाठी व केलेला भ्रष्टाचार उघड होऊ नये म्हणून त्यांनी माहितीच्या अधिकार अधिनियमान्वये मागितलेल्या माहितीच्या अर्जास उत्तरही दिले नाही, असेही पुढे त्यांनी या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

आज रोजी अपिलार्थी यांच्यातर्फे ॲड. अभया शेलकर या उपस्थित आहेत, त्यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ च्या तरतुदीप्रमाणे संबंधित महाविद्यालयाकडे दि. २४.१.२००६ रोजी काही माहितीची मागणी केली असता या अर्जास संबंधित शिक्षण संस्थेकडून कोणतेही उत्तर देण्यात आले नाही. तसेच या महाविद्यालयातील प्राचार्यांकडे दि. १८.३.२००६ रोजी प्रथम अपील केले असता त्या अपील अर्जाची संबंधित प्राचार्यांनी कोणतीही दखल घेतली नाही. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे असेही सांगितले की, या महाविद्यालयास शासकीय अनुदान प्राप्त होत असून व त्याद्वारे ते सार्वजनिक प्राधिकरण होत असूनही त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका केल्याचे त्यांच्या ऐकीवात नाही अथवा त्यांच्या नावांचे फलक या महाविद्यालयात अद्यापही लावले गेले नाहीत.

अपिलार्थी यांच्यातर्फे केलेल्या वरील युक्तिवादाची आयोगाने दखल घेतली असून शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), जळगाव यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधित महाविद्यालयामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या अद्याप नेमणूका केल्या गेल्या नसल्यास, संबंधित महाविद्यालयामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका व त्यांच्या नावांचे फलक महाविद्यालयात सर्व अभ्यागतांना सहजपणे दृष्टोत्पत्तीस पडतील अशाठिकाणी लावण्याची कार्यवाही, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत होईल, असे पहावे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, या प्रकरणी संस्थेच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी होणे, आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते शिक्षण विभागाचे माहिती अधिकाराच्या तरतुदीबाबत धोरण पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून संबंधित संस्थेच्या अध्यक्ष/सचिव यांनी अथवा जो जन अपिलीय अधिकारी म्हणून सध्या कार्यरत असेल अशा व्यक्तिने या प्रकरणाची प्रथम सुनावणी घ्यावी, असे आयोगाचे मत आहे. सबब अध्यक्ष, जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज मर्यादित, जळगाव यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या त्यांच्या नूतन मराठा महाविद्यालयामध्ये दाखल केलेल्या दि. १८.३.२००६ रोजीच्या प्रथम अपिलाची, प्रथम अपिलास होणारा संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याचे आत सुनावणी घेऊन, या संदर्भातील आपले लेखी आदेश सुनावणीनंतर सात दिवसांच्या आत, पारित करावेत. सदर निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील निकाली काढण्यात येत आहे.

२ अध्यक्ष/सचिव, जळगाव जिल्हा मराठा विद्याप्रसारक सहकारी समाज मर्यादित जळगाव अथवा इतर नियुक्त जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे प्रथम अपिलावर, अपील दाखल करण्यास होणारा संभाव्य विलंब क्षमापित करुन हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याचे आत सुनावणी घेऊन, या संदर्भातील आपले आदेश सुनावणीनंतर सात दिवसांच्या आत लेखी पारित करावेत.

३ सहसंचालक (उच्च शिक्षण), जळगाव यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधित महाविद्यालयामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका अद्याप केल्या गेल्या नसल्यास, संबंधित महाविद्यालयामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका व त्यांच्या नावांचे फलक महाविद्यालयात सर्वांना सहजपणे दृष्टोत्पत्तीस पडतील अशाठिकाणी लावण्याची कार्यवाही, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत होईल, असे पहावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २८-०८-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नरेंद्र भास्करराव पाटील, ७१, दिक्षीतवाडी, जिल्हापेठ, जळगाव-४२५००१

२. जन माहिती अधिकारी , प्राचार्य, जळगाव जिल्हा मराठा विद्याप्रसारक सहकारी समाज मर्यादित जळगाव यांचे नुतन मराठा कॉलेज,**जळगाव जिल्हा पेठ, जळगाव** (श्री.सा.स.पाटील कला, भाऊसाहेब टी.टी साळुंखे वाणिज्य व श्री. जी.आर.पंडीत विज्ञान महाविद्यालय)यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. अध्यक्ष, जळगाव जिल्हा मराठा विद्याप्रसारक सहकारी समाज मर्यादित जळगाव **जिल्हा पेठ, जळगाव** (श्री.सा.स.पाटील कला, भाऊसाहेब टी.टी साळुंखे वाणिज्य व

श्री. जी.आर.पंडीत विज्ञान महाविद्यालय) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सहसंचालक (उच्च शिक्षण), जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५१२

निर्णय दिनांक : २८-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सुधाकर पुंडलिक जाधव,<br>रा. नाशिक | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>अवरसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये<br>विभाग, मंत्रालय,मुंबई. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये<br>विभाग, मंत्रालय,मुंबई. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. मुकुंद तुकाराम कांबळे, जन माहिती अधिकारी तथा अवरसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,मुंबई (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. विठ्ठल लालजी ढोले, जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,मुंबई (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. सुधाकर पुंडलिक जाधव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२५.०१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या क्र. १,२ व ३/२००७ या जाहीरातीसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती

" The Deputy Registrars in MUHS, when applied for the post which they are holding had the experience as Assistant Registrar some months. Even when appointed one had experience as Assistant Registrar in months and another had a year and odd months.

PROVIDE THE INFO

Then why you, this time, are asking experience for 5 years? Either this time it wrong or that time it was wrong. Which you are setting right? Like this there are number of cases in MUHS which you have sanctioned for issuing of permanent orders. Are you taking corrective measures? It is learnt that some these ineligible candidates are being considered for promotions. Are you at least this time going to clear only eligible cases? Are you seeking the help of MPSC like Organizations to check eligibility of these regular cases and getting those vacancies too for these advertisements? "

अपिलार्थी यांनी सदर माहिती पोस्टाने अपेक्षिली होती.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज सचिव (वैद्यकीय शिक्षण) यांच्याकडे केला होता. तथापि त्यांनी मागितलेली माहिती सचिव (वैद्यकीय शिक्षण) यांच्याकडे उपलब्ध नसल्याने सदर माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे त्या प्राधिकरणाकडे म्हणजे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे अपिलार्थीचा अर्ज त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार दि. २०.२.२००७ रोजी पाठविला. अपिलार्थीचा अर्ज महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दि. २०.३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१०/- इतके त्यांच्या कार्यालयाचे भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१)

अन्वये सचिव (वैद्यकीय शिक्षण) यांच्याकडेच दि. ०७.०३.२००७ रोजी प्रथम अपील केले. याही वेळी अपिलार्थीने चुकीच्या प्राधिकरणाकडे प्रथम अपील केल्याने सचिव (वैद्यकीय शिक्षण) यांनी अपिलार्थीचा दि. ७.३.२००७ रोजीचा अपील अर्ज महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे दि. १६.४.२००७ रोजी पाठवून दिला. तथापि अपिलार्थीच्या अपील अर्जावर विद्यापीठातील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेता, अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नाही, या कारणास्तव अपिलार्थीचा अपील अर्ज अवर सचिव (वैद्यकीय शिक्षण) यांच्याकडे दि. ३०.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविला. यानंतर सचिव (वैद्यकीय शिक्षण) व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्यामध्ये बराच पत्रव्यवहार झाल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. मात्र अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही निश्चित स्वरुपाचा निर्णय झाला नाही, हे दिसून येते. वरील सर्व प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०५.२००७ रोजी द्वितीय अपील करुन या अपील अर्जात त्यांची मूळ माहितीची मागणी कायम ठेवून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने नेमणूका व पदोन्नत्यांसंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबत काही शंका उपस्थित केल्या आहेत. या अपील अर्जामध्ये त्यांनी कल्पना पाटील, सौ.पाटील, श्री.घुगे, सौ.विद्या ठाकरे, श्री. नेरकर, श्री. फुगारे आणि श्री. राव राणे यांच्या नेमणूकांवर व पदोन्नत्यांवर आक्षेप घेतले आहेत. तसेच श्री. कळसकर यांना फक्त वरिष्ठ लिपीकाचा अनुभव असताना, त्यांना सहायक प्रबंधक या पदावर पदोन्नती कशी दिली याची कारणे सचिव (वैद्यकीय शिक्षण) यांच्याकडून अपेक्षिली आहेत.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दि. २५.१.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती मंत्रालयाच्या वैद्यकीय शिक्षण विभागाशी संबंधित नव्हती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संबंधित असून ती एक स्वायत्त संस्था आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने वेळोवेळी दिलेल्या नेमणूका व पदोन्नत्यांना अद्यापपर्यंत शासनातर्फे मान्यता देण्यात येत नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना कळविण्याचा प्रश्न येत नव्हता. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अर्ज माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्षतः ज्या प्राधिकरणाच्या ताब्यात आहे, त्या प्राधिकरणाकडे म्हणजे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला. विद्यापीठाने अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१०/- त्यांना भरण्याचे कळविले. तथापि अपिलार्थीने हे शुल्क न भरल्याने अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव,(वैद्यकीय शिक्षण) यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, मूळात अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. ७.३.२००७ रोजी केलेल्या अपील अर्जासंदर्भात ते जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केले गेलेले नाहीत. अपिलार्थीने दि. ७.३.२००७ रोजीचा अर्ज चुकीच्या प्राधिकरणाकडे प्रथमतः केलेला असल्याने, त्यांनी अपिलार्थीचा दि. ७.३.२००७ रोजीचा अर्ज महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे दि. १६.४.२००७ रोजी पाठवून दिला. तथापि विद्यापीठाने अपिलार्थीचा अपील अर्ज, अपिलार्थीने माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क त्यांच्याकडे भरले नसल्याने दि. ३०.४.२००७ रोजी परत त्यांच्याकडे पाठवून दिला. अपिलार्थीच्या अपील अर्जावर आजतागायत सुनावणी होऊन कोणताही निश्चित निर्णय पारित केला गेला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की,अपिलार्थीने मूलतः त्यांना आवश्यक असलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे, त्यांच्याकडील माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील करावयास हवे होते. तथापि अपिलार्थीने माहितीसाठीचा प्रथम अर्ज व त्यावरील अपील हे सचिव (वैद्यकीय शिक्षण) यांच्याकडे केले आहे. प्रथम अर्ज व अपील करताना अपिलार्थीची अशी धारणा असावी की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या नेमणूका व पदोन्नत्यांच्या कार्यवाहीस सचिव (वैद्यकीय शिक्षण) यांची मान्यता आहे किंवा या नेमणूका व पदोन्नत्यांवर शासनाचे सचिव या नात्याने त्यांचे नियंत्रण आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नियम १९९८ मधील कलम ९ मध्ये शासनाचे विद्यापीठावर नियंत्रण, या मुद्यासंदर्भात पुरेसे भाष्य केलेले आहे. यामधील उपकलम ३ नुसार शासनाने या विद्यापीठामध्ये नेमणूका व पदोन्नत्या देताना काय कार्यवाही करावयाची आहे, याचे नियम व पध्दती शासकीय अधिसूचनेद्वारे प्रसिध्द करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. तथापि वैद्यकीय शिक्षण विभागाच्या उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून आयोगास असे अवगत केले गेले की, अद्यापपर्यंत यासंदर्भात अधिसूचना प्रसिध्द करण्याची कार्यवाही केली गेली नाही.मात्र विद्यापीठाने यासंदर्भात त्यांची स्वतःची नियमावली तात्पुरत्या स्वरुपात प्रसिध्द केली आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या त्यांच्या दि. २५.१.२००७ रोजीच्या अर्जातील अपेक्षित माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने चुकीच्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली, व जी माहिती मागितली ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अभिप्राय व खुलासे अपेक्षित करणारी, अशा स्वरुपात मागितली आहे. माहिती

अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुरेशी स्पष्ट करण्यात आली असून ती खालीलप्रमाणे आहे.

**" 'माहिती' याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो."**

वरील व्याख्येचे अवलोकन केले असता यामध्ये जन माहिती अधिकारी यांची भूमिका पुरेशी स्पष्ट करण्यात आली असून असे दिसून येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांची भूमिका एका विश्वस्ताची असून त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे ज्या-ज्या वेळी एखाद्या अर्जाद्वारे मागितली जाईल, त्या अर्जासंदर्भात निर्णय घेणे एवढयापुरतीच मर्यादित असते. यामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या प्रशासनाविषयी प्रश्न विचारणे, अमुक एक निर्णय का घेतला नाही किंवा का घेतला, अशाप्रकारचे प्रश्न विचारणे व त्याची उत्तरे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अभिप्रेत नाही. मूळात अपिलार्थीने मागितलेली माहिती अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने त्यांना ही माहिती कोणत्याही जन माहिती अधिकारी यांच्याकडून (मंत्रालय व विद्यापीठ) देय होत नाही, हे पाहता, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात्, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा केलेला मूळ अर्ज व त्यावर केलेले अपील या संदर्भात मंत्रालयीन विभाग व आरोग्य विज्ञान

विद्यापीठ यांच्यामध्ये झालेला पत्रव्यवहार पाहता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने अपिलार्थीच्या अपिलासंदर्भात निर्णय देण्यासाठी पूर्णपणे टाळल्याचे दिसून येते. त्यांची ही कृती बरोबर नसून अपिलार्थीचे अपील त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीच्या अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी ठोस निर्णय देणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या माहितीसाठीच्या अर्जावर, त्यावरील अपिलावर निर्णय घेताना त्यांनी अशाप्रकारच्या चुका इतःपर करु नयेत,अशी सूचना त्यांना आयोगातर्फे देण्यात येत आहे.  तसेच सचिव (वैद्यकीय शिक्षण) यांना असे सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नियम १९९८ मधील कलम ९(३) च्या संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही, त्यांनी इतःपर कालापव्यय न करता त्वरेने करावी, म्हणजे विद्यापीठाचा कारभार अधिक पारदर्शक होऊ शकेल.

प्रसंगावशात् सचिव (वैद्यकीय शिक्षण) यांना असेही सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे सदर विद्यापीठाने वेळोवेळी केलेल्या नेमणूका, दिलेल्या पदोन्नत्यासंदर्भात केलेल्या या तक्रारींवर शासनाच्या योग्य त्या स्तरावर विशिष्ट मुदतीत चौकशी करुन या तक्रारीचे त्यांनी त्वरेने निराकरण करावे, जेणेकरुन भविष्यात अशाप्रकारच्या तक्रारींना वाव रहाणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१ अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुधाकर पुंडलिक जाधव, रा.'श्री' निवास, गोसावीनगर, कॅनालरोड, नाशिकरोड नाशिक-१०१.

२. जन माहिती अधिकारी तथा अवरसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये) मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५१४

निर्णय दिनांक : २८-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. योगेशकुमार सुरेशचंद्र वर्मा,<br>रा. अमळनेर, जि.जळगाव. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,<br>सिन्नर, जि.नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक, भूमि अभिलेख,<br>नाशिक | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. योगेशकुमार सुरेशचंद्र वर्मा यांच्यातर्फे त्यांचे वडिल श्री. सुरेशचंद्र कुंदनलाल वर्मा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),श्री. गोरक संतराम डोंगरे, जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,सिन्नर,जि.नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. प्रदीप अण्णासाहेब पाटील, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख,नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे श्री. मच्छिंद्रनाथ साहेबराव मुरकुटे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,सिन्नर जि.नाशिक व श्री.बाळू दादा काळे, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, नाशिक यांच्यासह हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.०७.०४.२००६ रोजीच्या अर्जान्वये कसबे सिन्नर ता.सिन्नर येथील न.भू.क्र.४५५९, ४५६० व ४५६१ या मिळकतीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ८.८.२००५ ते ७.४.२००६ या कालावधीशी संबंधित माहिती खालीलप्रमाणे मागितली होती

" आपले कडील दि. २४.३.२००६ च्या नकलांचे अवलोकन केले असता न.भु.क्रं.४५५९ चा मिळकतीवर वारसांची नोंद न करता सौ. सुरेखा सुरेश वर्मा हिचे नाव कायम ठेवण्यात आले असुन न.भु.क्रं.४५६० व ४५६१अ या मिळकतीवर मात्र वारसांची नावे दाखल करण्यात आलेली आहेत. तरी ज्या नियमानुसार न.भू.क्र.४५५९ या मिळकतीवर सौ. सुरेखा सुरेश वर्मा हिचे नाव कायम ठेवण्यात त्या नियमाची माहिती मिळावी.

२) आपले कडील २३/२/०६ चा पत्रानुसार आपण जी माहिती मला देण्यात आली, त्यानुसार "हरकत अर्जावर श्री. प्रकाश हिरालाल वर्मा यांना सदर मिळकतीवर वारसनोंदीबाबत हरकत घेतलेबद्दल पुराव्याचे कागदपत्र सादर करणेबाबत दि. ३१.१.०६ रोजी प्रत्यक्ष पत्रान्वये कळविलेले आहे. यावर त्यांचे काही एक म्हणणे नाही किंवा कागदपत्रे दाखल केलेली नाही. तरी सदर प्रकरणी नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत येईल. व कार्यवाही संबंधातील निकाल आपणांस कळविणेत येईल याची नोंद घ्यावी''

3) तरी आपण मला आपल्या पत्रानुसार मला निकाल का कळविण्यात आला नाही, याची खुलासा? हरकत अर्जदाराची कोणतेही म्हणणे नाही

किंवा कोणतेही कागदपत्र केली नाही. तरी आपण न.भु.क्र.४५५९ या मिळकतीवर वारस नोंद का केली नाही ?"

अपिलार्थी यांनी सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१६/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. (अपिलार्थीस माहिती देण्यासाठी एकूण रु. ४६/- इतके शुल्क लागणार होते, तथापि त्यापैकी रु.३०/- इतके शुल्क मनिऑर्डरद्वारे अपिलार्थीने स्वतःहून यापूर्वी पाठविले असल्याने, जन माहिती अधिकारी यांनी फक्त रु.१६/- इतकीच रक्कम त्यांच्या कार्यालयाकडे भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले) तथापि अपिलार्थीने या रकमेचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केला नाही. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये दि. २१.४.२००६ रोजी तयार करुन ठेवले होते. तथापि त्यांनी ते अपिलार्थीस दि. २.५.२००६ रोजी पाठविल्याचे दिसून येत अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा न करताही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. --/४/२००६ या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती दिली. सदर पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.४.२००६ रोजी सही केली असून सदर पत्र प्रत्यक्षतः दि. २.५.२००६ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने त्यांनी अपिलार्थीस पाठविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या या पत्राचे अवलोकन करता त्यावरुन अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जातील कोणत्याही मुद्यावर त्यांनी माहिती दिल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.५.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.७.२००६ रोजी

सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २४.७.२००६ रोजी पारित केले आहेत. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात उपस्थित केलेल्या मुद्दा क्र. १ बाबत विचारलेली माहिती देण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि.११.९.२००६ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयावर आक्षेप घेऊन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख यांचे लिहिणे लबाडीचे असल्याचे म्हटले आहे. तसेच खरेदीखताची नोंद सहा वर्षानंतर घेऊन आपल्या कामातील अनियमितता स्वतःच दाखवून दिल्याने तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, सिन्नर हे शिस्त व अपील १९७९ प्रमाणे कार्यवाही करण्यास पात्र ठरतात, असे त्यांनी यामध्ये नमूद केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की,ज्या मिळकतीविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली होती, त्या तीनही मिळकती त्यांच्या पत्नी सौ.सुरेखा सुरेश वर्मा यांच्या मालकीच्या होत्या. त्यांचे दि. ८.५.२००२ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनानंतरही इ.स. २००७ सालापर्यंत या मिळकतीवर सौ. सुरेखा वर्मा यांच्याच मालकीहक्काची नोंद कायम ठेवलेली होती. या मिळकतीवर पती म्हणून वारस अर्ज तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्या कार्यालयाकडे २००५ मध्ये केल्यानंतर सदर मिळकतीची विक्री कुलमुखत्यारपत्रधारक श्री. प्रकाश हिरालाल वर्मा यांनी इ.स.१९९९ मध्ये केल्याचे त्यांना समजले. कुलमुखत्यारपत्रधारक यांनी केलेला सदर व्यवहार अनियमित आहे. नियमानुसार मिळकतीचे खरेदी-विक्री व्यवहार झाल्यानंतर तीन महिन्याचे आत मिळकतीच्या

मालकीहक्काची नोंद संबंधित अधिकाऱ्याने करणे गरजेचे असताना तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, सिन्नर यांनी २००५ सालापर्यंत अशाप्रकारची नोंद केली नव्हती. या मिळकतीची मालकी/वारसाहक्क श्री. प्रकाश हिरालाल वर्मा यांचा काहीच संबंध नसताना त्यांच्याकडून 'इंडेक्स दोन' च्या प्रती स्वीकारुन चौकशी सुरु करणे हे तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,सिन्नर यांचे कृत्य अतिवादीपणाचे ठरत असल्याने त्यांच्यावर यथायोग्य कारवाई करणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. २१.११.२००७ पासून कार्यरत आहेत. या प्रकरणाच्या संबंधाने त्यांना कोणतीही माहिती नाही.

तत्कालीन जन अपिलीय अधिकारी श्री. बाळू दादा काळे (आता नंदूरबार येथे कार्यरत) यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १९.५.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि.१९.५.२००६ व १०.७.२००६ रोजी अशा दोन सुनावण्या घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २४.७.२००६ रोजी पारित केले आहेत. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या मुद्दा क्र. १ च्या संदर्भात अपिलार्थीस समजेल अशा स्वरुपात माहिती विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते.

आज रोजी सुनावणीस त्रयस्थ पक्ष श्री. प्रकाश हिरालाल वर्मा हे अनुपस्थित आहेत, त्यामुळे त्यांचे म्हणणे येथे नोंदविता आले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे - "(१) न.भू.क्र.४५५९ या मिळकतीवर वारसाची नोंद न करता सौ.सुरेखा सुरेश वर्मा यांचे नाव ज्या नियमान्वये कायम ठेवण्यात आले, अशा

नियमाची माहिती (२) आपण मला आपल्या पत्रानुसार निकाल का कळविला नाही व (३) न.भू.क्र.४५५९ या मिळकतीवर वारस नोंद का केली नाही"  या तीन मुद्यांवर माहिती विचारली होती. यापैकी १ल्या मुद्यावरील माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील माहिती या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरते. मात्र अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ व ३  या मुद्यांशी संबंधित माहिती अपिलार्थीस देय ठरत नाही. कारण या दोनही मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना निकाल का कळविला नाही, वारसा नोंद का केली नाही, अशाप्रकारची माहिती विचारली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुरेशी स्पष्ट करण्यात आली आहे. सदर व्याख्येचे अवलोकन करता अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ या मुद्यांशी संबंधित माहिती या व्याख्येशी पूर्णतया विसंगत असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांची भूमिका एका विश्वस्ताची असून, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमानुसार त्यांच्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ती देणेसंदर्भात विहित मुदतीत नाकारणे किंवा जशीच्या-तशी देणे, अशी आहे. त्यांनी अमुक एक निर्णय का घेतला नाही किंवा अर्जदाराच्या पत्राला उत्तर का दिले नाही, याचा खुलासा अथवा स्पष्टीकरण अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास असे खुलासे देणे, या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या दोन मुद्यांवर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय ठरत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देतांना अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १ विषयी अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती देण्याचे

जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते, तथापि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्र.१ च्या संबंधाने कोणतीही माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीच्या या माहितीसंदर्भात त्यांनी वेगळ्या पत्राद्वारे माहिती पुरविल्याचे त्यांनी आयोगासमोरील युक्तिवादामध्ये सांगितले. तथापि सदर युक्तिवाद आयोगास मान्य नाही, कारण जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २४.७.२००६ रोजीच्या आदेशास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या आदेशानंतर माहिती देण्यासाठी कोणत्याही प्रकारे सकारात्मक कार्यवाही केल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब उपसंचालक, भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली देय माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या लेखी निवेदनामध्ये तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,सिन्नर यांनी १९९९ पूर्वीच न.भू.क्र.४५५९ या मिळकतीच्या फेरफारवहीवर वारसाची नोंद न घेऊन मिळकतपत्रिका दुरुस्त न करुन दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल यथायोग्य प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक ठरते, असे आपले अभिप्राय नमूद केले आहेत, अपिलार्थीच्या या

अभिप्रायाची नोंद घेणे आयोग आवश्यक समजत नाही, कारण ही बाब पूर्णतः प्रशासकीय असल्याने याबाबतचे निर्णय संबंधित सक्षम प्राधिकरणाने घ्यावयाचे आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली देय माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३ उपसंचालक, भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश नाशिक यांना उपरोक्त प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. योगेशकुमार सुरेशचंद्र वर्मा, रा. सराफा बाजार, मु.पो.अमळनेर जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख,सिन्नर जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, नाशिक यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपसंचालक, भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, सी.बी.एस.जवळ,पद्मा हॉटेलसमोर, शरणपूररोड नाशिक-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५१५

निर्णय दिनांक : २८-०८-२००८

१ श्री. संजीव कमलाकर झांबरे, फैजपूर, ता.यावल जि. जळगाव. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नगर पालिका संचलित श्री.आ.ग.हायस्कुल, सावदा, ता.रावेर, जि.जळगाव : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगाव.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. विश्वास मधुसुदन बामणोदकर,प्रयोगशाळा सहायक जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नगर पालिका संचलित श्री.आ.गं. हायस्कुल, सावदा, ता.रावेर, जि.जळगाव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. यशवंत नामदेव ठोसरे, उपशिक्षणाधिकारी, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जळगाव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. संजीव कमलाकर झांबरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०१.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील विचाराधीन आहे. आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्यामुळे त्यांना कोणाताही आदेश प्राप्त झाला नाही, जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घ्यावी, यासाठी दोन पत्रे पाठवूनसुध्दा विहित मुदतीत सुनावणी न घेतल्याने त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दि. २८.६.२००६ रोजीच्या अर्जान्वये सन २००० ते २००६ या कालावधीशी संबंधित श्री. आ.गं.हायस्कूल व श्री. ना.वि.पाटील विद्या मंदिर सावदा या दोन्ही शाळेमधील कर्मचारी भरती संदर्भात एकूण १३ मुद्यांवर माहिती मागविली होती. यासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ८.९.२००६ रोजी प्रथम अपील केले होते. सदर अपील त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जळगाव यांच्याकडे केले होते, तथापि त्यावेळी संबंधित संस्थेचे सचिव यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमण्याच्या सूचना शिक्षण विभागाकडून सर्व शैक्षणिक संस्थांना पारित केल्या गेल्या होत्या. त्यामुळे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.जळगाव यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नाही व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ४.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळवून या संदर्भातील त्यांचे प्रथम अपील संबंधित शिक्षण संस्थेच्या सचिवांकडे करण्याचे सूचित केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीने संबंधित शिक्षण संस्थेच्या सचिवांकडे अपील केले होते किंवा कसे हे आढळून येत नाही. आता

शिक्षण संचालनालयाने जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांची अशाप्रकारच्या प्रकरणांकरिता जन अपिलीय अधिकारी म्हणून त्यांचे पत्र क्र. संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ कं(८) ६०३७ दि.२६.११.२००७ अन्वये नेमणूक केली आहे. हे पाहता, या टप्प्यावर अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद जळगाव यांनी सुनावणी घेणे उचित राहील, असे आयोगाचे मत आहे. सबब शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जळगाव यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या, नगर पालिका संचलित श्री.आ.गं. हायस्कुल, सावदा, ता.रावेर, जि.जळगाव यांच्याकडे दाखल केलेल्या दि. ०८.०९.२००६ रोजीच्या प्रथम अपिलाची, प्रथम अपिलास होणारा संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याचे आत सुनावणी घेऊन, या संदर्भातील आपले लेखी आदेश सुनावणीनंतर सात दिवसांच्या आत पारित करावेत. सदर निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील निकाली काढण्यात येत आहे.

२ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जळगाव यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे प्रथम अपिलावर, अपील दाखल करण्यास होणारा संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच

एक महिन्याचे आत सुनावणी घेऊन, या संदर्भातील आपले आदेश सुनावणीनंतर सात दिवसांच्या आत लेखी पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २८-०८-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजीव कमलाकर झांबरे, नम्रतानगर,फैजपूर, ता.यावल जि. जळगाव.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नगर पालिका संचलित श्री.आ.गं.हायस्कुल, सावदा, ता.रावेर, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५१६

निर्णय दिनांक २९-०८-२००८

१ श्री. संतोष गंगाधर वायकंडे, : अपिलार्थी
घ. नं. ४५६९, गणेशवाडी, पंचवटी,
नाशिक - ०३

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त
कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
नाशिक विभाग, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. पुंडलिक जयराम जोपळे, जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. किरण मगन वसावे, जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक (यापुढे त्यांना जन

अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. संतोष गंगाधर वायकंडे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०५-०५-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अर्जावर अपिलार्थीने २१-०४-२००७ अशी तारीख लिहिली असून या अपिलाची नोंदणी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०५-०५-२००७ रोजी झाल्याचे दिसून येते. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांनी दिनांक २१-०२-२००७ रोजी केलेल्या अपिलावर त्यांना माहिती प्राप्त न झाल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये श्री शिवसमर्थ सार्वजनिक वाचनालय या संस्थेच्या रजिस्ट्रेशनच्या बाबत व इतर सर्वसाधारण स्वरुपाच्या मुद्दयांवर अशी एकूण ५ मुद्दयांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये - श्री शिवसमर्थ सार्वजनिक वाचनालय या संस्थेचे अद्यापपर्यंत रजिस्ट्रेशन का करण्यात आले नाही याचा लेखी खुलासा, सदर फाईल आपल्या कार्यालयात मिळत नसून ती गहाळ झाली आहे काय, याबाबत लेखी खुलासा, या फाईलच्या संदर्भात श्री. शेकडे यांनी फाईल मंजूर करण्यासाठी रुपये २००० मागितल्याबाबत सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे दिनांक ३०-०८-२००६ रोजी केलेल्या लेखी तक्रारीबाबत करण्यात आलेल्या चौकशीचा अहवाल, चौकशी करणा-या अधिका-याचे नांव व हुद्दा व एखादे प्रकरण नोंदण्यासाठी आल्यानंतर त्याची नोंदणी होण्यासाठी लागणारा कालावधी – या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती साधारण टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक ०८-०३-२००७, १६-०३-२००७ व २१-०३-२००७ या तीन तारखांना सुनावणी ठेवली होती, तथापि या तीनपैकी एकाही सुनावणीस अपिलार्थी हे हजर राहिले नाहीत. शेवटच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक २०-०१-२००७ रोजी माहिती पुरविली असल्याचे नमूद केले. जन माहिती अधिकारी यांचे हे म्हणणे ग्राह्य धरुन जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २१-०३-२००६ रोजीच्या निर्णयाव्दारे अपिलार्थीचे सदर अपील रद्द करण्याचे आदेशित केले. सदर अपील निर्णय अपिलार्थीस कळविल्याचा पुरावा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय आयोगासमोर सादर करु शकले नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे दिनांक ०५-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. पुंडलिक जयराम जोपळे) यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दिनांक २०-०१-२००७ रोजी मागितलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीस निश्चित कोणती माहिती व केव्हा पुरविली याबाबतचा पुरावा आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपील अर्जाची त्यांनी दिनांक ०८-०३-२००७, १६-०३-२००७ व २१-०३-२००७ या तीन तारखांना सुनावणी ठेवली होती, परंतु या तीनही सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिले असल्यामुळे एव्हीडन्स ॲक्टनुसार उपस्थित जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस त्यांनी माहिती दिली हे म्हणणे ग्राह्य धरुन अपिलार्थीचे प्रथम अपील रद्द करण्याचा निर्णय दिला आहे.

सध्याचे जन माहिती अधिकारी (श्री. माणिकराव महादू गावंडे) यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ज्या संस्थेच्या (श्री शिवसमर्थ सार्वजनिक वाचनालय) नोंदणीसंदर्भात माहिती मागविली आहे त्या संस्थेची दिनांक ०७-०५-२००७ रोजी अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर नोंदणी झाली आहे. या संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राचा क्रमांक ०७०४११ असा असून संस्थेचा नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/१३८/२००७/नाशिक असा आहे. सदर नोंदणी प्रमाणपत्र त्यांनी दिनांक ०७-०५-२००७ रोजी निर्गमित केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळेस तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी, “ फक्त

अपिलार्थीस त्यांनी माहिती दिली'' एवढ्यापुरताच सीमीत युक्तिवाद आयोगासमोर केला. अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती दिली, ती कधी दिली, यासंदर्भात त्यांनी आयोगासमोर कोणताही पुरावा सादर केला नाही. अपिलार्थीच्या दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण पाच मुद्दयांवर माहिती विचारली आहे. यापैकी मुद्दा क्रमांक १ व्दारे त्यांनी श्री शिवसमर्थ सार्वजनिक वाचनालयाचे रजिस्ट्रेशन का करण्यात आले नाही याचा खुलासा जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिला आहे. अपिलार्थीने मागितलेली ही माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ''माहिती'' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलासा मागणे अथवा एखाद्या कृतीबाबत कारणे मागणारी माहिती मागणे अभिप्रेत नाही, त्यामुळे मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत ही माहिती देय होऊ शकत नाही. मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात अपिलार्थीने संबंधित फाईल गहाळ झाली आहे का याबाबत लेखी खुलासा जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला आहे. याबाबत देखिल मुद्दा क्रमांक १ मध्ये आयोगाने व्यक्त केलेले अभिप्राय अंशतः लागू होतील. मात्र ही फाईल त्यांच्याकडून गहाळ झाली आहे किंवा कसे याचे उत्तर फक्त होय किंवा नाही असे असू शकते. सबब या २ मुद्दयांपैकी एक विकल्प जन माहिती अधिकारी यांनी देऊन अपिलार्थीस यासंदर्भात फाईलच्या तत्कालीन स्थितीबाबत अवगत करावे लागेल. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ४ व ५ च्या संदर्भातील माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील ''माहिती'' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता, माहिती देण्यासाठी विहित कालावधी

व्यपगत झाल्याने विनामूल्य द्यावी लागेल.  जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देतांना, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी निश्चित कोणती माहिती दिली हा प्रश्न विचारला असता तर कदाचित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खरोखरच माहिती दिली आहे किंवा कसे हे कळले असते, तथापि त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे "अपिलार्थीस माहिती दिली" एवढेच म्हणणे, अधिक चौकशी न करता ग्राह्य धरले व अपिलार्थीचे प्रथम अपील रद्द केले.  आयोगाच्या मते जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती बरोबर नसून अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय देतांना अपिलार्थीस माहिती कशी मिळू शकेल यादृष्टीकोनातून त्यांनी या अपील अर्जाकडे पाहावयास हवे होते.  अपिलार्थीस माहिती दिल्याचा पुरावा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर न केल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याचे गृहीत धरुन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती, मुद्दा क्रमांक १ वगळता, उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती हे आदेश निर्गमित होताच त्यांना १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद न दिल्याचे आढळल्यास सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक यांना त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी अशी शिफारस त्यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१.	अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ वगळून उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद दिला नसल्याचे आढळल्यास त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची / प्रस्तावित करण्याची शिफारस सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक यांना करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २९-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संतोष गंगाधर वायकंडे, घ. नं. ४५६९, गणेशवाडी, पंचवटी, नाशिक -०३

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५१७

निर्णय दिनांक २९-०८-२००८

१ श्री. प्रमोद गोविंद अलई, : अपिलार्थी
९ संकेत अपार्टमेंट, तिडके कॉलनी,
नाशिक

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,
कळवण, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रमोद गोविंद अलई (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. शिबल्या माकता वळवी, जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, कळवण (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. प्रदीप आण्णासाहेब पाटील, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व बाळासाहेब दादा काळे, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नाशिक हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १०-०५-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगासमोर विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी उशिरा, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद केले आहे. त्यांच्या विधानापृष्ट्यर्थ त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केले असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांच्या मौजे दहीवड, तालुका देवळा, जिल्हा नाशिक येथील गट क्रमांक ४९८ मध्ये अतितातडीचे मोजणी शुल्क घेऊन वेळेत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने मोजणी केली नाही व या मोजणीसाठी दिनांक ०३-०५-२००६ ते ०१-०२-२००७ पर्यंतचा कालावधी लावला आहे. अतितातडीच्या मोजणीसाठी विहित कालावधी दोन महिने असतांना त्यांनी ८ महिने इतका कालावधी त्यासाठी लावला, माहिती देतांना पत्रव्यवहाराचा पत्ता नाशिक येथील असतांना जाणुनबुजून चुकीच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करतांना कमी मुद्रांक लावून पत्रव्यवहार केला. परिणामी त्यांना ३० रुपये इतका दंड भरावा लागला, दिलेल्या माहितीवर कार्यालयाचा शिक्का व स्वाक्षरी नाही, त्यामुळे ही माहिती अपूर्ण ठरते. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय देतांना सदर निर्णय एकतर्फी दिला आहे, त्यांच्या सदर मोजणी प्रकरणात तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी त्यांची फसवणूक केली असून त्यांच्या झालेल्या मानसिक, शारीरिक व आर्थिक नुकसानीस ते जबाबदार आहेत. तसेच त्यांनी दिनांक १९-१२-२००६ रोजी घेतलेल्या शुल्क रुपये ९००० रुपयाच्या शुल्कापोटी त्यांचा पोटहिस्सा करुन त्या हिश्श्याचा ७/१२ च्या उतारा देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः दिनांक ०१-०२-२००७

रोजी गट क्रमांक ४९८ मौजे दहीवड येथील अतितातडीचे मोजणीसंदर्भात, दिनांक ०२-०५-२००६ ते ०१-०२-२००७ या कालावधीशी संबंधित "अतितातडीची मोजणी असतांना उशीर लावण्याचे कारण व नकाशावर तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांची सही व कार्यालयाचा शिक्का का देण्यात आला नाही याचा खुलासा करावा" अशी माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०२-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने संदर्भित केलेल्या नकाशाच्या नकलेवर अनावधानाने सही व शिक्का देण्याचे राहून गेल्याचे कळविले तसेच यासंदर्भात सही व शिक्क्याची पुर्तता झाल्याचे देखिल अपिलार्थीस अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक ०६-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १३-०३-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकारातील माहिती या संज्ञेत अंतर्भूत होत नसल्याने निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वर म्हटल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर लेखी युक्तिवाद सादर केला असून त्याचा परामर्ष सुरुवातीच्या परिच्छेदात दिला आहे.

अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी त्यांच्या शेताच्या पोटहिश्श्याची मोजणी करण्यासाठी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्या सुचनेवरुन अतितातडीचे मोजणी करिता रुपये ९००० इतके शुल्क भरले. तथापि या पत्रातील क्षेत्रामध्ये वहिवाट निश्चित न झाल्याने त्यांना पोटहिश्श्याची मोजणी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्याकडून करुन मिळाली नाही जर वहिवाटीचा मुद्दा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अगोदरच सांगितला असता तर त्यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये ९००० रुपये इतके शुल्क भरले नसते व त्यांना ९००० रुपये इतक्या रकमेचा भुर्दंड टाळता आला असता. तसेच अपिलार्थीने व्दितीय अपील अर्जामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या प्रकरणातील पत्रव्यवहार करतांना मुद्दाम चुकीचा पत्ता लिहिला, कमी किंमतीचे स्टॅम्प लावले व त्यामुळे त्यांना ३० रुपये पोस्टाच्या तिकिटाचे भरावे लागले असे मुद्दे आयोगास अवगत केले.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या मर्यादेमध्ये अपिलार्थीच्या अर्जाची पाहणी केली असता, अपिलार्थीचे अपील हे फेटाळण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे, कारण अपिलार्थीने त्यांच्या ज्या मूळ अर्जावर हे व्दितीय अपील केले आहे त्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती पूर्णतः प्रश्नार्थक स्वरुपात असून, या अर्जाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती उशिरा देण्याची कारणे, सही शिक्का का देण्यात आला नाही याचा खुलासा, अशा स्वरुपाची माहिती मागविली आहे, जी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणताही खुलासा, अभिप्राय तसेच त्यांना त्यांच्या निर्णयासंबंधीची कारणे मागणे अभिप्रेत नाही. यावरुन अपिलार्थीने

जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीशी विसंगत असल्याचे सिध्द होत आहे.

अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केलेला पत्रव्यवहार मुद्दाम चुकीच्या पत्त्यावर केला, कमी किंमतीचे स्टॅम्प लावले या घेतलेल्या आक्षेपाची पाहणी केली असता, सदर आक्षेप अपिलार्थीने मोजणीकरिता केलेल्या अर्जासंदर्भात तालुका निरीक्षक भूमि अभिलेख व अपिलार्थी यांच्यामध्ये झालेल्या पत्रव्यवहाराशी संबंधित असल्याचे दिसून येते. या पत्रव्यवहाराचा विचाराधीन अर्जाशी व अपिलाशी कोणत्याही प्रकारे संबंध असल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे या मुद्दयावरील अपिलार्थीचा युक्तिवाद आयोग विचारात घेत नाही.

प्रसंगावशात् उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या पोटहिश्श्याच्या मोजणीबाबत आयोगास असे अवगत करुन दिले की, अपिलार्थीच्या या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडे अर्ज केल्यास त्यानुसार या प्रकरणाचे परत नव्याने पुनर्विलोकन करणे त्यांना शक्य आहे व यासंदर्भामध्ये त्यांचा निर्णय ते एक महिन्यात पारित करु शकतील. अपिलार्थीने जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, नाशिक यांच्या सल्ल्याच्या आधारे पुढील कार्यवाही करावी असे त्यांना सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक २९-०८-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रमोद गोविंद अलई, ९ संकेत अपार्टमेंट, तिडके कॉलनी, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, कळवण, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५१८

निर्णय दिनांक २९-०८-२००८

१ श्री. दिपक जगन्नाथ पाटील, : अपिलार्थी

संपादक, साप्ता. ‘लोकसमर’

९४, फॉरेस्ट कॉलनी, नगांव हिल, देवपूर,

धुळे

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :

तथा कनिष्ठ अभियंता,

जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,

अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप अभियंता,

जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,

अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. शांताराम राजाराम कापडी, जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा (यापुढे

त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. जगन्नाथ देविदास पाटील, जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. प्रविण केशवराव शिरसाठ, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्रेणी-२, बांधकाम (जि.प.), उपविभाग, अक्कलकुवा हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. दिपक जगन्नाथ पाटील हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०५-०२-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगासमोर विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-१०-२००६ रोजी १० दिवसाच्या आत माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांना सूचित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविण्यासंदर्भात कोणतीही कारवाई केली नसल्याने अधिनियमान्वये विहित दंडात्मक तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे शास्ती लावून शिस्तभंगविषयक अत्यंत कडक कारवाई करण्यात यावी व त्यांना आवश्यक असलेली माहिती तात्काळ पुरविण्यासंदर्भात आयोगाच्या स्तरावरुन पुनःश्च आदेश पारित करावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०६-२००६ रोजीच्या त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

“ महाशय, उप अभियंता जि. प. बांधकाम उपविभाग अक्कलकुवा मार्फत सन २००५-०६ या वर्षात रो. ह. यो., कामासाठी धान्य योजना, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना, वित्त आयोग, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, स्थानिक विकास निधी, विशेष दुरुस्ती कार्यक्रम या योजने अंतर्गत करण्यात आलेले रस्ते विकास कामांची यादी.

प्रत्येक कामनिहाय अंदाजपत्रकीय रक्कम, प्रत्यक्ष झालेला खर्च, संबधित अभियंताचे नाव, काम सुरु झाल्याचा दिनांक, कामाची अंतीम मोजमाप पुस्तीका, कामाचा दर्जा व कामाची सद्य स्थिती संबधीची सविस्तर माहिती.” सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक ३१-१०-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात अपिलार्थीस दिनांक ३१-१०-२००६ रोजी एक पत्र पाठविल्याचे दिसून येते. या पत्रामध्ये त्यांनी संबंधित कनिष्ठ / शाखा अभियंता यांच्याकडून माहिती त्यांना प्राप्त न होऊ शकल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी

विलंब लागत असल्याचे मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना १० दिवसाच्या आत माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याची सूचना दिल्याचे म्हटले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी सदरचे पत्र पारित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे या निर्णयाच्या सुरुवातीच्या परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते जिल्हा परिषद बांधकाम पश्चिम अक्कलकुवा या कार्यालयाच्या कार्यालयामध्ये शाखा अभियंता या पदावर कार्यरत आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती यांच्या कार्यालयातील विविध कनिष्ठ अभियंत्यांकडून प्राप्त करुन घेणे व ती एकत्रित करुन नंतर ती अपिलार्थीस देणे अशा प्रकारचे काम त्यांच्याकडे सोपविले आहे. या प्रकरणी त्यांना ज्या कनिष्ठ अभियंत्यांकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देणे अभिप्रेत आहे त्या कनिष्ठ अभियंत्यांनी त्यांच्याकडे वेळेत माहिती न दिल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत पुरविता आली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी अंदाजे पन्नास टक्के इतकी माहिती अपिलार्थीस देण्यासाठी आज त्यांच्याकडे तयार आहे.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज दिनांक २९-०६-२००६ रोजी केला असून दोन वर्षाहून जास्त कालावधी व्यपगत होऊनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. आज देखिल त्यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील फक्त पन्नास टक्के इतकीच माहिती अपिलार्थीस देण्यास ते तयार आहेत हे सर्व प्रकार पाहता, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाला माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे मूळात पालन करावयाचे आहे किंवा कसे यासंबंधी आयोगाच्या मनात प्रश्न

उपस्थित होत आहे.  या प्राधिकरणाच्या मनात जरी अधिनियमातील तरतुदींचे विहित मुदतीत पालन करणे मनात नसेल तरी अधिनियमातील तरतुदीनुसार ते जोवर प्राधिकरणाच्या सेवेमध्ये कार्यरत आहेत तोवर त्यांच्या कार्यांचा एक अविभाज्य भाग म्हणून त्यांना या तरतुदींचे पालन करणे अनिवार्य आहे ही बाब त्यांनी लक्षात ठेवावी.  उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या एकट्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध नव्हती तर त्यांना ही माहिती त्यांच्या वेगवेगळ्या सहाय्यकांकडून एकत्रित करुन ती अपिलर्थीस पुरवावयाची होती.  माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे जे सहाय्यक / कर्मचारी आहेत, त्या सर्वांना जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे.  हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे जे इतर शाखा अभियंता व इतर कर्मचारी आहेत ते सर्व या प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहितीपासून वंचित ठेवण्यासाठी जबाबदार ठरत असल्याचे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप जरी मोठे असले तरी ही माहिती अपिलार्थीस देणे ही अशक्यप्राय बाब आहे, असे आयोगास आतापर्यंत व्यपगत झालेला कालावधी पाहता वाटत नाही, कारण अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील अंतिम मोजमाप पुस्तिका हा मुद्दा वगळता उर्वरित सर्व माहिती संबंधित प्राधिकरणाच्या अर्थसंकल्पाच्या पुस्तिकेमध्ये सहज उपलब्ध असते.  सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलीत कार्यपध्दतीनुसार ही माहिती प्रत्येक उपविभागीय व त्यावरील स्तरावर उपलब्ध असून दर आर्थिक वर्षामध्ये या माहितीचे संस्करण वेळोवेळी संबंधित अधिका-यांकडून कले जात असते.  अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही २००५-२००६ या वर्षातील असून या माहितीची मागणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-

०६-२००६ रोजी केली आहे.  याचाच अर्थ अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही नजिकच्या कालावधीतील असून ती शोधण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांना फार मोठ्या प्रमाणात त्यांच्या कार्यालयातील साधनसामुग्री वळवावी लागली असती अशातली बाब येथे संभवत नाही.  या सर्व वस्तुस्थितीवरुन अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिल्याचे व त्यांना माहिती मिळण्यापासून वंचित ठेवण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी जबाबदार असल्याचे सिध्द होते.

अशा प्रकारच्या कृतीव्दारे जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी आपल्या या कृतीव्दारे स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस अशा प्रकारे पात्र ठरविले आहे.  सबब असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले संबंधीत कर्मचारी / सहाय्यक या सर्वांवर त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार) इतकी एकत्रित शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली सप्टेबर २००८ पासून जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा.

या शास्तीची कर्मचारी / अधिकारीनिहाय विभागणी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, धुळे यांनी यथायोग्यरित्या हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत करावी. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात

येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले संबंधीत कर्मचारी / सहाय्यक या सर्वांवर त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार) इतकी एकत्रित शास्ती लावण्यात येत आहे. सदरील शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे करावा.

औरंगाबाद
दिनांक २९-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिपक जगन्नाथ पाटील, संपादक, साप्ता. ‘लोकसमर’ ९४, फॉरेस्ट कॉलनी, नगांव हिल, देवपूर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५१९

निर्णय दिनांक २९-०८-२००८

१ श्री. चंद्रकांत वाळू आंबेकर, : अपिलार्थी
रा. नवलेवाडी, पो. तालुका अकोले,
जिल्हा अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी लिमिटेड, अकोले,
तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, संगमनेर
जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग अकोले, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. चंद्रकांत हिरामण कोळपे, जन माहिती अधिकारी

तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग अकोले (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. जालोरी नथमल दिपचंद, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, संगमनेर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. चंद्रकांत वाळू आंबेकर हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १३-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विभागाने नवलेवाडी ग्रामपंचायत हद्दीत श्रीमती कलावती वाळू आंबेकर सर्व्हे नंबर ४ (४/ ३ ब ३) ५२ बिगर शेती प्लॉटमधील टाकलेल्या उच्चदाब विद्युत वाहिन्यासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " हायटेनशन लाईन आपल्या डिपार्टमेंन्टने टाकली ती कुठल्या सरकारची कोणती परवानगी घेतली त्या परवानगीचे (मागणीचे) सरकारला दिलेले व परवानगी मीळाल्याचा सरकारचा आदेश त्याप्रमाणे सदरची लाईन किती शक्तीने वाहील."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २१-०३-२००६ च्या पत्राव्दारे माहिती पुरविली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीने दाखल केलेल्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, मात्र त्यांनी यासंदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १७-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, " वरील विषयानुसार माहितीच्या अधिकाराअंतर्गत आपण मागविलेली माहिती ही सहाय्यक अभियंता, अकोले यांनी आपणांस दिलेली आहे. परंतू सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्याने आपण कार्यकारी अभियंता, संगमनेर यांचे कडे अर्ज केलेला आहे. आपल्या अर्जानुसार आपणांस जी अधिक माहिती हवी आहे त्यासाठी आपण या कार्यालयास सोमवार अथवा शुक्रवार या दिवशी येवून कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पाहू शकता. व आपणास हव्या असलेल्या कागदपत्रांची झेराक्स प्रतही आपणांस देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी."

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-०३-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक २१-०३-२००६ रोजी त्यांच्या कार्यालयाच्या पत्रान्वये पुरविण्यात आली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या उच्चदाब वाहिनीच्या कामास

कार्यकारी अभियंता यांनी नॉर्मल डेव्हलपमेंट सिस्टीम इम्प्रुमेंट स्कीम ०४-०५ या योजने अंतर्गत दिलेल्या प्रशासकीय मान्यतेस अनुसरुन करण्यात आली व तसे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २१-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस सदर उच्चदाब वाहिनी ११००० व्होल्ट इतक्या दाबाची असल्याचे कळविले आहे. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ३ संदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, इंडियन इलेक्ट्रीसिटी ॲक्ट १९४८ व इंडियन टेलीग्राफीक ॲक्ट १९१० मधील तरतुदीनुसार अशा प्रकारच्या विद्युत वाहिन्याचे काम करतेवेळी संबंधित जमीन मालकाची परवानगी घेण्याची आवश्यकता नसते, तसेच इंडियन इलेक्ट्रीसिटी ॲक्ट २००३ मध्ये देखिल अशाच प्रकारची तरतूद आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २१ मार्च २००६ रोजीच्या पत्रान्वये जरी विहित मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी, या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती मोघम असून ती स्पष्ट पुराव्याअभावी अपूर्ण ठरत आहे. या पत्राबरोबर जन माहिती अधिकारी यांनी संबंधित कामाच्या प्रशासकीय मान्यतेची प्रत व जन माहिती अधिकारी यांनी वरील युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेल्या कायद्यातील तरतुदींच्या प्रती अपिलार्थीस दिल्या असत्या तर कदाचित अपिलार्थीस आयोगाकडे व्दितीय अपील करण्याची वेळ आली नसती. आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत देण्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-०३-२००६ रोजीच्या मूळ

अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही असद्हेतूने टाळाटाळ केल्याचे अथवा माहिती दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद<br>
दिनांक २९-०८-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंद्रकांत वाळू आंबेकर, रा. नवलेवाडी, पो. तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग अकोले, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, संगमनेर जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५२०

निर्णय दिनांक २९-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गुलाम गौस शेख अहमद,<br>अंदरपुरा, अमळनेर, तालुका अमळनेर,<br>जिल्हा जळगांव | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,<br>अमळनेर, जिल्हा जळगांव | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक भूमि अभिलेख,<br>जळगाव | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गुलाम गौस शेख अहमद (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. भुषण नारायण मोहिते, नगर भूमापन अधिकारी, जळगांव, जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, अमळनेर व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जळगाव यांचे

प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष श्री. अहमद हाजी आजम हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित वारसा हक्क नावाची नोंदणी करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

"१. मयत वारसाचे मृत्यू दाखले ज्या नियमाप्रमाणे आवश्यक आहेत त्या नियमाची माहिती.

२. दि. २९/५/२००१ रोजी अहमद हाजी आजम यांचे नांव कमी करणेबाबत कोर्टाने आदेशच दिलेला नसतांना ज्या नियमाप्रमाणे अहमद हाजी आजम यांचे नांव कमी करण्यात आले. त्या नियमाची माहिती.

३. एकदा वारस दाखल करणे बद्दलचा माझा अर्ज निकाली काढेलेनंतर ज्या नियमाने आपले कडून परत वारस दाखल करणेबद्दल लिहिण्यात आले त्या नियमाची माहिती.

४. महाराष्ट्र जमिन महसुल संहिता १९६६ चे कलम १४९ मध्ये दुरुस्ती करण्यात आली असल्यास त्या बद्दल माहिती."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कडील दिनांक ०२-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी

नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक २७-०६-२००६ व १९-०७-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०९-०८-२००६ रोजी पारित केले. ह्या आदेशान्वये त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावल्याचे दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, संबंधित मिळकत प्रथम महमद उस्मान, हाजी अहमद व मुसा हाजी आजम या तिघा भावांच्या नावाने नोंदविली गेली होती. या तिघा भावांपैकी मुसा हाजी आजम यांनी छोटू साहेबजी बागवान यांच्याशी संगनमत करुन महमद उस्मान व अहमद यांची नावे त्या मिळकतीवरुन कमी केली व तदनंतर त्यांनी छोटू साहेबजी बागवान यांना कच्च्या पावतीवर जमीन विकली असून या जमिनीवर छोटू साहेबजी बागवान यांनी बांधकाम केले आहे. सदर जमिनीवर त्यांच्या मालकी हक्काची नोंद व्हावी ती त्यांना ताब्यात मिळावी असे त्यांचे म्हणणे आहे. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, अमळनेर व अधीक्षक भूमि अभिलेख, जळगाव यांनी त्यांना रस्त्यावर जीवन जगायला लावले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०५-०४-२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी दिनांक ०२-०५-२००६ रोजी अपिलार्थीस पुरविलेली माहिती योग्य आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा

क्रमांक १ चे उत्तर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम १५१ असे आहे. या कलमातील तरतुदीनुसार कोणत्याही महसूल अधिका-याने किंवा तलाठ्याने मागणी केल्यानंतर १ महिन्याच्या आत संबंधितांनी नोंदणी पुस्तक अभिलेख तयार करण्यासाठी त्यांनी विचारलेली माहिती व दस्तऐवज पुरविणे किंवा सादर करणे हे अपिलार्थीवर बंधनकारक आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संबंधात तत्कालीन तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, अमळनेर यांनी केलेली कारवाई चुकीची असल्यामुळे अहमद हाजी आजम यांचे नाव कमी करण्यासाठी कोणत्याही नियमाचा वापर केला गेला नाही. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ३ चे उत्तर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २५८ असे आहे. या कलमाव्दारे राज्य सरकारने प्रत्येक महसूल किंवा भूमापन अधिका-यास आपण होऊन दिलेले किंवा आपल्या पुर्वीच्या अधिका-याने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे पुनर्विलोकन करुन यासंबंधी योग्य वाटेल असे आदेश देण्यासंदर्भात प्राधिकृत केले आहे. या तरतुदीचा वापर करुन जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांनी या जमिनीच्या अभिलेख्यावर अपिलार्थीचे नाव परत नोंदविले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ नुसार त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती बरोबर आहे. अधिनियमातील कलम १४९ मध्ये दुरुस्ती करण्यात आली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस मूलतः त्यांच्या मालकीची जमीन, जी छोटू साहेबजी बागवान यांना त्यांच्या नांवाने विकली आहे ती अपिलार्थीस त्यांच्या नावाने करुन त्याचा ताबा हवा आहे. अपिलार्थीचे बंधू मुसा हाजी आजम यांनी या जमिनीवर अपिलार्थी व त्यांचे दुसरे भाऊ महमद उस्मान यांचे नाव कमी करुन ही जमीन छोटू साहेबजी बागवान यांना विकली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०५-

२००६ रोजीच्या पत्राव्दारे दिलेली माहिती योग्य आहे असे आयोगाचे मत आहे. या प्रकरणामध्ये असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मिळकतीवर त्यांचे नांव मालक म्हणून नोंदविले गेले आहे, या मिळकतीवर त्यांचा मालकीहक्क होता पण त्यांच्याकडे या मिळकतीचा ताबा नाही व हा ताबा मिळण्यासाठीचा प्रयत्न ते माहिती अधिकाराचा उपयोग करुन घेऊ पाहत आहेत. जमिनीच्या मालकी हक्क व ताब्याबाबत अपिलार्थीस आता योग्य अशा न्यायालयाकडेच दाद मागता येईल, कारण अशा जमिनीच्या मालकी हक्कासंबंधीच्या प्रकरणासंदर्भात निर्णय देण्याची अधिकारिता आयोगास नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पूर्ण माहिती दिली असल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंबंधी त्यांच्या युक्तिवादामध्ये बराचसा ऊहापोह केला असून आयोग त्यास सहमत आहे, व अपिलार्थीस अधिनियमातील विहीत मुदतीत माहिती मिळाली असल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २९-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गुलाम गौस शेख अहमद, अंदरपुरा, अमळनेर, तालुका अमळनेर, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, अमळनेर, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५२१

निर्णय दिनांक २९-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. हेमंत हरीभाऊ जगताप,<br>१०३६, जिजामाता रोड, दहीपूल,<br>नाशिक | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा स्वीय सहाय्यक तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त (व्हॅट ९), विक्रीकर सह आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विक्रीकर सह आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. हेमंत हरीभाऊ जगताप (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुधीर अनंत कुलकर्णी, जन माहिती अधिकारी तथा स्वीय सहाय्यक तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त (व्हॅट ९), विक्रीकर सह आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात

येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक व त्रयस्थ पक्ष श्री. माधव रंगनाथ राऊत हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०५-०९-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज करेपावेतो माहिती उपलब्ध झाली नाही असे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील श्री. माधव रंगनाथ राऊत यांच्याबाबतची वैयक्तीक माहिती त्यांच्याकडील दिनांक २३-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या या माहितीमध्ये - श्री. माधव रंगनाथ राऊत हे सेवेत केव्हा रुजू झाले त्यांची सेवानिवृत्ती केव्हा आहे ? त्यांचा बेसिक पगार व वार्षिक उत्पन्न किती ? सेवेत रुजू झाल्यापासून नाशिकमध्ये किती वर्षे ? व अन्य ठिकाणी असेल तर किती वर्षे सेवा केली ? - मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती देण्याचे अधिनियमातील कलम ८ (ञ) नुसार नाकारले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, मात्र अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात त्यांच्याकडील दिनांक ३१-०८-२००६ रोजी आपला निर्णय पारित केला. या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भातील घेतलेली भूमिका मान्य करुन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे दिनांक ०५-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी श्री. राऊत यांच्याविषयी मागितलेल्या माहितीची त्यांना आजही एका न्यायालयीन प्रकरणाच्या संदर्भामध्ये आवश्यकता आहे. त्यांनी विचारलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नाकारणे योग्य नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अधिनियमातील कलम ८ (ञ) नुसार नाकारली आहे. सदर नकार त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २५-०७-२००६ रोजीच्या आदेशान्वये दिलेला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील जी माहिती सार्वजनिक स्वरुपाची आहे ती अपिलार्थीस देण्यास हरकत नाही. अपिलार्थीस प्रथमतः माहिती नाकारतांना ते या पदावर कार्यरत नव्हते, तसेच अपिलार्थीने माहितीसाठीचा प्रथम अर्ज करतेवेळी माहिती अधिकार कायदा हा नव्याने अंमलात आला असल्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती

द्यावयाची किंवा कसे या संभ्रमात तत्कालीन जन माहिती अधिकारी पडल्याने त्यांनी ही माहिती अपिलार्थीस देऊ केली नसावी.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. माधव रंगनाथ राऊत यांच्याविषयी त्यांची वैयक्तीक माहिती मागितली होती. सुनावणीचे पत्र त्रयस्थ पक्षास जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत देऊनही ते आज रोजी सुनावणीस हजर नाहीत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मर्यादित असून तिचे स्वरुप वैयक्तीक असे आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील श्री. माधव रंगनाथ राऊत हे सेवेत केव्हा रुजू झाले, त्यांचा बेसिक पगार व सेवेत रुजू झाल्यापासून नाशिकमध्ये किती वर्षे ? व त्यांनी सेवा कोठे कोठे केली याचा तपशील ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची आहे असे आयोगाचे मत आहे. कारण श्री. माधव रंगनाथ राऊत यांची नेमणूक, त्यांना मिळणारा बेसिक पगार व त्यांच्या सेवेचा तपशील ही सर्व माहिती त्यांच्या सेवेशी संबंधित असून त्यांनी शासनाला दिलेल्या सेवेबाबत त्यांना शासनाकडून दरमहा नियमितपणे वेतन प्राप्त होत असते. सदर वेतन नागरिकांनी शासनाला दिलेल्या करामधून दिले जात असल्याने त्यांच्या सेवाविषयक संदर्भातील या बाबी सार्वजनिक स्वरुपाच्या ठरतात, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस प्रथमतः माहिती नाकारण्याची कृती काही अंशी चुकीची ठरते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील श्री. माधव रंगनाथ राऊत हे सेवानिवृत्त केव्हा होणार, त्यांचे वार्षिक उत्पन्न या दोन मुद्दयांवरील माहिती मात्र निश्चितपणे श्री. माधव रंगनाथ राऊत यांच्या खाजगी बाबीशी संबंधित असून ही माहिती दिल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होणार नाही, मात्र श्री. माधव रंगनाथ राऊत यांच्या खाजगी बाबीमध्ये अगंतूक हस्तक्षेप होण्याची शक्यता आयोगास वाटते. या

कारणास्तव तसेच अपिलार्थीने श्री. माधव रंगनाथ राऊत हे केव्हा सेवानिवृत्त होणार आहेत ही भविष्यकाळातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. मूळात अपिलार्थीने मागितलेली या मुद्दयावरील ही माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) च्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. श्री. माधव रंगनाथ राऊत हे ५८ वर्षे पूर्ण झाल्यानंतरच सेवानिवृत्त होतील किंवा कसे हे या घटकेस कोणासही सांगता येणार नाही. श्री. माधव रंगनाथ राऊत यांच्या वार्षिक उत्पन्नामध्ये शासनाकडून मिळणा-या वेतनाव्यतिरिक्त इतर स्त्रोतातून त्यांना प्राप्त होणा-या उत्पन्नाचा समावेश होतो. ही प्रकारची माहिती अपिलार्थीस दिल्याने श्री. माधव रंगनाथ राऊत यांच्या खाजगी बाबीत अगंतूक हस्तक्षेप तर होईलच परंतु कोणतेही व्यापक जनहित साध्य होणार नाही, कारण अपिलार्थीस ही माहिती स्वतःच्या उपयोगाकरिता हवी आहे हा मुद्दा लक्षात घेता, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होऊ शकणार नाही या निर्णयाप्रत आयोग आला आहे. त्यामुळे श्री. राऊत यांच्या सेवानिवृत्ती व वार्षिक उत्पन्नाचा मुद्दा वगळता उर्वरित माहिती वर स्पष्ट केल्याप्रमाणे "सार्वजनिक माहिती" या स्वरुपाची असल्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमा-तील कलम ७ (६) च्या तरतुदीप्रमाणे विनामूल्य द्यावी लागेल.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०६-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी श्री. माधव रंगनाथ राऊत यांच्या सेवानिवृत्तीसंदर्भात व वार्षिक उत्पन्नासंदर्भातील माहिती वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांच्या सेवानिवृत्तीच्या व वार्षिक उत्पन्नाच्या संदर्भातील मुद्दे वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद<br>
दिनांक २९-०८-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हेमंत हरीभाऊ जगताप, १०३६, जिजामाता रोड, दहीपूल, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा स्वीय सहाय्यक तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त (व्हॅट ९), विक्रीकर सह आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५२२

निर्णय दिनांक : ३०-०८-२००८

१ श्री. देविदास महादू चौधरी, : अपिलार्थी
मु.पो.ता.अकोले, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्राम विकास अधिकारी,
अकोले ता.अकोले जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अकोले,
जि.अहमदनगर

त्रयस्थ पक्षः महादू रामजी चौधरी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. ज्ञानेश्वर देवराम सुर्वे, जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्राम पंचायत, अकोले, ता.अकोले,जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) श्री. जगन तुळशीराम सूर्यवंशी, विस्तार अधिकारी (पंचायत),जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोले, जि.अहमदनगर यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. देविदास महादू चौधरी (यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्री. महादू रामजी चौधरी,(यापुढे त्यांना त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२६.०९.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित १९७९-८० ते २००५-०६ या कालावधीतील माहिती खालीलप्रमाणे मागितली होती

> " सन १९८० ते सन २००५/०६. ८ दिवसांत मिळकत नंबर ०७ व १७ चे फेर आकारणी दाखले सन १९७९-८० ते सन २००५-२००६ साला करीता.
>
> नामे देवीदास चौधरी व महादू चौधरी यांचे नावे असलेल्या घर मिळकतीचे. ''

अपिलार्थी यांनी सदर माहिती शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ६.१०.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली १२ दाखल्यांसाठी प्रतिपृष्ठ रु. १०/- प्रमाणे एकूण १२०/-शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्क भरण्याचे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी परत दि. १३.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले असून ही दोन्ही पत्रे त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविले आहे. तसेच त्यांनी आयोगासमोर ही दोन्ही पत्रे अपिलार्थीस पाठविल्यापृष्ठयर्थ त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवही त्यांनी आयोगास दाखविली, यावरुन, या वहीचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील दोन्ही पत्रे अ.क्र.३०० व ३२८ या अनुक्रमांकाने पाठविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचना नुसार अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे कोणत्याही शुल्काचा भरणा न करता, माहिती अधिकार अधिनियम २००५

मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.१०.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.२.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. परंतु सदर सुनावणी झाली तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या संदर्भातील कोणतेही आदेश पारित केले नाहीत. या संदर्भातील आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पहाता, पंचायत समिती, अकोले येथील कारभार किती ओंगळपणे चालू आहे, याचे पुरेपूर दर्शन घडून येते. सुनावणी संबंधित नस्ती आयोगास दाखविली असता या सुनावणीमध्ये फक्त अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे काय आहे, ते नोंदवून घेतल्याचे दिसून येते, यावर निश्चित असा कोणताही निर्णय जन अपिलीय यांनी दिला नाही वा अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात अपिलार्थीचा निर्णय देण्याचे साधे सौजन्यही त्यांनी दाखविल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०२.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. यामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद करुन जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीकामी त्यांना कोणतेही सहकार्य केले नसल्याचे नमूद केले आहे. आयोगाच्या निदर्शनास या बाबी आणून अपिलार्थीने आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने त्यांनी आयोगाकडे केलेले द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २६.९.२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी दि. ६.१०.२००६ रोजी प्रथम

प्रतिसाद देऊन एकूण १२ दाखल्यांच्या प्रतींकरिता प्रति दाखला रु.१०/- या दराने एकूण रु.१२०/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क भरल्यास त्यांना आवश्यक असलेली माहिती एक दिवसाचे आत देण्यास तयार असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आपल्या युक्तीवादाच्या शेवटी आयोगास सांगितले.

त्रयस्थ पक्षाच्या अनुपस्थितीविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता, सदर त्रयस्थपक्ष दि. १४.१.२००७ रोजी मयत झाल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी श्री. महादू रामजी चौधरी यांच्या मृत्यूचा दाखला त्यांनी आयोगास दाखविला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की,अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२६.९.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीच्या अकोले ग्रामपंचायतीकडील मिळकत नं. ०४ व १७ चे श्री. देवीदास महादू चौधरी यांचे नाव असलेल्या मिळकतीच्या १९७९-८० ते २२०५ या सालातील फेरआकारणी दाखला हवा असल्याचे दिसून येते. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे फेरफार आकारणीचा दाखला मागितला आहे. असा दाखला कोणत्याही अर्जदारास देण्याकरिता ग्रामपंचायत प्रतिदाखला रु.१०/- इतकी फी निश्चित केली आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दाखल्यांच्या प्रति मागितल्या नाहीत, मात्र मूळ स्वरुपात दाखला मागितला आहे. त्यामुळे अपिलार्थीस राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दि. ११.१०.२००५ रोजी जारी केलेल्या सूचनेप्रमाणे (सर्वसाधारण A4 साईज कागदावरील झेरॉक्स प्रतीसाठी) प्रतिपृष्ठ रु.२/-इतके शुल्क आकारता येत नाही. याच अधिसूचनेतील कलम ४.१(ए)- अन्वये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून संबंधित

शासकीय प्राधिकरणाने निश्चित केलेले शुल्क + पोस्टल चार्जेस अशी एकूण रक्कम जन माहिती अधिकारी यांनी सांगितले, त्याप्रमाणे त्यांचे कार्यालयात भरणे भाग आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला आहे. त्यानंतरही त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क भरण्याबाबत परत दि. १३.१०.२००६ रोजी स्मरणपत्र देखील पाठविले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी आपले कर्तव्य योग्य तऱ्हेने पार पाडल्याचे दिसून येते. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा न केल्याने अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळू शकली नसल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता अपिलार्थीस माहिती न मिळण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे वरीलप्रमाणे सिध्द झाल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात्, उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोले जि.अहमदनगर यांनी उपरोक्त प्रकरणी आपले कर्तव्य नीटपणे पार पाडल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीच्या दि. २७.१०.२००६ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी अधिनियमातील कलम १९(६) प्रमाणे ४५ दिवस इतक्या मुदतीतही अपिलार्थीचे अपिलाची सुनावणी न घेता, आपला निर्णय पारित न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. **सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीची यथायोग्य दखल घ्यावी, असे त्यांना या प्रकरणी सूचित करण्यात येते.**

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१ अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देविदास महादू चौधरी, मु.पो.ता.अकोले, जि.अहमदनगर-४२२ ६०१

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, अकोले,ता.अकोले,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,अकोले,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४८७

निर्णय दिनांक : ३०-०८-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विलास सखाराम साठे,<br>रा. अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>रामराव चव्हाण माध्यमिक विद्यालय,<br>एम.आय.डी.सी.परिसर नागापूर,<br>जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव,<br>रेणूका शिक्षण प्रसारक मंडळ,<br>अहमदनगर, जि.अहमदनगर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. विलास सखाराम साठे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री.गोरखनाथ रंगनाथ घाडगे, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, रामराव चव्हाण माध्यमिक विद्यालय, जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, रेणूका शिक्षण प्रसारक मंडळ, जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.०४.०७.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील इयत्ता ६ वी व ७ वी गणित अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या निकालाबाबत व त्यानंतरच्या पुर्नभरण केल्याच्या प्रक्रियेबाबत व संस्थेच्या आर्थिक माहितीबाबत दि. १ मे २००६ ते ३० जून २००७ या कालावधीची माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

" अ) विदयालयाला वेगवेगळया मार्गांनी मिळालेले आर्थीक उत्पन्न (उदा. विदयार्थी फी/शासन अनुदान रक्कम/देणगी) आर्थीक वर्ष ०६-०७ चा वार्षिक हिशोब खालीलप्रमाणे.

(१) जमा रक्कमसह नमुद तक्ता (१ एप्रील ०६ ते ३१ मार्च ०७ व त्यानंतर ३० जून ०७ पर्यंत)

(२) झालेल्या खर्चाचा नमूद तक्ता (१ एप्रील ते ३१ मार्च ०७ व त्यानंतर ३० जून ०७ पर्यंत)

(ब) खाली नमुद मुदयानुसार इ.६ वी ‘अ’, ‘ब’ व इ.७ वी ‘अ’, ‘ब’ ‘क’ या वर्गाच्या शैक्षणीक वर्ष ०६-०७ गणित विषयात अनुत्तीर्ण विदयार्थ्यांच्या पुर्णभरण प्रक्रियेबाबतची आहे.

(१) वरिल इयत्तेत गणित विषयात अनुत्तीर्ण विदयार्थी संख्या व नावासह यादी

(२) वरिल गणित अनुत्तीर्ण विदयार्थ्यांचे पुर्नभरण केले काय ? पुर्नभरणाची नेमकी कारण योग्य कागदपत्रासह स्पष्ट करावीत.

(३) पुर्नभरण आपण कोणत्या नियमानुसार केले. याबाबत सेवाविनीयमातील नमुद नियम/शासन आदेश/याबाबतचे परीपत्रक शिक्षण विभागाची अनुमती (परवानगी) घेतली असल्यास पत्र तथा पुर्णभरण कोणत्या नियमांच्या आधारे केले त्या नियम परिपत्रकाची साक्षांकित सत्यप्रत.

(४) पुर्णभरण प्रक्रीयेची आवश्यकता का भासली. व इतर वर्गाचे पूर्णभरण आपण का केले नाही ?

(५) इ. ६ वी ७ वी गणित शिकविणाऱ्या तत्कालीन शिक्षकास पुर्नभरण प्रक्रीयेत समावीष्ट केले काय ? केले नसल्यास का केले नाही याचा खुलासा मिळावा ”

अपिलार्थी यांनी सदर माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी यांच्याकडील दि. ४.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांनी मागणी केलेली माहितीपोटी रु. १०,०००/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस दि. ४.८.२००७ रोजी पाठविल्यापृष्ठयर्थ जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर पोस्टाची संबंधित पावती दाखविली, यावरुन त्यांनी अपिलार्थीस दि. ४.८.२००७ रोजी सकाळी १०.३० वा. हे पत्र पाठविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी सूचना देऊनही अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क न भरल्याने जन माहिती अधिकारी, अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दि. ११.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तथापि आज सुनावणीच्या वेळी त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली असल्याचे, परंतु त्यांनी सुनावणीची तारीख आठवत नसल्याचे आयोगास तोंडी सांगितले. मात्र त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ ते आयोगास कोणताही पुरावा सादर करु शकले नाहीत. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी सुनावणी घेतली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.०९.२००७ रोजी द्वितीय अपील

सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांचे दि. ४.८.२००७ रोजीचे पत्र त्यांना प्राप्त झाले असून, या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस, " रु.१०,०००/- विद्यालयाच्या बँक खाते नं. ७१ वर पाठवावे " असे कळविले, तथापि हे खाते कोणत्या बँकेचे आहे, जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेली माहिती निश्चित किती पृष्ठांची आहे, याचा उल्लेख केला गेला नसल्यामुळे ते हे शुल्क भरु शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि त्यांनीही त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे कोणताही युक्तिवाद करण्यात आला नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. ४.७.२००७ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी दि. ४.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना कळविले असले तरी अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे या रकमेचा तपशील, अपिलार्थीस द्यावयाच्या संभावित माहितीच्या पृष्ठांची संख्या व अपिलार्थीने निश्चितपणे या रकमेचा भरणा कोठे करावयाचा याचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविला नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यवपगत झाला असल्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, मुद्दा क्र. २, ४ व ५ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून या मुद्याद्वारे खुलासावजा माहिती अपेक्षित केल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २,४ व ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. मात्र ही माहिती वगळता उर्वरित मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता विनामूल्य देय ठरते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २,४ व ५ वगळता उर्वरित मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.२,४ व ५ वगळता उर्वरित मुद्यांवरील माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विलास सखाराम साठे,म्हसोबा गेट, विदया कॉलनी, नगर-कल्याण रोड, अहमदनगर ४१४ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, रामराव चव्हाण माध्यमिक विद्यालय, एम.आय.डी.सी.परिसर,नागापूर जि.अहमदनगर-४१४ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, रेणूका शिक्षण प्रसारक मंडळ,द्वारा रामराव चव्हाण माध्यमिक विद्यालय,एम.आय.डी.सी.परिसर,नागापूर, जि.अहमदनगर-४१४ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५२२

निर्णय दिनांक : ३०-०८-२००८

१ श्री. देविदास महादू चौधरी, : अपिलार्थी
मु.पो.ता.अकोले, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत, अकोले ता.अकोले
जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अकोले,
जि.अहमदनगर

त्रयस्थ पक्षः महादू रामजी चौधरी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. ज्ञानेश्वर देवराम सुर्वे, जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्राम पंचायत, अकोले, ता.अकोले,जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) श्री. जगन तुळशीराम सूर्यवंशी, विस्तार अधिकारी (पंचायत),जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोले, जि.अहमदनगर यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. देविदास महादू चौधरी (यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्री. महादू रामजी चौधरी,(यापुढे त्यांना त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२६.०९.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन १९७९-८० ते २००५-०६ या कालावधीतील माहिती खालीलप्रमाणे मागितली होती

> " सन १९८० ते सन २००५/०६. ८ दिवसांत मिळकत नंबर ०७ व १७ चे फेर आकारणी दाखले सन १९७९-८० ते सन २००५-२००६ साला करीता.
>
> नामे देवीदास चौधरी व महादू चौधरी यांचे नावे असलेल्या घर मिळकतीचे. "

अपिलार्थी यांनी सदर माहिती शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ६.१०.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेल्या १२ दाखल्यांसाठी प्रतिपृष्ठ रु. १०/- प्रमाणे एकूण रु. १२०/-इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे त्यांना सूचित केले. सदर शुल्क भरण्याचे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी परत दि. १३.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले असून ही दोन्ही पत्रे त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविली आहेत. तसेच त्यांनी आयोगासमोर ही दोन्ही पत्रे अपिलार्थीस पाठविल्यापृष्ठयर्थ त्यांच्या कार्यालयाची जावक नोंदवही त्यांनी आयोगास दाखविली, या नोंदवहीचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील दोन्ही पत्रे ३०० व ३२८ या अनुक्रमांकाने पाठविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे कोणत्याही शुल्काचा भरणा न करता, माहिती अधिकार अधिनियम २००५

मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.१०.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.२.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. सदर सुनावणी झाली तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या संदर्भातील कोणतेही आदेश पारित केले नाहीत. या संदर्भातील आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पहाता, पंचायत समिती, अकोले येथील कारभार किती बेशिस्तपणे चालू आहे, याचे पुरेपूर दर्शन घडून येते. सुनावणी संबंधित नस्ती उपस्थित प्रतिनिधीने आयोगास दाखविली असता या सुनावणीमध्ये फक्त अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे काय आहे, ते नोंदवून घेतल्याचे दिसून येते, यावर निश्चित असा कोणताही निर्णय जन अपिलीय यांनी दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात अपिलार्थीस निर्णय कळविण्याचे साधे सौजन्यही त्यांनी या प्रकरणी दाखविल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०२.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. यामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद करुन जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीकामी त्यांना कोणतेही सहकार्य केले नसल्याचे नमूद केले आहे. आयोगाच्या निदर्शनास या बाबी आणून अपिलार्थीने आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने त्यांनी आयोगाकडे केलेले द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २६.९.२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी दि. ६.१०.२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन, एकूण १२ दाखल्यांच्या प्रतींकरिता प्रतिदाखला रु.१०/- या दराने एकूण रु.१२०/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क आता भरल्यास त्यांना आवश्यक असलेली माहिती एक दिवसाचे आत देण्यास तयार असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आपल्या युक्तीवादाच्या शेवटी आयोगास सांगितले.

त्रयस्थ पक्षाच्या अनुपस्थितीविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता, सदर त्रयस्थपक्ष दि. १४.१.२००७ रोजी मयत झाल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी श्री. महादू रामजी चौधरी यांच्या मृत्यूचा दाखला आयोगास दाखविला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की,अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२६.९.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस अकोले ग्रामपंचायतीकडील मिळकत नं. ०४ व १७ चे श्री. देवीदास महादू चौधरी यांचे नाव असलेल्या मिळकतीच्या १९७९-८० ते २२०५ या सालातील फेरआकारणी दाखले हवे असल्याचे दिसून येते. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे फेरफार आकारणीचे दाखले मागितले आहेत. असा दाखला कोणत्याही अर्जदारास देण्याकरिता ग्रामपंचायत प्रतिदाखला रु.१०/- इतकी फी निश्चित केली आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दाखल्यांच्या प्रती मागितल्या नाहीत, मात्र मूळ स्वरुपात दाखला मागितला आहे. त्यामुळे अपिलार्थीस राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दि.

११.१०.२००५ रोजी जारी केलेल्या सूचनेप्रमाणे (सर्वसाधारण A4 साईज कागदावरील झेरॉक्स प्रतीसाठी) प्रतिपृष्ठ रु.२/-इतके शुल्क आकारता येत नाही. याच अधिसूचनेतील कलम ४.१(ए)- अन्वये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राधिकरणाकडील आधीच निश्चित केलेले शुल्क असलेली माहिती मागितल्यास संबंधित शासकीय प्राधिकरणाने निश्चित केलेले शुल्क + पोस्टल चार्जेस अशी एकूण रक्कम अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरणे भाग आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला आहे. त्यानंतरही त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क भरण्याबाबत परत दि. १३.१०.२००६ रोजी स्मरणपत्र देखील पाठविले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी आपले कर्तव्य योग्य तऱ्हेने पार पाडल्याचे दिसून येते. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा न केल्याने अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळू शकली नसल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. सदर माहिती दिशाभूल करणारी वा चुकीची असल्याचे आयोगास आढळले नाही. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता अपिलार्थीस माहिती न मिळण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे वरीलप्रमाणे सिध्द झाल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात्, उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोले, जि.अहमदनगर यांनी उपरोक्त प्रकरणी आपले कर्तव्य नीटपणे पार पाडल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीच्या दि. २७.१०.२००६ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी अधिनियमातील कलम १९(६) प्रमाणे ४५ दिवस इतक्या मुदतीतही अपिलार्थीचे अपिलाची सुनावणी न घेता, आपला निर्णय पारित न करुन

आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. **सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीची यथायोग्य दखल घ्यावी, असे त्यांना या प्रकरणी सूचित करण्यात येते.**

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१ अपील फेटाळण्यात येत आहे.

२ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीची यथायोग्य दखल घ्यावी

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देविदास महादू चौधरी, मु.पो.ता.अकोले, जि.अहमदनगर-४२२ ६०१

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, अकोले,ता.अकोले,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,अकोले,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी

संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५३५

निर्णय दिनांक : ३०-०८-२००८

१ श्री. दिलीप नायकु थोरात : अपिलार्थी
रा.कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित,विभागीय कार्यालय, संगमनेर,
जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
अहमदनगर, जि.अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित,कोपरगाव उपविभाग कोपरगाव,
ता.संगमनेर, जि.अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी: कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित,विभागीय कार्यालय, संगमनेर,
जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. दिलीप नायकु थोरात (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. गजानन मधुकर पाटील, जन माहिती अधिकारी

तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,कोपरगाव उपविभाग कोपरगाव, ता.संगमनेर, जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) श्री. नथमल दिपचंद जालोरी, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,विभागीय कार्यालय,संगमनेर, जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२३.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोळपेवाडी व हिंगणी फीडरवरुन एकाच ग्राहकास करण्यात येत असलेल्या विज वितरणाबाबत खालीलप्रमाणे मागितली होती

> " कोळपेवाडी ११ के.व्ही.ची लाईन हिंगणी ११ के.व्ही.कडे मा. शंकरराव काळे यांचे वस्तीकडे कोणत्या नियमानुसार टाकली. एकाच ग्राहकास दोनही फिडरची २४ तास विज मिळण्याचा आधिकार आहे का? कोणत्या तरतुदीनुसार Resi., commercial, Industrial, water supply HT यापैकी कोणती तरतुद लावुन शंकरराव काळे यांना विज उपलब्ध करुन दिली. भारनियमन चालु झालेल्या कालावधीपासुन व पूर्वीच्या कालावधीपासून.
> उपरोक्त माहिती व ११ के.व्ही.लाईटवर DTC वर मिटरींग आहे का? संपुर्ण विद्युत मोटारींना कॅपीसीटर उपलब्ध आहे काय ? सर्व मोटारींना मिटर आहे काय ? तसेच या योजनेचा खर्च कीती झाला (कोटेशन) याबद्दलची माहिती. ”

अपिलार्थी यांनी सदर माहिती साध्या टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही उपविभागीय स्तरावरील होती, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाच्या ताब्यात आहे, त्या उपअभियंता यांच्याकडे

अपिलार्थीचा अर्ज दि. ७.३.२००७ रोजी पाठवून दिला. त्यानंतर उपअभियंता यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याकडे दि. ३०.३.२००७ रोजी पाठविली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यानंतर दि. ७.४.२००७ रोजी विनामूल्य पाठविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०२.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले.जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.०५.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना मुदतीत माहिती प्राप्त झाली नसून जी माहिती मिळाली, ती दिशाभूल करणारी व चुकीची असल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाचा निर्णय न दिल्याचे नमूद करुन आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ७.४.२००७ रोजी प्राप्त झालेल्या माहितीमध्ये सात गावांना या दोन्ही फीडरद्वारे विजपुरवठा केला जातो, असे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांचे हे म्हणणे खोटे आहे. त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये विचारलेली श्री. शंकरराव काळे यांना कोणत्या कॅटॅगिरीनुसार लाईन उपलब्ध करुन दिली व तसेच या योजनेस किती खर्च आला, ही माहिती जन माहिती अधिकारी

यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेली नाही. या कारणास्तव त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे, असे वाटते.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, श्री. शंकरराव काळे आता मूळात त्यांच्या कार्यालयातर्फे लाईन उपलब्ध करुन न दिल्याने त्यांना कोणत्या कॅटॅगिरीनुसार वीज उपलब्ध करुन दिली, या अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीतील मुद्याचे त्यांचे उत्तर 'निरंक' असे आहे. श्री. शंकरराव काळे यांना वीजपुरवठयापोटी कोणतेही कोटेशन दिलेले नाही अथवा त्यांनी या प्रित्यर्थ त्यांच्या कार्यालयाकडे कोणत्याही फीचा भरणा केला नाही. कोळपेवाडी व हिंगणी येथील वीज पुरवठा योजना ही 'System Improvement Scheme' या योजनेअंतर्गत कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेसाठी किती खर्च झाला याची त्यांना आज रोजी माहिती नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयाशी प्रत्यक्षतः संबंधित नव्हती. ही माहिती त्यांच्या नियंत्रणाखालील एका उपविभागाच्या कार्यालयाशी संबंधित होती. ही माहिती उपविभागीय स्तरावर उपलब्ध असल्याने व संबंधित उपअभियंता हे जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले असल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर पाच दिवसांच्या आत संबंधित उपअभियंता यांच्याकडे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे या प्रकरणी भाग होते. तथापि त्यांनी अपिलार्थीचा अर्ज संबंधित उपअभियंता यांच्याकडे सात दिवस इतक्या विलंबाने पाठविला. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी दि. २२.३.२००७ रोजी अगर तत्पूर्वी अपिलार्थीस देणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत असताना उपअभियंता यांनी ही माहिती जन

माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयास दि. ३०.३.२००७ रोजी पाठवली व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ७.४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ७.४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी श्री. शंकरराव काळे यांना कोणत्या कॅटॅगिरीतून वीज उपलब्ध करुन दिली व या योजनेचा खर्च किती आला, याबाबतची माहिती त्यांनी अपिलार्थीस आजपावेतो दिलेली नाही.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. ७.४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे मुद्दा क्र. १ शी संबंधित दिलेली माहिती खोटी असल्याचे त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केले आहे. अपिलार्थीच्या मते हिंगणी व कोळपेवाडी मधून सात गावांना वीजपुरवठा केला जात नाही तर जन माहिती अधिकारी यांनी या दोन्ही फीडरमधून एकूण सात गावांना वीज पुरवठा केला जातो व या गावांची नावे अपिलार्थीस आवश्यक असतील तर त्यांना कळविण्यात येतील, असे आयोगास सांगितले. या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे, माहितीतील तांत्रिक बाबी पाहता, ग्राहय धरण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस या फीडरद्वारे ज्या सात गावांना वीजपुरवठा केला जातो, त्या गावांची नावे, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अपिलार्थीस कळवावीत.

वर वर्णिल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापही दोन मुद्यांवर माहिती दिलेली नाही, हे सिध्द होत असल्याने, ही माहिती त्यांनी आता हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(एक) अन्वये कार्यवाही न करता ते अपिलार्थीने मागणी केलेली माहिती स्वतः देण्याच्या भरीस पडले व यामध्ये अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांना प्राप्त झाली असल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. सदर विलंब जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने लावला असल्याचे आयोगास निःसंशयपणे आढळून येत नाही. सदर प्रकरणी झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांना ताकीद देऊन असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमाद्वारे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी यापुढे सतर्कतेने कार्यवाही करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३ जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०८-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीप नायकु थोरात, मु.पो.कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,कोपरगाव उपविभाग कोपरगाव, ता.संगमनेर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, संगमनेर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५६९

निर्णय दिनांक : ३०-०८-२००८

१ श्री. मुरलीधर नानाजी रोहोकले (पाटील), मु.पो.भाळवणी ता.पारनेर, जि.अहमदनगर. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, भाळवणी, ता.पारनेर, जि.अहमदनगर. : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर, जि.अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०८.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. पांडुरंग गहिनाजी खाडे, जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत भाळवणी, ता.पारनेर, जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) श्री. भरत साहेबराव कोसोदे,जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,पारनेर, जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे श्री. संजय पवार, ग्राम विकास अधिकारी, तत्कालील जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, भाळवणी जि. अहमदनगर यांच्यासह हजर आहेत, तर अपिलार्थी श्री.

मुरलीधर नानाजी रोहोकले (पाटील) (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.३.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दि. १४.८.२००६ रोजी काही माहिती टपालाद्वारे मागितली असता त्यांना ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, अपिलार्थीच्या दि. १४.८.२००६ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २६५०/- इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांच्याकडील दि. २८.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेनुसार अपिलार्थीने त्यांच्याकडे सदर शुल्काची रक्कम रु.२६५०/- ऐवजी रु.३०००/- इतक्या रकमेचा भरणा केला, असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी सांगितले तथापि सदर शुल्क त्यांनी निश्चितपणे कोणत्या तारखेस भरले, याबाबत ते आयोगास सांगू शकले नाहीत. या प्रकरणात त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी तयार करुन ठेवली होती, परंतु अपिलार्थीने ती माहिती साक्षांकित करुन मागितली असल्याने व ते स्वतः राजपत्रित अधिकारी नसल्याने त्यांनी या माहितीच्या प्रतींवर सहया केल्या नाहीत त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस पुरविली नाही. अपिलार्थीनेही ही माहिती स्वीकारण्यास नकार दिला, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संजय पवार (सध्या ग्रामपंचायत, टाकळी ढोकेश्वर) यांनी आयोगास सांगितले.

मध्यंतरीच्या कालावधीमध्ये अपिलार्थीने दि. २०.५.२००८ रोजी ग्रामपंचायत भाळवणीचे सरपंच यांना, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता नसल्याने त्यांनी भरणा केलेली शुल्काची रक्कम परत करावी, असे पत्र लिहिले. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २३.५.२००८ रोजी त्यांनी भरलेले शुल्क रु. ३०००/- इतके त्यांच्याकडील व्हाउचर क्र. २४/२३.५.२००८ च्या धनादेशाने परत केले. सदर धनादेश जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा भालवणी, जि.अहमदनगर येथील असून या धनादेशाचा क्र. ३८४३७९ असा आहे.

वरील घटनाक्रमावरुन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आता आवश्यक नसल्याचे व माहितीपोटी त्यांनी भरलेले शुल्क परत घेतल्याचे दिसून येत असल्याने, अपिलार्थीचे आयोगापुढील आज विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१ अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०८-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुरलीधर नानाजी रोहोकले (पाटील) मु.पो.भाळवणी, ता.पारनेर, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, भाळवणी ता.पारनेर,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,पारनेर,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.